खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास

(Khanapuri Bolicha Samajbhashavaidyanik Abhyas)

एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका

MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

मराठी अध्ययनशाखा
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

गोवा विद्यापीठ

अभ्यासक

वर्षा नामदेव घाडी

हजेरी क्र. 22P0190007

ABC ID 560820656127

पी. आर 201709255

मार्गदर्शक

डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या

(सहायक प्राध्यापक)

मराठी अध्ययनशाखा

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

गोवा विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष 2023 – 2024

KHANAPURI BOLICHA SAMAJBHASHAVAIDYANIK ABHYAS

Submitted in partial fulfilment of Masters Degree

MA in Marathi

MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

Marathi Discipline

Shenoi Goembab School of Language & Literature

Goa University

by

Varsha Namdev Ghadi

Seat No: 22P0190007

ABC ID: 560820656127

PRN: 201709255

Under the supervision of

Dr. Hemant Aiya

(Assistant Professor)

Marathi Discipline

Shenoi Goembab School of Language & Literature

Goa University

2023 – 2024

DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Dr. Hemant B. Aiya and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Ghadi

(Varsha Namdev Ghadi)

22P0190007

Date: 15/04/2024

Place: Goa University

COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report **"खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास"** is a bonafide work carried out by **Ms. Varsha Namdev Ghadi** under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

15/04/2024

Dr. Hemant B. Aiya

Date: 15/04/2024

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

School Stamp

Date: 15/4/2024.

Place: Goa University

मनोगत

खानापूर तालुक्यातील बोलीचा अभ्यास व्हावा असा विचार कला शाखेच्या तिसऱ्या वर्षामध्ये असताना माझ्या डोक्यात आला. परंतु काही कारणाने त्यावेळी या विषयावर अभ्यास होऊ शकला नाही. कोल्हापुरी, खानदेशी, अहिराणी, कोंकणी, बेळगावी, चंदगडी आदी बोलींचा अभ्यास बऱ्याच प्रमाणात झाला होता. परंतु खानापूर तालुक्यातील बोलीचा मात्र अभ्यास झाला नसल्याची खंत सतत मनात सलत होती. आपल्याही मातृभाषेचा म्हणजेच 'खानापुरी बोलीचा' अभ्यास व्हावा ही इच्छा मनी तशीच बाळगून ठेवली होती.

एम. ए. भाग एकच्या अभ्यास क्रमात भाषाविज्ञान हा पेपर आम्हाला लावला होता. या अभ्यासाच्या सादरीकरणाच्या निमित्ताने पुनः एकदा माझ्या मनातील इच्छेला चालना मिळाली. 'खानापुरी बोलीचा अभ्यास' हा विषय डॉ. हेमंत अय्या सरांनीच मला सुचविला व माझ्या मनातील इच्छेला वाट मोकळी करून दिली. त्यानंतर हाच विषय प्रबंधिकेसाठी मी निवडला व योगायोगाने डॉ. हेमंत अय्या सरच माझे मार्गदर्शक म्हणून मला लाभले.

'खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' हा विषय पक्का होताच मी संकलनाच्या कामला लागले. संकलनाच्यासाठी मला बरेच परिश्रम घ्यावे लागले. वेगवेगळया ठिकाणी भेट देऊन तेथील लोकांच्या मुलाखती घ्यायच्या होत्या. काही व्यक्ती तर ध्वनिमुद्रण किंवा विडियो काढणार म्हणून बोलत नव्हते. अशा अनेक अडचणींना मला सामोरे जावे लागले. या सोबतच पुस्तकांच्या शोधातही मी फिरत होते. तसेच इतर बोलींवर अभ्यासकांनी कशाप्रकारे अभ्यास केला आहे याची पाहणी होऊ लागली. त्याचबरोबर नवनवीन भाषेबद्धलच्या नोंदी मी करत गेले. मनातील सुप्त इच्छेला प्रत्यक्षात आणतानाचा आनंद हा अवर्णनीय होता.

एम. ए.च्या दुसऱ्या वर्षाला सुरुवात होताच प्रकरणाची मांडणी मार्गदर्शकांच्या मदतीने केली. विषयाला कोणत्या मार्गाने पुढे न्यावे याबद्धलची कल्पना या चर्चे दरम्यान आली. मी तयार केलेल्या कार्यक्रम तक्त्यानुसार खानापूरातील माजी शिक्षक श्री. नारायण गुरव यांची मुलाखत घेण्यात आली. त्यांच्या मुलाखतीतून एकंदर खानापूर तालुक्याचा इतिहास, भूगोल व व्यवसायाबद्धलची माहिती मिळाली. या खानापुरी बोलीवर आजवर अभ्यास झाल्याचे आढळले नसल्याने त्याबद्धलची अधिक

चौकशी करणे गरजेचे होते. याच दरम्यात बेळगाव जिल्ह्यातील लेखक विजयकुमार दळवी यांच्याशी संपर्क साधता आला. त्यांनी बेळगावी बोलीतून लिहिलेल्या लेखांचे पुस्तक माझ्या अभ्यासाठी पाठवले. कारण बेळगावी बोली ही खानापुरी बोलीच्या जवळ जाणारी आहे. याच दरम्यात बेळगावी बोलीवर शोधनिबंधाचे लेखन केलेल्या विजयालक्ष्मी देवगोजी यांच्याशी संवाद साधून भाषेबद्धलचा अभ्यास कसा केला जातो हे जाणून घेण्यात आले. यांच्याशी संवाद साधतान असे लक्षात आले की बेळगावी बोली सोबतच बेळगावच्या लोकसाहित्याचाही अभ्यास होत आहे. त्यानंतर याच लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्या वृशाली कदम यांच्याशी विषयाबद्धल चर्चा करताना त्यांनी खानापूर तालुक्यातील संस्कृती बद्धलची अधिकची माहिती मला दिली.

या प्रबंधिकेचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे सर्वेक्षण होय. या सर्वेक्षणामध्ये माझ्या सोबत माझे भाऊ श्री. खेमण्णा घाडी होते. यांच्याशिवाय हे सर्वेक्षण होणे अशक्य होते. खानापूर तालुक्यातील वेगवेगळया लोकांची मुलाखत घेताना माझ्या दादाची मला खूप मदत झाली. ख्रिस्ती धर्मियांची मुलाखत घेताना आम्ही दोघांनी 'इगर्जित' जाऊन हजेरी लावली. तेथे प्रार्थना कोणत्या भाषेत होते; तसेच फादर कोणत्या भाषेत लोकांशी संवाद साधतो हे मी निरीक्षण करत होते. मिस संपल्यावर आम्ही फादर कुस्तास लिमा यांची मुलाखत घेतली. तसेच इस्लाम धर्मातील 'रोहिणी' हिची मुलाखत घेऊन त्यांच्या भाषेत आढळणारी खानापुरी बोलीतील भाषिक नमुने गोळा केली. प्रबंधिकेच्या मर्यादेमुळे केवळ विविध धर्मानुसार खानापुरी बोलीतील भाषिक नमुन्यांचे संकलन करण्यात आले. फादर सोबतच ख्रिस्ती धर्मातील पोलासिन डिसोझा, कितेरीन डिसोझा, कायतान डिसोझा व प्रसिला फर्नांडिस यांची मुलाखत घेऊन भाषिक नमुन्यांचे संकलन करण्यात आले.

रामगुरवाडी व शिंदोळी या गावातील लोकांच्या मुलाखतीतून लोकगीते व भाषिक नमुने मिळविण्यात आली. तसेच सौ. लक्ष्मी गुरव, सौ. यशोदा गुरव, सौ. जानकी मोटर यांच्याकडूनही लोकगीतांचे संकलन करण्यात आले. मुळात लोकगीतांचे श्रेय मोठ्या प्रमाणात माझ्या आईला म्हणजेच सौ. चंदू नामदेव घाडी हीला मी देईन. कारण अनेक लोकगीते ही माझ्या आईनेच या प्रबंधिकेसाठी मला सांगितलेली आहेत. तसेच सर्वेक्षणादरम्यात खानापुरातील काही चाली -रितींबद्धलची माहिती मला

देण्यात आली नव्हती. कारण काही गोष्टींबद्धल बोलणे हे तेथील लोक अपशकुन मानतात. परंतु माझ्या आईने अशा विषयांची ही माहिती मला पुरविली.

सदर प्रबंधिकेच्या कामामुळे माझे भाषेबद्धलचे निरीक्षण वाढले. बोलताना बोलीतील एखादा नवखा शब्द कानी पडला की तो शब्द मी मोबाईलवर लिहून घेत असे. अशा वेळी मोबईलची मला खूप मदत झाली. आपल्या भाषेतही अनेक प्रकारचे साहित्य दडलेले आहे याची प्रचिती आली. बोली नष्ट व्हायच्या आधी ती जतन करणे हे महत्त्वाचे असते. अजूनही बोलीं विषयीचे अनेक गैरसमज समाजात आहेत. ग्रामीण भागातील बोलींना 'गावंढळ' म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. अशीच विचारसरणी खानापूर तालुक्यातील लोकांची देखील आहे. त्यामुळे 'खानापुरी बोली' नष्ट व्हायच्या आधी तिचे जतन करायचे कार्य परमेश्वर माझ्याकडून करून घेत आहे असे मला वाटते. तसेच आपल्याच बोलीबद्धची जाण, तिचे महत्त्व तेथील लोकांना निदर्शनास आणून देण्याचे काम सहजपणे मी घेतलेल्या मुलाखतीतून झाले आहे. मुलाखती दरम्यात झालेल्या चर्चेनंतर आपल्या बोलीतही अभ्यास करण्याजोगे खूप काही आहे हे तेथील लोकांना पटले. या बोलीवरही अभ्यास होऊ शकतो याची जाणीव त्यांना झाली.

सर्वप्रथम ऋण व्यक्त करताना माझे मार्गदर्शक डॉ. हेमंत अय्या सरांचे नाव आवर्जून घ्यावे लागते. डॉ. हेमंत अय्या सरांनी पदोपदी मार्गदर्शन केल्यामुळे या प्रबंधिकेचे काम यशस्वी रित्या झाले आहे. त्यांनी संशोधनबद्धलचे घालून दिलेले नियम, शिस्त त्यामुळे हे संशोधन वेळेवर पूर्ण करणे शक्य झाले आहे. त्यासाठी मी त्यांची ऋणी आहे.

गोवा विद्यापीठात मार्गदर्शकासोबतच मराठी अध्ययनशाखेतील इतर प्राध्यापकांनीही मला माझ्या प्रबंधिकेसाठी मदत केली आहे. तसेच खांडोळा महाविद्यालयातील प्राध्यापिका 'दुमती कुंभार' यांनी देखील मला वेळोवेळी या प्रबंधिकेसाठी मदत केली आहे. त्यासाठी मी त्यांची आभारी आहे. सर्वेक्षण करताना व खानापूर तालुक्यातील ग्रंथालयाला भेट देताना माझ्या सोबत श्री. खेमण्णा घाडी, श्री. राम घाडी, श्री. शाम घाडी यांनी मला सहकार्य केल्याबद्धल मी त्यांची ही आभारी आहे. मुलाखतीतून योग्य ती माहिती मला पुरविल्याबद्धल मी सर्व त्या मुलाखतदारांची आभारी आहे. याचबरोबर प्रबंधिकेच्या गटातील माझे मित्र ज्यांनी मला प्रबंध लेखनात मदत केली त्यांची ही मी ऋणी आहे. गोवा विद्यापीठातील ग्रंथालयाची या प्रबंधिकेसाठी खूप मदत झाली. आम्हाला ग्रंथलयातून

आमच्या विषयाशी निगडीत ग्रंथ पुरविल्याबद्दल मी गोवा विद्यापीठातील ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. हरिलाल मेनन यांचे आभार मानू इच्छिते. याचसोबत खानापूर तालुक्यातील वाचनालय, कुडचडे सरकारी ग्रंथालय येथील ग्रंथसंपदा माझ्या संशोधनासाठी उपयुक्त ठरली. त्यासाठी मी या सर्व संस्थेची आभारी आहे. तसेच मराठीअध्ययन शाखेचे कार्यक्रम संचालक श्री. विनय बापट सरांचे देखील मी आभार मानते.

माझ्या प्रबंधिकेच्या संशोधन कार्याच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत माझ्या कुटुंबाने मला खूप साथ दिली आहे. त्यामध्ये माझे वडील श्री. नामदेव रामा घाडी, आई सौ. चंदू नामदेव घाडी, भाऊ श्री. खेमण्णा ना. घाडी, वहिनी सौ. मधू खे. घाडी, सौ. कोमल ज्यो. मिराशी, बहीण सौ. रेणुका सं. शहापूरकर, काकी सौ. कविता तु. घाडी या सर्वांचे आभार मानावे तितके कमीच आहे. या सर्वांच्या पाठिंब्यामुळे व आशीर्वादामुळे हे संशोधन सद्य स्थितीत पूर्ण आहे. शेवटी कोणतेही काम फळाला नेताना आपल्या गुरूंची साथ असेल तर ते काम निर्विघ्नपणे पार पडते. मी माझ्या आध्यात्मिक गुरूंच्या म्हणजेच प. पू. कलावती आईंच्या चरणी वंदन करून ही प्रबंधिका गोवा विद्यापीठाच्या मराठी अध्ययनशाखेला सुपूर्त करत आहे. भविष्यात या विषयी आणखी सखोल आणि चिकित्सक पातळीवर संशोधनाची इच्छा मनात आहे.

वर्षा नामदेव घाडी

१५/०४/२०२४

खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास

अनुक्रमणिका

प्रकरण क्र.	प्रकरण	पृष्ठ संख्या
Declaration		
Completion Certificate		
मनोगत		i-iv
प्रस्तावना		1-5
१.	**भाषाविज्ञान आणि सामाजिक भाषा विज्ञान**	6-40
२.	**खानापूर प्रदेशातील लोकभाषा आणि संस्कृती**	41-72
३.	**खानापुरी बोलीतील भाषिक नमुने**	73-98
४.	**खानापुरी बोलीची वैशिष्ट्ये**	99- 119
५.	**निरीक्षणे आणि निष्कर्ष**	120-124
परिशिष्ट		125-137
संदर्भ सूची		138-141

तक्ते

तक्ता क्र.	तक्ता	पृष्ठ क्र.
२.१	खानापूर तालुक्यातील गावे	45
३.१	खानापुरी बोलीत येणारे इंग्रजी शब्द	85-86
३.२	खानापुरी बोलीत येणारे कन्नड शब्द	86
३.३	खानापुरी बोलीत येणारे कोंकणी शब्द	87
३.४	खानापुरी बोलीत येणारे पोर्तुगीज शब्द	87
४.१	‘व’ ऐवजी ‘इ’ व ‘य’ येणारे शब्द	105
४.२	‘ठ’ ऐवजी ‘ट’ येणारे शब्द	106
४.३	‘ढ’ ऐवजी ‘ड’ येणारे शब्द	106
४.४	खानापुरी बोलीतील क्रियापदे	107
४.५	खानापुरी बोलीतील संयुक्त क्रियापदे	108
४.६	केवलप्रयोगी अव्यय	109
४.७	खानापुरी बोलीतील क्रियापदे	110
४.८	खानापुरी बोली व बेळगावी बोली	115
४.९	खानापुरी बोली व कोंकणी भाषा	116
४.१०	खानापुरी बोली व कन्नड भाषा	116

प्रस्तावना

‘खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास’ असा या शोधप्रबंधिकेचा विषय आहे. प्रस्तुत प्रबंधिकेद्वारे कर्नाटक राज्यातील, बेळगाव जिल्ह्यात सामावलेल्या खानापूर तालुक्यातील बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास होणार आहे. इतर बोलींप्रमाणे खानापूर तालुक्यातील बोली ही सुद्धा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. या प्रदेशातील समाज व्यवस्था अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून येथील बहुतांशी लोकवस्ती ही लोकसंस्कृतीमध्ये सामावणारी आहे. असे असल्याने येथील लोक संस्कृतीचा आढावाही सदर प्रबंधिकेद्वारे होईल. समाजभाषाविज्ञानातील तत्वांच्या आधारे येथील समाज बोलीची वैशिष्ट्ये अधोरेखित करणे हा प्रस्तुत प्रबंधिकेचा हेतु होय.

सदर संशोधनाचा विषय ठरलेली बोली खानापूर तालुक्यातून दैनंदिन बोली व्यवहारात आणली जाते. केवळ हिंदू धर्मापूर्ती ही बोली सिमित नसून अन्य धर्मीय लोक देखील ही बोली वापरतात. रोटी-बेटी व्यवहारामुळे या बोलीत हिंदी, कोंकणी, कन्नड भाषेचा प्रभाव दिसतो. या सर्वांमुळे या बोलीचे ‘शाब्दिक भांडार’ समृद्ध झालेले आहे. भारत हा एक बहुभाषिक देश आहे. या बहुभाषिक देशात अनेक बोली आहेत आणि या प्रत्येक बोलींची आपली अशी काही वैशिष्ट्ये आहेत. ही मोठ्याप्रमाणात बोलींची संख्या आणि अभ्यासकांची मर्यादा त्यामुळे सगळयांच बोलींचा भाषिकदृष्ट्या अभ्यास होणे शक्य झालेले नाही. अशी वैशिष्ट्यपूर्ण एक बोली आढळल्याने या बोलीचा अभ्यास करण्याच्या हेतूने मी हा अभ्यास पुढे नेत आहे.

संशोधन विषयक समस्या

कर्नाटक राज्यातील खानापूर तालुक्यातील बोलीचा अभ्यास या प्रबंधिकेत होणार आहे. इतर मराठी बोलींप्रमाणे खानापूरातील बोली दैनंदिन व्यवहारात वापरली जाते. तिचे स्वतःचे असे वैशिष्ट्य असून हेल काढून ही बोली बोलली जाते. विपुल प्रमाणात या बोलीत मौखिक साहित्य दडलेले आहे. परंतु दैनंदिन व्यवहारात वापरली जाणारी ही भाषा दिवसेंदिवस लोप पावत आहे. अनेक भाषांचा प्रभाव असलेल्या ह्या बोलीवर शास्त्रीय आणि विद्यापीठ कक्षेतला अभ्यास होणे आवश्यक वाटले. सदर बोलीची

वैशिष्ट्ये, तिचे हेल, प्रमाण भाषेशी असलेले साम्यभेद आदी बोलीवैशिष्ट्ये समाजभाषाविज्ञानाच्या अंगाने स्पष्ट करण्यात येणार आहे.

संशोधनकार्याची उपयुक्तता /आवश्यकता.

'खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' या विषयांतर्गत खानापुरी बोलीच्या वैशिष्ट्यांवर भर देण्यात येणार आहे. विस्तीर्ण प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या या भाषेवर अन्य भाषांचा प्रभाव जाणवतो. या सर्व प्रभावातून पुढे आलेल्या बोलीतील साहित्य विशेष महत्त्वाचे आहे. सदर बोलीत असलेल्या शब्दसाठ्यांमुळे साहित्यातील शब्द-भांडार संपन्न होईल. तद्वत या बोलीतून लेखन केल्यास खानापूर क्षेत्राची व्यवसायासोबत भाषिक अंगाने ही नव्याने ओळख होईल. सदर बोलीत असलेली मौखिक साहित्य संपदा या अभ्यासाच्या माध्यमातून अभ्यासकांपर्यंत पोहोचेल. कर्नाटक राज्यातील उमरगा, बेळगावी बोली प्रमाणे खानापुरी बोलीचा ही समावेश संशोधनाच्या कक्षेत होईल. सदर बोलीत संशोधन झाल्याचे आढळत नसल्याने भविष्यात या बोलीत संशोधनाच्या वाटा मोकळया झालेल्या आहेत. कोणत्याही लोककेंद्री बोलीचा अभ्यास हा त्या भाषिक संवर्धनेच्या दृष्टीने महत्वाचा असतो. त्यामुळे त्याची उपयुक्तता राज्य, राष्ट्र, समाज या घटकांसाठीच असते.

संशोधनकार्यामागची उद्दिष्टे

खानापूर प्रदेशात प्रामुख्याने उपरोक्त खानापुरी बोलीचा वापर होतो. सदर बोलीच्या संशोधनाच्या मार्फत त्यांच्याच बोलीतील वैशिष्ट्यें, तिचे महत्त्व तिथल्या भाषिकांना तसेच इतरांना माहिती करून दिली जाणार आहेत. सदर बोलीचा अभ्यास करताना इतर मराठी बोलींची दखल घेतली जाणार आहे. खानापूर तालुक्यातील तिचे महत्त्व, तिथली संस्कृती, साहित्य सौंदर्य इत्यादींच्या अभ्यासामुळे सदर बोलीची व तिथल्या समाजाची विद्यापीठकक्षीय दखल घेतली जाईल. प्रस्तुत प्रबंधिकेतून मराठीतील इतर बोलीप्रमाणे स्वतंत्र अशी ओळख खानापुरी बोलीला प्राप्त होईल. तसेच या भाषेत लपलेली मौखिक परंपरा जसे लोकगीते, म्हणी, कोडी यांचा या अभ्यासाच्या माध्यमातून शोध घेण्यात येणार आहे. प्रमाण बोली प्रमाणे कोंकणी, हिंदी यांचा खानापुरी बोली सोबतचा तौलनिक अभ्यास होणार आहे. तसेच खानापुरी बोलीतील शब्दांचा संग्रह करण्यात येईल.

गृहितकांची मांडणी

१. खानापूर तालुक्याच्या बोलीवर कन्नड भाषेचा प्रभाव दिसून येतो.
२. कोंकणी भाषेतील ‘हेल’ आणि शब्दांचे उपयोजन या भाषेतून होते.
३. कन्नड प्रमाणेच कोंकणी भाषेचा प्रभावही खानापुरी बोलीवर दिसतो.
४. या बोलीतील हेल काढून बोलण्याची तऱ्हा वैशिष्ट्यपूर्ण आहे.
५. कन्नड, कोंकणी, इंग्रजी, हिंदी, पोर्तुगीज आदी भाषेतील शब्दही खानापुरी बोलीत आढळतात.
६. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशा समाजभाषावैज्ञानिक तत्त्वांनी खानापुरी बोली आकारलेली आहे.

संशोधन पद्धती

खानापुरी बोलीचा अभ्यास हा समाजभाषाविज्ञानाच्या अंगाने जाणारा आहे. या बोलीचे संशोधन करण्यासाठी प्रत्यक्ष त्या प्रदेशात जाऊन भाषिक संकलन करावे लागते. तेथील माणसे कशी बोलतात, बोलताना कोणत्या शब्दांवर ते जोर देतात आदींची नोंद संकलनाच्या दरम्यात करावी लागते. तद्वत खानापुरी बोलीतील मौखिक साहित्याचेही संकलन करावे लागते. त्यासाठी सर्वेक्षण पद्धती, तौलनिक पद्धती व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब सदर संशोधनात होणार आहे.

१. सर्वेक्षण पद्धती

सदर प्रस्तावित विषयाचे संशोधन करत असताना सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. खानापूर प्रदेशातील विविध व्यक्तींच्या मुलाखती घेऊन त्याद्वारे येथील भाषिक संस्कृती, राहणीमान, लोकव्यवहार आदींची माहिती मिळवली जाईल. तसेच येथील बोलीचे काही नमूनेही अत्यंत शासकीय तत्त्वांच्या आधारे संकलित केलेले आहेत.

२. तौलनिक पद्धती

तौलनिक संशोधन पद्धतीचा वापर करून खानापुरी बोलीची इतर जवळच्या बोलींशी तुलना करण्यात येणार आहे. तद्वत गोमंतकातील कोंकणी व कर्नाटकातील कन्नड या जवळच्या भाषांशी सदर बोलीची तुलना केली जाणार आहे.

३. वर्णनात्मक पद्धती

खानापुरी बोलीच्या अभ्यासासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल. त्यात बोलीचे लिंग, वचन, क्रियापदाच्या अंगाने विश्लेषण केले जाणार आहे. तसेच म्हणी, कोडी, गीते यांच्याही अंगाने सदर बोलीचे वर्णनात्मक समालोचन केले जाईल. कोंकणी भाषेसोबतच प्रमाण भाषेची खानापुरीशी वर्णनात्मक तुलना शक्य आहे.

प्रकरणांची मांडणी

खानापूरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास	
प्रकरण १.	भाषाविज्ञान आणि सामाजिक भाषाविज्ञान
प्रकरण २.	खानापूर प्रदेशातील लोकभाषा आणि संस्कृती
प्रकरण ३.	खानापूरी बोलीतील भाषिक नमुने
प्रकरण ४.	खानापूरी बोलीची वैशिष्ट्ये
प्रकरण ५.	निरीक्षणे आणि निष्कर्ष

समारोप

'खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' या विषयांतर्गत खानापूर तालुक्यातील बोलीचा अभ्यास होणार आहे. ही बोली इतर बोलींप्रमाणेच आपल्या अशा वेगळ्या भाषिक सौंदर्याने नटलेली आहे. ही बोली मोठ्या प्रमाणात खानापूर तालुक्यात बोलली जाते. व्यवहारातदेखील हीच भाषा वापरली जाते. या भाषेवर कन्नड भाषेचा प्रभाव जास्त प्रमाणात दिसून येतो. तसेच कोंकणी, हिन्दी, पोर्तुगीज भाषेचाही प्रभाव दिसून येतो. हेल काढून ही बोली बोलली जाते. स्त्रियांच्या तोंडून पुल्लिंगी क्रियापदे येतात. तसेच लिंग वचनाच्या बाबतीत देखील तिचे वैशिष्ट्य दिसून येते. इतर बोलींप्रमाणे या ही बोलीत म्हणी, वाक्प्रचार, गीते आढळतात.

व्याकरणीक दृष्ट्या खानापुरी बोलीचा अभ्यास होणार आहे. बोलीसोबतच तेथील संस्कृती देखील या प्रबंधिकेचा भाग असणार आहे. दुसऱ्या बोलींवर झालेल्या अभ्यास ग्रंथांचा वापर या प्रबंधिकेत होणार आहे. तसेच काही मुलाखती देखील या प्रबंधिकेसाठी घेतल्या जातील. सदर प्रबंधिकेकरीता वर्णनात्मक पद्धती, तुलनात्मक पद्धती व सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकरण १

भाषाविज्ञान आणि सामाजिक भाषाविज्ञान

प्रास्ताविक..8

१.१ मानवी भाषेची लक्षणे 9

१.२ भाषाशास्त्र आणि भाषाविज्ञान 11

१.२.१ भाषाशास्त्र 12

१.२.२ भाषाविज्ञान 13

१.२.३ फेर्दिनां द सोस्यूर 14

१.२.४ नोम चॉम्स्की..15

१.२.५ भाषाशास्त्र आणि भाषाविज्ञान भेद 15

१.३ आधुनिक भाषाविज्ञानातील घटक..16

१.३.१ स्वनविचार 16

१.३.२ स्वनिमविचार 17

१.३.२. स्वनांतरे 17

१.३.३ पदविचार / रूपिम विचार 18

१.३.३.१ रूपिम 18

१.३.३.२ रुपिकांतर 19

१.३.४ वाक्यविचार 20

१.३.५ अर्थविचार...21

१.४ भाषाविज्ञान आणि भाषाविज्ञानाची अनेक क्षेत्रे 21

१.४.१ ऐतिसाहिक भाषाविज्ञान 22

१.४.२ वर्णनात्मक भाषाविज्ञान 23

१.४.३ सामाजिक भाषाविज्ञान 25

१.५ समाजभाषाविज्ञानाचे घटक...26

१.५.१ भाषिक भांडार (Linguistic Verbal) 26
१.५.२ लघुक्षेत्र (Domain) 27
१.५.३ भाषिक प्रभावक्षेत्र........ 28
१.५.४ भाषाव्यवहार........ 28
१.५.५ द्वैभाषिकता व बहुभाषिकता (Bilingual & Multilingualism)........ 28
१.५.६ भाषाद्वित्व (Diaglossia) 29
१.५.७ भाषामिश्रण आणि भाषापरिवर्तन........ 30
१.५.८ भाषाबदल 30
१.५.९ भाषानिषिद्धता 31
१.५.१० भाषाप्रदूषण 31
१.६ प्रमाण मराठी भाषा आणि बोली 32
१.६.१ प्रमाणभाषा आणि बोली सहसंबंध........ 33
१.६.२ बोली आणि गैरसमज 34
१.६ समारोप........ 35
१.७ निष्कर्ष 36
संदर्भ 36

प्रकरण १

भाषाविज्ञान आणि सामाजिक भाषाविज्ञान

प्रास्ताविक

भाषेचा मानवी जीवनाशी जवळचा संबंध असतो. प्रत्येक व्यक्ती आपले दैनंदिन व्यवहार किंवा विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी कोणत्या तरी भाषेचा आधार घेते. समाजातील प्रत्येक व्यक्तीजवळ भाषेची नियमव्यवस्था जाणून घेण्याचे सामर्थ्य उपजत असते. अशा सामर्थ्याला **'भाषिक क्षमता'** असे **नोम चॉम्स्की** या भाषावैज्ञानिकाने म्हटलेले आहे. 'भाषिक क्षमता' ही केवळ माणसाला दिलेली देणगी आहे. त्यामुळे घरात पाळलेल्या कुत्र्याला आपली भाषा बोलता येत नाही. परंतु प्राण्यांची स्वत:ची अशी एक विशिष्ट भाषा असते. ज्यातून ते एकमेकांना संदेश पाठवतात. मोर-लांडोराचे नृत्य, गाईचे हंबरणे, पक्ष्यांची चिवचिव, कोंबड्यांचे आरवणे आदी प्राण्यांच्या संप्रेषणाचे प्रकार आहेत. मानवी भाषा जरी सोपी असली तरी ती शिकावी लागते व तिचे स्वरूप हे गुंतागुंतीचे असते. अशा मानवी भाषेचा अभ्यास अनेक भाषावैज्ञानिकांनी केलेला आहे. यामध्ये **फेर्दिनां द सोस्यूर**, **नोम चॉम्स्की**, **सी. एफ. हॉकेट, लेनार्ड ब्लूमफील्ड** या भाषावैज्ञानिकांची नावे आवर्जून घेतली जातात. तसेच समाजभाषावैज्ञानिकाचा अभ्यास **एमिल ड्यूरखाईम** या अभ्यासकाने केला आहे.

पहिल्या प्रकरणात भाषाविज्ञान व समाजभाषाविज्ञानासंदर्भात विवेचन केलेले आहे. 'सी. एफ. हॉकेट' यांनी सांगितलेली भाषेची सात प्रमुख लक्षणे सांगितलेली आहेत. भाषाशास्त्र व भाषाविज्ञान यातील भेद सांगून 'लेनार्ड ब्लूमफील्ड' या भाषावैज्ञानिकाने सांगितलेल्या घटकाचे विवेचन करण्यात आले आहे. भाषाभ्यासाचे क्षेत्र व्यापक असल्याने भाषाविज्ञानातील क्षेत्रांचा विचारही या प्रकरणाद्वारे करण्यात आला आहे. प्रकरणाच्या एका अनुच्छेदात समाजभाषाविज्ञानाच्या घटकांचा विचार करण्यात आला आहे. तसेच प्रमाणभाषा व बोली यावरही विवेचन करण्यात आले आहे.

१.१ मानवी भाषेची लक्षणे

मानवी जीवनात भाषेमुळे संप्रेक्षण प्रक्रिया गतिशील बनते. माणसांप्रमाणेच प्राण्यांमध्येही संप्रेक्षण प्रक्रिया सुरू असते. परंतु मानवाजवळ असलेल्या साधन निर्मिती क्षमतेमुळे इतर प्राण्यांच्या तुलनेत मानव वेगळा ठरतो. भाषा हे त्यातील एक महत्त्वाचे साधन आहे. ‘भाषा वापरणारा प्राणी अशी माणसाची एक व्याख्या केली जाते.’[1] त्यामुळे प्राण्यांपेक्षा माणसांची भाषा वेगळी ठरते. जगातील सर्व भाषा ह्या एकमेकींपासून वेगळ्या आहेत. त्यांची स्वतःची अशी वेगळी व्यवस्था असली तरी काही प्रमाणात त्यांच्यात सारखेपणा आढळतो. भाषेच्या वैशिष्ट्यांचा विचार अनेक भाषा अभ्यासकांनी केला असून **सी. एफ. हॉकेट** या प्रसिद्ध भाषावैज्ञानिकाने भाषेची सात प्रमुख लक्षणे सांगितली आहेत.

१. द्विस्तरीय रचना

मानवी मुखावाटे उच्चारल्या जाणाऱ्या ध्वनींची संख्या ३०-७० एवढी आहे. त्यामुळे सर्व ध्वनींना अर्थ असतोच असे नाही. पण त्यांची हवी तशी सानुक्रम रचना करता येते.

उदाहरण - अ, न्, क् या मूलध्वनींना मराठी भाषेत स्वतंत्र असा अर्थ नाही. पण तेच जर न्+आ+क्+अ अशी जुळणी केल्यास ‘नाक’ असा अर्थपूर्ण शब्द तयार होतो.

त्यामुळे मूलध्वनींचा मर्यादित साठा हा भाषेचा एक स्तर व त्याची अर्थपूर्ण रचना करून निर्माण केलेले अगणित अर्थ हा भाषेचा दुसरा स्तर आहे. प्राण्यांच्या भाषेत अशी द्विस्तरीय रचना नसून एका संकेतासाठी एक मूलध्वनी अशी पद्धत असते.

२. निर्मितीशिलता

माणूस भाषेमध्ये पूर्वी कधीही न ऐकलेले किंवा उच्चारलेले असे नवीन वाक्य उच्चारतो. तसेच ऐकणाऱ्यालाही नवीन उच्चारण फारसे प्रयत्न न करता समजते. कारण प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यात एक भाषिक व्यवस्था सिद्ध झालेली असते. जेणेकरून तिच्यातून अनेक वाक्ये बनवता येतात. मानवी भाषेचे अजून एक वैशिष्ट्य ते म्हणजे माणसाकडे एकच आशय व्यक्त करण्यासाठी अनेक माध्यमे उपलब्ध असतात. तर प्राण्यांच्या भाषेत तसे नसते. भीती हा आशय व्यक्त करण्यासाठी प्राणी विशिष्ट असा एकच ध्वनी वापरतो. परंतु माणसाकडे मात्र हीच भावना व्यक्त करण्यासाठी अनेक माध्यमे उपलब्ध असतात.

३. अदलाबदल

एकमेकांच्या भाषिक रचना एकमेकांना समजणे आणि त्यांनी त्या पुन्हा वापरणे हे मानवी भाषेत शक्य असते. त्यामुळे बोलणाऱ्याच्या भाषिक रचना ऐकणाऱ्याला समजतात व प्रसंगी ऐकणारा त्या रचना स्वतः वापरू शकतो. अशाने मानवी भाषेत बोलणारा व ऐकणारा भाषिक अदला-बदल करू शकतो. भाषेच्या या लक्षणाचे फायदे असे आहेत की माणूस अनुकरणाने कोणतीही भाषा शिकू शकतो. तसेच मानवी भाषेतील नवीन रचना इतरांना सहज आत्मसात करता येतात.

४. यादृच्छिकता

यादृच्छिकता हे भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. अर्थ किंवा आशय सुचन करण्यासाठी सर्व मानवी भाषा यादृच्छिकतेचे तत्त्व उपयोजिताना दिसतात. भाषेमध्ये होणारे बदल हे यादृच्छिकतेमुळे शक्य होते. ध्वनी तेच राहतात पण शब्दांचे अर्थ बदलतात. तर काही वेळा याच्या उलट होते. भाषेच्या या गुणतत्त्वामुळे जुने भाषिक संकेत टाळून नवीन संकेत निर्माण करता येतात. तसेच संकेतांमध्येही बदल करता येतात. यादृच्छिकतेमुळे माणूस सभोवतालच्या सृष्टीतील कोणत्याही नवीन अनुभवाला भाषेच्या माध्यमातून सामोरे जाऊ शकतो. तद्वत यादृच्छिकतेमुळेच जगातील विविध भाषा एकमेकींपासून वेगळया आणि स्वतंत्र आहेत.

५. विशिष्ठता

प्राण्यांच्या भाषेच्या तुलनेत मानवी भाषेत विशिष्ठता दिसून येते. संदेश सुचनाची प्रक्रिया आणि मानवी संदेश या दोन्हीमध्ये कोणत्या स्वरूपाचा संबंध आहे. यावर संदेश वाहक प्रणालीची विशिष्ठता अवलंबून असते. व्यवहारामध्ये मानवी संप्रेक्षण शारीरिक पातळीवरील हालचालींचा उपयोग करून दिला जाणारा संदेश आणि ध्वनीसंकेताचा वापर करून दिला जाणारा संदेश यामध्ये फरक असतो. रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणे व आपण रेल्वेगाडी सुरू करून निघण्याची क्रिया या संदेशनामध्ये प्रत्यक्ष कार्यकारण संबंधाचे नाते आहे. प्रवास करताना काही वेळा एखाद्याने जर अपघातामुळे रस्ता बंद आहे असे सांगितल्यास आपण आपला मार्ग बदलतो. इथे प्रत्यक्ष कृती न पाहता सूचित होते. भाषेच्या या विशिष्टतेमुळेच संदेशन व्यवहार सुलभ होतो.

६. स्थलकालातितता

स्थळ आणि काळ ओलांडून जाण्याची शक्ति ही केवळ भाषेत असते. एखादी वस्तु समोर नसतानाही त्याचे सूचन भाषेद्वारे करता येते. विशिष्ट राजवटीचा इतिहास, एखाद्या स्थळाचे वर्णन, स्वतःच्या भविष्याबद्धलचे कथन भाषेद्वारे करता येते. स्थलकालातिततेच्या लक्षणामुळेच माणूस आपली अभिव्यक्ती भविष्यासाठी राखून ठेऊ शकतो.

७. सांस्कृतिक संक्रमण

भाषेचा वारसा किंवा तिची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्त केली जाते. ही भाषा पुढच्या पिढीकडे सुपूर्त करताना चालू पिढी तिच्यात भर घालत असते. अशा प्रकारे मूळ परंपरा व वर्तमान पिढीने त्यात घातलेली भर यासह नवीन पिढी भाषा शिकत असते. या भाषेतून समाजाची संस्कृती, परंपरा, श्रद्धा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविल्या जातात. ही प्रक्रिया मानवी भाषेच्या संदर्भात घडत असते. कारण प्राण्यांप्रमाणे माणसाला भाषा जन्मजात येत नसते. तर ती त्याला अनुकरणातून शिकावी लागते. म्हणून संस्कृतीचे संवर्धन आणि पुढील पिढीकडे संक्रमण करणे ही भाषेची महत्त्वाची क्षमता आहे. तसेच **लेनार्ड ब्लूमफील्डने** भाषेचे जे पाच स्थर मांडले त्यात **हॉकेट** या भाषावैज्ञानिकाने थोड्या प्रमाणात बदल केला. पदविचार आणि वाक्यविचार यांचा व्याकरण या शीर्षकाखाली एकत्र विचार केला आहे.

१.२ भाषाशास्त्र आणि भाषाविज्ञान

भाषाशास्त्र हे कला आणि शास्त्र यांना जोडणारा दुवा आहे. यात मानवी मुखातून निर्माण होणाऱ्या ध्वनीभाषेचा अभ्यास केला जातो. यामध्ये लिखित भाषा आणि बोली यांचे निरीक्षण, पृथक्करणातून वस्तुनिष्ठतेने अभ्यास केला जातो. भाषेतील घटक, कार्यपद्धती त्यांचे असलेले परस्पर संबंध आदी विषयक सिद्ध केलेले सिद्धांत हे व्यक्तीसापेक्ष न राहता त्यात व्यक्तीनिरपेक्षता येते.[2] तर भाषाविज्ञानामध्ये भाषेचा व्याकरणिकदृष्टीने अभ्यास केला जातो. भाषेच्या उच्चारप्रक्रियेवर भर देऊन भाषेचे वेगवेगळे नमुने गोळा करून त्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास भाषाविज्ञानात केला जातो.

१.२.१ भाषाशास्त्र

आज जरी 'भाषाशास्त्र' हे नाव रूढ झाले असले तरी सुरुवातीला अनेक अभ्यासकांनी भाषाशास्त्राला अनेक नावे सुचविली होती. तसेच व्याकरण आणि भाषाशास्त्र एकच मानले जात असल्याने त्याला **'तुलनात्मक व्याकरण'** Comparative Grammar असेही नाव होते. पण नंतर भाषाशास्त्राला 'तुलनात्मक व्याकरण' असे संबोधणे उचित नसल्याचे अभ्यासकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी 'तुलनात्मक व्याकरण'च्या ऐवजी **'तुलनात्मक भाषाशास्त्र'** (Comparative philology) हे नाव प्रचलित केले. भाषाशास्त्रासाठी 'philology' हे नाव आजही प्रचलित आहे. **'Philos'** म्हणजे **'प्रेम'** आणि **'Logos'** म्हणजे **'बोलणे'** असा त्याचा अर्थ अभिप्रेत असून 'Philos' या ग्रीक शब्दापासून तो तयार झाला आहे. याच शब्दाचे लॅटिनमध्ये **'Philologia'** तर फ्रेंचमध्ये **'Philologie'** असे रूप झालेले आहे. सुरुवातीला या शब्दाचा अर्थ इंग्रजीत व्याकरण, साहित्यसमीक्षा, साहित्य आणि ज्ञान याविषयीचे प्रेम असा होता. तसेच **Comparative** हा शब्द कालांतराने नष्ट होऊन केवळ 'Philology' हाच शब्द व्यापक अर्थाने रूढ झाला. 'Philology' या शब्दात व्याकरण, भाषांचा अभ्यास, शब्द व्युत्पत्ती, साहित्य, समीक्षा आणि ज्ञानाविषयीची आवड इ. अर्थ समाविष्ट आहेत. त्याचसाठी 'केवळ भाषा हेच त्याचे एकमेव उद्दिष्ट नाही, असे सोस्यूरने म्हटले आहे'.[3] जरी 'Philology' हा शब्द व्यापक अर्थाला कवेत घेणारा असला तरी 'भाषाशास्त्राचा' नेमका आणि काटेकोर अर्थ व्यक्त करू शकत नाही. त्यासाठी **'Science of Language'** हा शब्द जरी रूढ'[4] झाला असला तरी पुढे मात्र केवळ **Linguistics** याच नावाने प्रचलित झाला आहे.

भाषाशास्त्र हे कला आणि शास्त्र यांना जोडणारा दुवा आहे. कारण भाषाविज्ञानातील अभ्यासघटक हे कला आणि शास्त्र यांच्याशी संबंधित असतात. उदाहरणार्थ - *'ध्वनिविचार' या घटकाचा संबंध शरीर शास्त्राशी आहे तर 'अर्थ' आणि 'शैली' या घटकांचा संबंध समाजशास्त्र आणि मानसशास्त्र या सामाजिक शास्त्रांशी आहे. त्यामुळे या दोन्हींची लक्षणे भाषाविज्ञानात दिसून येतात.'*[5] कोणतेही शास्त्र जसे अनुभवाने सिद्ध होते तद्वत भाषाशास्त्रही असेच अनुभवाने सिद्ध होणारे शास्त्र आहे. भाषेत मूलभूत घटक असणाऱ्या ध्वनींचे निरीक्षण करून तो ध्वनी कानांनी ऐकणे व त्या ध्वनीची निर्मिती होताना मुखाची हालचाल पाहणे या सर्व बाबींचे यंत्राच्या साहाय्याने निरीक्षण करता येते. विविध प्रयोगांच्या साहाय्याने अचूक श्रवण करून त्या ध्वनींचे

विश्लेषण व निरीक्षण करता येते. या सर्वातून सिद्ध होणाऱ्या अभ्यासातून भाषेविषयी सिद्धांत प्रस्थापित करून किंवा प्रस्थापित सिद्धांतांची पुन्हा तपासणी करून आवश्यक तेथे बदल करण्याचे कार्य सतत भाषाशास्त्रात घडत असल्यामुळे हे प्रयोगाधिष्ठित शास्त्र ठरते.

भाषाशास्त्राचा अभ्यास हा लिखित भाषा आणि बोली यांच्या निरीक्षणातून, पृथक्करणातून वस्तुनिष्ठतेने करता येतो. यात भाषेतील घटक, त्यांची कार्यपद्धती, त्यांचे असलेले परस्पर संबंध इ. विषयक सिद्धांत विश्लेषणातून सिद्ध केले जातात. त्यामुळे हे सिद्धांत व्यक्तीनिरपेक्ष असतात. भाषेच्या या वस्तुनिष्ठ, व्यक्तीनिरपेक्ष, मर्यादित पारिभाषिक संकल्पना आदी बाबी भाषाशास्त्राची शास्त्रीयता सिद्ध करते. 'भाषाशास्त्रात भाषेचाच अभ्यास अभिप्रेत असला तरी त्यात हावभाव, पशुपक्षी, चिन्हे, चित्रे या भाषांचा अंतर्भाव होत नाही. भाषाशास्त्र हे मानवी मुखेंद्रियातून निर्माण होणाऱ्या ध्वनिभाषेचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. म्हणूनच भाषाशास्त्र म्हणजे भाषेचा शास्त्रशुद्ध अभ्यास ठरतो'.[6] त्यामुळे मानवनिर्मित भाषा हीच भाषाभ्यासाचे साधन व साध्य ठरते व भाषेव्यतिरिक्त अन्य शास्त्रासाठी भाषा हे केवळ साधन ठरते. भाषाशास्त्रासाठी 'भाषा' हेच साधन व साध्य असल्याने अभ्यासकाला कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असे म्हणता येत नाही.

१.२.२ भाषाविज्ञान

भाषा हा एक सामाजिक ध्वनी - अर्थ संकेत प्रणाली आहे. "भाषा ही प्रकटीकरण आणि निवेदनाचे तत्वत: परिपूर्ण साधन आहे".[7] हे विधान **एडवर्ड सपीर** या भाषावैज्ञानिकाने केलेले असून यातून भाषाभ्यासाचे महत्त्व लक्षात येते. ध्वनींचा भाषेत योग्य वापर करून घेण्याची कला प्रत्येक समाजाला अवगत असते. भाषेच्या या वैशिष्ट्यांमुळे भाषेचा शास्त्रीय अभ्यास करणे शक्य होते.

शास्त्रशुद्ध अभ्यासासाठी भाषेत शिस्त आणि विशिष्ट पद्धती आवश्यक आहे. तसेच भाषेचा अभ्यास करणे शक्य झाल्यामुळे भाषेचे कार्य, तिचे स्वरूप कळणे शक्य झाले आहे. अनेक काळापासून **'भाषाविज्ञान'** या शाखेसाठी **'भाषाशास्त्र'** हा शब्द प्रचलित होता. अर्थावरून भाषेतील ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास भाषाविज्ञानात अपेक्षित असतो. भाषाविज्ञानामध्ये शुद्ध -अशुद्ध अशी भाषेची संकल्पना नसून सर्व भाषा एकाच स्तराच्या असतात हे सिद्ध केले जाते. प्रत्येक भाषेत व्याकरण असते; पण ते व्याकरण

म्हणजे भाषाविज्ञान नसून व्याकरण हे भाषाविज्ञानाचा एक स्वरूपरूपी घटक आहे. भाषाविज्ञानात भाषेच्या वर्तमानकालीन रूपाचा तसेच तिचा इतिहास आदींचा अभ्यास होत असतो.

प्रत्येक समाजाची वेगवेगळी भाषा असते. त्या प्रत्येक भाषेला लिपी असतेच असे नाही. तरी त्या भाषेतून संप्रेषणाचे कार्य होत असते. अशिक्षित माणूसही अशी भाषा वापरतो. यावरून असे लक्षात येते की 'बोलणे' हे भाषेचे मुख्य रूप असून 'लिहिणे' हे दुय्यम व नंतर निर्माण झालेले रूप होय. लेखन ही ज्ञान टिकविण्याची सोय आहे. लिपीवरून भाषेच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येतोच असे नाही. लिहिण्यापलिकडे भाषेचे वेगवेगळे वापर असतात. भाषाविज्ञानामध्ये या साऱ्यांचा विचार करावा लागतो. त्यासाठी आधुनिक भाषाविज्ञान उच्चारप्रक्रियेवर जास्त भर देते. त्यामुळे भाषेचे वेगवेगळे नमुने गोळा करून त्यांचा अभ्यास करणे ही पद्धत शास्त्रशुद्ध मानली जाते. ध्वनींच्या निर्मितीपासून भाषाभेदांपर्यंत भाषेच्या वेगवेगळया अंगांचा विचार भाषाविज्ञानाच्या कक्षेत केला जातो.

१.२.३ फेर्दिनां द सोस्यूर

आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया **फेर्दिनां द सोस्यूर** या स्विस भाषावैज्ञानिकाने घातला. तत्पूर्वी पाणिनीने संस्कृत भाषेचा अभ्यास वर्णनात्मक पद्धत वापरुन केला. सोस्यूरने ऐतिहासिक / कालक्रमिक आणि वर्णनात्मक / एककालिक या अभ्यासपद्धती मधला फरक स्पष्ट करून सांगितला असून **'एककालिक'** व **'कालक्रमिक'** भाषाभ्यास या भेदाची प्रेरणा आहे. भाषा ही परिवर्तनशील असली तरी एका कालखंडातील भाषा स्थिर मानून तिचा अभ्यास करता येतो. भाषिक परिवर्तन म्हणजे एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीकडे वळणे होय. या सोस्यूरच्या विवेचनामुळे भाषिक स्थितीचे विश्लेषण आधुनिक भाषाविज्ञानात महत्त्वाचे ठरले आहे.

सोस्यूरने एककालिक भाषिक विश्लेषणामध्ये पायाभूत ठरणाऱ्या 'व्यवस्था' किंवा 'संरचना' या संकल्पना मांडल्या. भाषा ही 'चिन्ह व्यवस्था' किंवा 'चिन्ह संरचना' असते. व्यक्तीनुसार बोलण्याची किंवा ऐकण्याची क्रिया वेगळी असते. प्रत्येक व्यक्तीच्या काही सवयी, काही लकबी असतात. व्यक्तीनुसार जरी शब्दाचे उच्चारण वेगळे होत असले तरी त्यातून नेमका तोच संदेश पोहोचतो. 'सोस्यूरने केलेला **भाषिक वर्तन**

(Parole) व **व्यवस्था** (Langue) हा भेद किंवा वेगळ्या शब्दात **'भाषण'** (Speech) व **'भाषा'** (Language) हा भेद आधुनिक भाषाविज्ञानात एक मौलिक भेद मानला जातो'.[8]

१.२.४ नोम चॉम्स्की

नोम चॉम्स्की या अलीकडच्या अभ्यासकाने केलेला **भाषिक प्रयोग** (Performance) व **क्षमता वा प्रभुत्व** (Competence) हा भेद जरी सोस्यूरच्या भेदाशी तंतोतंत जुळत नसला तरी त्याच्याशी नाते सांगणारा आहे. काहीवेळा आपण बोलताना अडखळतो किंवा अस्पष्ट बोलत असलो तरी त्याचे संदेशन व्यवस्थित होते. याचे कारण ऐकणाऱ्याला व बोलणाऱ्याला भाषेची नियमव्यवस्था अवगत असते. भाषिक नियमव्यवस्थेचे हे ज्ञान म्हणजे चॉम्स्कीची 'भाषिक क्षमता' होय. आधुनिक भाषाविज्ञानात सोस्यूर व चॉम्स्कीचे योगदान मोलाचे ठरते.

भाषाविज्ञान ही संज्ञा वर्णनात्मक आहे. एखादा भाषिक समाज त्यांच्या दैनंदिन व्यवहारात जी भाषा वापरतो तीच भाषा भाषाविज्ञानाच्या अभ्यासासाठी महत्त्वाची ठरते. व्यवहार भाषेचा अभ्यास करून भाषाविज्ञान सार्वत्रिक नियम शोधण्याचा प्रयत्न करते. परंतु असे नियम शोधताना त्या भाषेच्या पारंपरिक किंवा आदेशात्मक नियमांचा विचार केला जात नाही. तर भाषाविज्ञान हे वस्तुनिष्ठ दृष्टीने भाषेकडे पाहते. भाषेच्या वर्णनात्मक नियमाला महत्त्व देते.

१.२.५ भाषाशास्त्र आणि भाषाविज्ञान भेद

अर्थावरून भाषेतील ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास भाषाविज्ञानात अपेक्षित असतो. तर भाषेची संरचना, भाषविकास, तिचा अन्य भाषेशी असणारा संबंध इत्यादींचा अभ्यास भाषाशास्त्रात होतो. 'Philology' आणि 'Linguistics' या दोहोंमधील सूक्ष्म फरक नोंदविताना **'डेव्हिड क्रिस्टल'** या अभ्यासकाने **Linguistics**मध्ये कोणता अभ्यास अपेक्षित असतो हे सांगितले आहे. या अभ्यासकांच्या मते भाषाविज्ञान म्हणजे भाषेचा ऐतिहासिक अभ्यास, तुलनात्मक अभ्यास, बहुभाषाभ्यास यापैकी काहीही नाही. मात्र भाषेच्या कालिक भेदांचा अभ्यास भाषाशास्त्रात केला जात असला तरी दोन कालखंडामध्ये एकाच भाषेचा व्याकरणिकदृष्टीने अभ्यास करणे किंवा तिच्या उत्क्रांतीचा इतिहास पाहणे भाषाशास्त्रात अपेक्षित नसते.

भारतीय अभ्यासकांनीही या शास्त्राचा अभ्यास केला असून त्यांनी देखील भाषाशास्त्र या संज्ञेबरोबरच भाषातत्त्व, भाषाविज्ञान, भाषविचार आदी संज्ञाही स्वीकारल्या होत्या. परंतु आज **‘भाषाविज्ञान’** हीच संज्ञा रूढ झाली आहे.

१.३ आधुनिक भाषाविज्ञानातील घटक

विसाव्या शतकात भाषाविज्ञानाच्या क्षेत्रातील सर्वात प्रभावशाली ज्ञानशाखा ही ‘संरचनावादी’ शाखा असून तिचा उगम अमेरिकेत झाला. म्हणून त्याला **‘अमेरिकन संरचनावाद’** असे म्हणतात. या संरचनावादी शाखेचा प्रणेता प्रसिद्ध भाषावैज्ञानिक ब्लूमफील्ड होता. **लेनार्ड ब्लूमफील्ड** हा वर्तनवादी मनोविज्ञानाचा अभ्यासक होता. भाषा ही एक प्रकारचे वर्तन असून तिचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करता येतो असे ब्लूमफील्डचे मत होते.[9] भाषेच्या अभ्यासासाठी ब्लूमफील्डने स्वनविचार, स्वनिमविचार, पदविचार, वाक्यविचार व अर्थविचार असे पाच स्थर मानले आहेत.

१.३.१ स्वनविचार

‘मानवी मुखाद्वारे वेगवेगळे ध्वनी निर्माण करता येतात. पण ते सर्वच ध्वनी भाषेत वापरता येतातच असे नाही. मुखावाटे निर्माण झालेल्या व भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनींना ‘स्वन’ असे म्हणतात’.[10] आज ज्याला आपण स्वन म्हणतो त्यालाच पारंपरिक व्याकरणात ‘ध्वनी’ असे म्हटले जात होते. ध्वनी म्हटले तर त्यात सर्व ध्वनींचा समावेश होतो. जसे- प्राण्यांचा आवाज, पक्षांची चिवचिव, जांभईचा आवाज, इ. पण हे सर्व स्वन नाहीत. तसेच यांचा वापर भाषेत केला जात नाही. त्यासाठी ध्वनी व स्वन यातील फरक स्पष्ट व्हावा म्हणून ‘ध्वनी’ ही संज्ञा न स्वीकारता, मुखावाटे निर्माण झालेल्या व भाषेत वापरल्या गेलेल्या ध्वनीला ‘स्वन’ ही संज्ञा दिलेली आहे. मुखाद्वारे उच्चारल्या गेलेल्या ध्वनींचा विचार ध्वनीविचारात केला जातो, तर जगातील कोणत्या तरी भाषेत ज्या ध्वनींचा उपयोग होतो, त्या ध्वनींचा विचार स्वनविचारात केला जातो. स्वन हे भाषेचे माध्यम असतात. भाषेत परंपरेने स्वीकारण्यात आलेले काही स्वन कालांतराने वापरातून जाऊ शकतात तर काही नवीन स्वन नव्याने स्वीकारले जातात. स्वनांचा असा विचार करताना कोणतीही विशिष्ट भाषा समोर नसते. स्वनांचा विचार हा भाषानिरपेक्ष केला जातो.

१.३.२ स्वनिमविचार

स्वनिमविचारात **स्वन, स्वनांतर, स्वनिम** या संकल्पनांचा विचार होतो. एखादा स्वन जेव्हा भाषेमध्ये कार्यरत होतो तेव्हा त्याला **'स्वनिम'** असे म्हणतात. स्वनांचे गुणधर्म, स्वर-व्यंजन-अर्धस्वर यांची वैशिष्ट्ये सर्व भाषांमध्ये सारखीच असली तरी प्रत्येक भाषा आपल्या वापरासाठी ठराविक स्वनच वापरतात. मराठीतील **'ल'** हे स्वन इंग्रजीत **'L'** या पद्धतीने वापरला जातो. हे स्वन जेव्हा भाषेत प्रत्यक्ष वापरले जाते तेव्हा त्याच्या उच्चारणात बदल होत जातो. तसेच त्या भाषेचे संदर्भही त्याला प्राप्त होतात. **'ळ'** हा स्वन इंग्रजीत नसल्यामुळे त्याच्या उच्चारणाशी साम्य असलेला **'L'** हाच स्वन वापरण्यात येतो.

उदाहरणार्थ - *कमळ – kamal*

स्वनांच्या उच्चारात जरी फरक पडत गेला तरी आपण त्याचा मूळ अर्थ एकच गृहीत धरतो. मुळात भाषेत प्रत्यक्ष स्वन उच्चारले जात नाहीत तर त्यांची विविध उच्चारित रुपे वापरली जातात.

उदाहरणार्थ - *चार, चटणी, चाटण, चारा*

ही उच्चारणे वेगवेगळी असून भाषेमध्ये यांचा उपयोग होताना आजूबाजूंच्या ध्वनीमुळे त्यांच्या उच्चारात फरक होऊ शकतो'.[11]

१.३.२. स्वनांतरे

वरील स्वनिमाच्या उदाहरणामध्ये 'च' हे स्वनिम असून च१, च२, च३, च४ ही त्या स्वनिमांची स्वनांतरे आहेत. यातून असे लक्षात येते की, 'स्वनिमाच्या एकाच गटात समाविष्ट होणाऱ्या वेगवेगळ्या स्वनिमांना 'स्वनांतरे' म्हणतात'.[12] स्वनांचा विचार भाषानिरपेक्ष करावा लागत असला तरी, स्वनिम आणि स्वनांतर हे कोणत्यातरी एका भाषेचे विशेषक असतात. त्यामुळे त्यांचा विचार भाषासापेक्ष करावा लागतो. स्वनिम आणि स्वनांतरे यांचे लेखन करण्याची एक विशिष्ट पद्धत भाषाविज्ञानामध्ये रूढ झालेली आहे. स्वनिम दोन तिरप्या रेषांमध्ये / / तर स्वनिमाची स्वनांतरे चौकोनी कंसात [ ] दर्शविली जातात.



सौजन्य : संपादक मुसळे, सीमा. *वर्णनात्मक भाषाविज्ञान, प्रमाणभाषा व बोली*. एम. ए. भाग एक (मराठी), संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई. पृ.३९.

१.३.३ पदविचार / रूपिम विचार

रूपिक म्हणजे भाषेतील अर्थपूर्ण असा लहान घटक होय. अर्थाच्या दृष्टीने पाहता रुपिकांचे विभाजन होऊ शकत नाही. भाषेतील कोणत्याही अर्थपूर्ण घटकाला **'भाषिक रूप'** (Linguistic Form) असे म्हणतात. ही भाषिक रुपे लहान-मोठ्या स्वरूपाची असतात.

१. महाविद्यालयाचे दोन खेळाडू राष्ट्रीय पातळीवर चमकले.
२. महाविद्यालयाचे दोन खेळाडू.
३. महाविद्यालयाचे
४. महा +विद्या +लय +आ+चे

सौजन्य : संपादक पाटील, शिवाजी, गवळी, अनिल पांडुरंग. *आधुनिक भाषाविज्ञान*. एम. ए. भाग १ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ३२

वरील सर्व वाक्यांमधील सर्वच घटक अर्थपूर्ण आहेत. क्रमांक ४ मधील महा, विद्या, लय, आ आणि चे ही देखील सर्व भाषिक रुपे आहेत. भाषेतील अशा लघुत्तम रूपांनाच रुपिका (Morph) असे म्हणतात.

१.३.३.१ रूपिम

भाषेत रुपिकांचे असे असंख्य गट असतात. रुपिकांच्या अशा गटाला 'रूपिम' असे म्हणतात. या रूपिमामुळे गटात असणाऱ्या सर्व रुपिकांचा बोध होतो. रूपिम हा काल्पनिक असून रुपिकाच भाषेत प्रत्यक्ष रित्या वावरत असतो. 'पाऊस' या रुपिकाचे रूप कधी 'पाऊस' तर कधी 'पावस' असा होतो.

{ पाऊस } → **/ पाऊस /**, **/ पावस /**

उदाहरणार्थ - *१. काल पाऊस खूप होता.*
२. मला पावसात भिजायला आवडते.

या उदाहरणातून असे कळून येते की **पाऊस** हा एक रूपिम असून **पाऊस** व **पावस** या दोन रुपिका रूपिम गटात वावरतात.

१.३.३.२ रुपिकांतर

एका रूपिम गटात समाविष्ट असलेल्या रुपिकांना त्या विशिष्ट रूपिमांची रुपिकांतरे म्हणतात. रूपिका व रुपिकांतर हे एकच आहे. रूपिमाचा संदर्भ काढला की त्या रुपिकांतराला रुपिका म्हणता येते.

उदाहरणार्थ - पाऊस या रुपिमाची पाऊस, पावस अशी रुपिकांतरे आहेत. वाक्यात वापरताना पाऊस, पावसात, पावसाळा इत्यादी रुपे वापरली जातात.

रुपिका किंवा रुपिकांतर ही भाषेतील प्रत्यक्ष घटना आहे, तर रूपिम ही पूर्णपणे काल्पनिक असते. रूपिम त्याच्या गटात वावरणाऱ्या रुपिकांतराचा निर्देश करतो. भाषाविषयक लेखनामध्ये रूपिम महिरपी {} कंसात तर रुपिकांतरे दोन तिरप्या रेषांमध्ये / / दर्शविला जातो.

{ पाऊस } → **/ पाऊस /**, **/ पावस /**

रुपिकांतरचे तीन प्रकार आहेत.

१. स्वनिमाश्रयी रुपिकांतर
२. रूपिमाश्रयी रुपिकांतर
३. शून्य रुपिकांतर

१.३.४ वाक्यविचार

शब्दांपासून पुढे ज्या रचना मिळतात त्यांचा अभ्यास वाक्यविचारात केला जातो. वाक्य ही भाषेतील सर्वात मोठी रचना होय. ‘काळा कावळा’, ‘दिव्याची वात’, ‘मी घरी जाणार’ इ. वाक्यांची उदाहरणे आहेत. पदविचार व वाक्यविचाराने भाषेच्या व्याकरणाचा विचार पूर्ण होतो. जिथे पदविचार संपतो तिथे वाक्यविचाराला सुरुवात होते. जेव्हा एखादा शब्द विशिष्ट अर्थाने किंवा रचनातत्त्वाने एकमेकांशी जुळतात तेव्हा पदबंध तयार होते.[13] ब्लूमफील्ड, ब्लॉक आणि ट्रेगर या भाषावैज्ञानिकांनी पदविचार व वाक्यविचार या दोन विभागांचा स्वतंत्र विचार केला, तर हॉकेट हा भाषावैज्ञानिक त्या दोघांचा समावेश व्याकरणात करतो. यावरून असे म्हणता येते की भाषावैज्ञानिकांनी आपापल्या सोयीनुसार त्या दोन्ही विभागांचा विचार केला आहे.[14]

‘वाक्याचे उद्देश्य व विधेय असे दोन भाग पडतात. उद्देश्य या संघटकामध्ये कर्ता आणि त्याची विशेषणे यांचा अंतर्भाव होतो, तर विधेय या संघटकामध्ये कर्म, पूरके, क्रियाविशेषणे व क्रियापदे यांचा अंतर्भाव होतो. काहीवेळा विशिष्ट संबंधवाचक घटकांनी दोन किंवा अधिक वाक्य एकत्र येऊन वाक्यांची रचना होते.

उदाहरण - *पण, आणि, परंतु, जेव्हा-तेव्हा, जर-तर आदी.*

अशा रचनेमध्ये आलेल्या वाक्यांना उपवाक्य असे म्हणतात’.[15]

१. *वीज गेली आणि कारखाना बंद झाला.*
२. *मी गावी जाणार होतो पण बस चुकली.*

वास्तविक पाहता वाक्य आणि उपवाक्य यांची रचना सारखीच असते. रूपिमांपासून शब्द बनतात, शब्दांपासून पदबंध तयार होतात, पदबंधापासून उपवाक्य तर उपवाक्यांपासून वाक्ये तयार होतात. या वाक्यांपासून पुढे परिच्छेद, प्रकरण, ग्रंथ तयार होतात. वाक्यविचारात केवळ रूपिमांपासून पुढची शब्द व वाक्य ही रचना अभ्यासली जाते.

१.३.५ अर्थविचार

कोणत्याही भाषेतील वाक्यातून अर्थ प्रतीत होत असतो. पण नेमका अर्थ सांगणे काहीवेळा कठीण होऊ शकते. कारण एका शब्दाचे दोन अर्थ असल्याने अशी समस्या उद्भवू शकते. त्यामुळे 'भाषेचे अभ्यासक ज्याचा अभ्यास करतात त्याचा अर्थ हा पारंपरिक, पिढ्यानपिढ्या प्रचलित असणारा, मान्यवर शब्दकोशांमध्ये अधिकारवाणीने उपलब्ध होणारा असा अर्थ असतो'.[16] त्यामुळेच एखाद्या शब्दाच्या अर्थासंबंधी वाद झाल्यास त्याचा निर्णय शब्दकोशाच्या आधारे केला जातो. इंग्रजीत याला Canonical Meaning असे म्हणतात. वाक्य किंवा शब्दातून प्रतीत होणारा अर्थ हा आपल्या मनात एक मानसिक प्रतिमा, कल्पना उभी करतो. जसे- वाघ म्हणताना वाघाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर येते. तसेच प्रामाणिक, हुशार अशा शब्दांबाबतच्या संकल्पना आपल्या मनात येतात.

'काळानुसार काही शब्दांचे अर्थ बदलतात. पण या बदलांची गती ही संथ असते. फूलस्केप कागदाच्या टोप्या करून विदूषक किंवा मूर्ख वापरत होते म्हणून त्यांना Fools cap असे म्हटले जायचे. पण आता तो अर्थ मागे टाकून Foolscap हा एक कागदाचा प्रकार झालेला आहे.'[17] सामाजिक दृष्टीने पाहता शब्दांचे अर्थ स्थिर राहणे हे गरजेचे आहे. अर्थ बदलण्याची प्रक्रिया जर जलद झाली तर पूर्वजांची भाषा पूर्णपणे लोप व्हायला फार वेळ लागणार नाही. केवळ शब्दांतून अर्थ तयार होतात असे नसून चिन्ह, रंग यातून अर्थ प्रतीत होत असतो. जसजसा समाज बदलतो, क्षेत्र बदलते तसतसे भाषेचा शब्दसंग्रह ही बदलतो. प्रत्येक भाषेतील आशयाची व अर्थाची क्षेत्रे ठरलेली असतात. मराठी भाषेत आजी-आजोबा, आई-बाबा अशी शब्दांची जोडी आढळते. तर इंग्रजीत Grandfather-Grandmother, Father-Mother अशी जोडी आहे. तसेच काका-काकी, मामा-मामी या जोड्यांना इंग्रजीत uncle-aunt या जोडीने संबोधले जाते. भाषेप्रमाणे जरी शब्द बदलत असले तरी त्यातून एकच अर्थ दर्शविला जातो.

१.४ भाषाविज्ञान आणि भाषाविज्ञानाची अनेक क्षेत्रे

माणसाचे संपूर्ण जीवन व्यापून टाकणारी संस्था म्हणजे भाषा होय. त्यामुळे भाषेच्या अभ्यासाचे क्षेत्र खूप व्यापक आहे. मानवी जीवनाप्रमाणे भाषा देखील फार गुंतागुंतीची असल्याने अभ्यासकांना रोज नव्या

आव्हानांना सामोरे जावे लागते. भाषेच्या विविध पद्धतीने अभ्यास व चिंतन होत राहिले की एक विशिष्ट अभ्यास पद्धती उदयाला येते. ऐतिहासिक, वर्णनात्मक, सामाजिक अशा विविध पद्धतीने भाषेचा अभ्यास केला जातो. या अभ्यासातूनच भाषाविज्ञानाची स्वतंत्र क्षेत्रे निर्माण झाली आहेत. भाषेच्या अभ्यासाची अनेक क्षेत्रे असली तरी मोजक्याच क्षेत्रांचा विचार इथे करण्यात आलेला आहे.

१.४.१ ऐतिसाहिक भाषाविज्ञान

सर विलियम जोम्स या भाषावैज्ञानिकाने एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात इंडो-युरोपिय भाषाकुलांतील निबंध सादर करून ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. भाषांच्या तौलनिक अभ्यासातून भाषांचा ऐतिहासिक मागोवा घेण्याचा प्रयत्न ऐतिसाहिक भाषाविज्ञानाच्या शाखेने घेतला. लेटीन, ग्रीक. संस्कृत इ. भाषा एकाच आदिम भाषेपासून निर्माण झाल्याचा अंदाज सर विलियम जोम्सने इ. स. १७८६ साली मांडला. त्यांच्या या अभ्यासामुळे फ्रांझ बॉप, ग्रिम, रास्क, श्लाइशर, थिमे इ. भाषवैज्ञानिकांना एक नवीन दिशा सापडली.[18]

सर विलियम जोम्सच्या पूर्वीही भारतीय भाषाभ्यासकांनी भाषेचा वेगवेगळया अंगाने अभ्यास केला होता. जसे भाषेचे पूर्वरूप व उत्तररूप, भाषेच्या ध्वनीशास्त्राचा, व्याकरणाचा अभ्यास केला होता. तसेच भाषेच्या एककालिक स्थितीत स्थानानुसार, व्यक्तीनुसार भाषेत फरक पडतो म्हणजेच भाषेत इतिहास असतो याची जाणीव पूर्वी भारतीयांना होती. विलियम जोम्सनी प्राचीन भाषांतील साम्यस्थळे दाखवून त्या स्थळांमागील असलेल्या इतिहासाचा वेध घेतला.[19] **'भाषाकुल'** ही ऐतिहासिक भाषाविज्ञानातून आलेली संकल्पना होय. भाषेची पूर्वपिठीका, भाषाकुल संकल्पना, भाषेचा काळ, कालीक भेद, त्यामागील असणारी कारणे इ. गोष्टींचे संशोधन ऐतिहासिक भाषाविज्ञानात केले जाते.[20] काळाच्या ओघात काही भाषा प्रभावी ठरतात तर काही भाषा लोप पावतात. तसेच एकाच काळात वेगवेगळया भूप्रदेशात विविध भाषा स्वतंत्रपणे सहज अस्तित्वात येऊ शकतात. भाषिक अभ्यासात काळानुसार होत असणाऱ्या 'ध्वनीपरिवर्तनाचा अभ्यास करून ध्वनीपरिवर्तनाचे नियम शोधणे, एकापेक्षा अधिक भाषांच्या तौलनिक अभ्यासातून या भाषांतील परस्पर संबंधींची निरीक्षणे नोंदविणे, उपलब्ध असलेल्या भाषिक पुराव्याच्या तौलनिक अभ्यासाद्वारे उपलब्ध नसलेली

मूल पूर्वभाषा निर्धारित करणे व भाषाकुलाची प्रतिष्ठापना करणे ही ऐतिहासिक भाषाविज्ञानाची अध्ययनप्रक्रिया आहे.'[21]

प्राचीन हस्तलिखितांचा काळ निश्चित करण्यासाठी कालमापन पद्धतीचा उपयोग होऊ लागला. त्यातून **'फिलॉलॉजी' (Philology)** हे हस्तलिखितांच्या अभ्यासासाठीचे शास्त्र म्हणून पुढे आले. पुराण, धर्म, पौराणिक कथांच्या अभ्यासासाठी तसेच कोरीव लेखांचे वाचन, त्यांची काळनिश्चिती इ. गोष्टींसाठी या शास्त्राचा उपयोग होऊ लागला. परंतु विसाव्या शतकाच्या आरंभी ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे पाऊल मागे पडू लागले.[22] **भाषिक परिवर्तने केवळ उत्क्रांतीमुळे होत नसून राजकीय व सामाजिक बदलांमुळे होतात हे लक्षात आले.** म्हणून उत्क्रांतीतत्त्वाधिष्ठीत भाषापरिवर्तनाचा शोध घेणारी ऐतिहासिक भाषाविज्ञानाची शाखा मागे पडली.

१.४.२ वर्णनात्मक भाषाविज्ञान

विसाव्या शतकाच्या आरंभी **फेर्दिनां द सोस्यूर** या भाषावैज्ञानिकाने वर्णनात्मक अथवा आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया घातला. या क्षेत्रामुळे भाषाविज्ञानात नवनवीन विचार येऊ लागले. भाषेकडे नव्या दृष्टिकोनातून पाहू लागले. भाषाभ्यासाच्या पद्धतीत आणि तंत्रात बदल झाले. सोस्यूरने भाषाभ्यासामध्ये 'रूप', 'व्यवस्था' व 'संरचना' या अमूर्त संकल्पनांना स्थान दिले. तसेच एककालिक व कालक्रमिक भाषाविज्ञानातील फरक स्पष्ट करून एककालिक भाषाविज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. एककालिक भाषाविज्ञानामध्ये कोणत्याही कालखंडात भाषेचे स्वरूप स्थिर मानून तिचे विश्लेषण करता येते. त्याचप्रमाणे व्याकरणाच्या मूल्यमापनात्मक दृष्टिकोनाला विरोध करून **भाषा ही एक चिन्ह व्यवस्था आहे** असे विधान केले. दैनंदिन भाषाव्यवहारातील लकबी, शारीरिक व्यंगामुळे येणारे दोष इ. सरमिसळ झालेल्या व्यवस्थेचा अभ्यास वर्णनात्मक भाषाविज्ञानातून केला पाहिजे असे स्पष्ट मत सोस्यूरने मांडले. [23]

वर्णनात्मक भाषाविज्ञानामुळे भाषाभ्यासकांमध्ये विविध संप्रदाय निर्माण झाले. विविध संप्रदायामधील ब्लूमफील्ड प्रणीत संरचनावाद जास्त प्रमाणात गाजला. भाषा ही व्यवस्थाबद्ध असल्याने अनेक घटकांमध्ये वेगवेगळ्या स्थरांवरील संरचनांनी ती बनलेली असते. तिच्या या संरचना स्पष्ट करण्यासाठी

संरचनावाद्यांनी एका विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला. ब्लूमफील्ड हा वर्तनवादी मनोविज्ञानाचा अभ्यासक असल्याने भाषेकडे देखील ते मनोवैज्ञानिकांच्या दृष्टिकोनातून पाहत होते. प्रत्यक्ष भाषिक व्यवहाराचे नमुने गोळा करून त्यांच्या विश्लेषणातून प्रथम त्या भाषेची स्वनिम व्यवस्था निश्चित करणे, तद्नंतर त्या भाषेचे रूपिम निश्चित करणे व त्यांच्या लहानमोठ्या रूपबंधाद्वारे त्या भाषेचे व्याकरण स्पष्ट करणे. अशा प्रकारचे तंत्र ब्लूमफील्डने विकसित केले होते. या तंत्राद्वारे केवळ भाषेच्या दृश्य रुपाचाच अभ्यास करता येतो अर्थाचा करता येत नसल्याचे जाणून त्याने अर्थविचारकडे दुर्लक्ष केले. ब्लूमफील्डने विकसित केलेल्या तंत्रामुळे जगातील कोणत्याही भाषेचे व्याकरण वस्तुनिष्टपणे लिहिता येऊ लागले. अनेकांना या यंत्रपद्धतीचा फायदा होऊ लागला. 'भौतिक शास्त्रांच्या तंत्राचा पाया, त्यामुळे आलेला काटेकोरपणा व सफाई, सार्वत्रिक उपयोजनक्षमता'[24] त्यामुळे संरचनावादी अभ्यासपद्धतीला यश आले.

संरचनावाद्यांवर भौतिक शास्त्रांच्या अभ्यासपद्धतीचा व वर्तनवादी मनोवैज्ञानिक दृष्टिकोनाचा खूप प्रभाव आहे. भाषिक "व्यवहाराचे नमुने गोळा करून त्यांच्या विश्लेषणाच्या आधारे संपूर्ण भाषातत्त्वाच्या स्वरूपावर प्रकाश टाकू पाहतात."[25] अशाने भाषेच्या बाह्यतत्त्वाचा अभ्यास होऊन जिवंत भाषातत्त्व दूर राहते.

नोम चॉम्स्कीला ही भूमिका मान्य नसल्याने त्याने स्वतःची एक स्वतंत्र उपपत्ती मांडली. ही उपपत्ती भाषा वर्णनाचीच असून प्रत्यक्ष भाषाव्यवहाराशी त्याचा संबंध नसून प्रत्येक व्यक्तीच्या मनात तयार असलेल्या व्यवस्थेची आहे. प्रत्यक्ष व्यवहारभाषेतील वाक्यांचा विचार नाकारून त्यांच्या मानसिक रूपांचा विचार करण्याची आवश्यकता त्याने स्वीकारली. 'व्यवहारभाषेतील वाक्यांपेक्षा व्यक्तीच्या मनात तयार असलेली वाक्येच खरी व्याकरणिक वाक्ये आहेत असे त्यांचे मत आहे.'[26] भाषेचा प्रत्यक्ष व्यवहार हा बाह्यस्तरावर असल्याने अंतःस्तरावरील भाषा त्याच्यावर कशाप्रकारे आविष्कृत होते आणि त्यानंतर भाषेवर कोणकोणते संस्कार होतात ते पाहणे व त्याचा अभ्यास करणे हा चॉम्स्कीचा अभ्यास होता. याच चॉम्स्कीच्या अभ्यासपद्धतीला जनकसूत्री रचनांतरण संप्रदाय असे म्हटले जाते.[27]

१.४.३ सामाजिक भाषाविज्ञान

वरील अनुच्छेदामध्ये आपण सोस्यूर प्रणीत वर्णनात्मक भाषाविज्ञान, ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा आढवा घेतला. 'एकोणिसाव्या शतकात **'एमिल ड्यूरखाईम'** या जेष्ठ समाजशास्त्रज्ञाने समाजभाषेचा अभ्यास केला. या अभ्यासादरम्यान त्यांनी सामाजिक व्यवहाराचा अभ्यास करायचा असल्यास सर्वप्रथम त्या व्यवहारातील वैयक्तिक अंश काढून त्यामागील स्थिर व सार्वत्रिक व्यवस्थेवर आपले लक्ष केंद्रित करायला हवे, असे मत मांडले'.[28] १९६० नंतर उदयाला आलेली ही ज्ञानशाखा समाजविज्ञान व मानववंशशास्त्र या शाखांतील अध्ययन पद्धतीचा आधार घेऊन या शास्त्राचा अभ्यास केला जातो. "एडवर्ड सपीर, बेंजामिन ली वोर्फ, डेल हाईम्स, मॅलिनोव्स्की, इ. मानववंशशास्त्राच्या अध्ययनातून भाषिक जडणघडणीचे अध्ययन केले; तर फिशमन, लेबॉव, बर्नस्टीन, इ. समाजविज्ञानाच्या मर्मदृष्टीतून भाषिक जडणघडणीचे स्वरूप तपासून पहिले."[29] भाषा ही सामाजिक संस्था असून समाजापासून भाषेला वेगळे काढून निर्जीव व स्थिर मानून तिचा अभ्यास करता येत नाही. कारण भाषा ही परिवर्तनशील असते. काळानुसार, समाजानुरूप तिच्यात बदल होत असतात.

दैनंदिन भाषिकव्यवहारातील वैयक्तिक लकबी व तात्कालीन संदर्भ वगळून हाती लागलेली भाषिक व्यवस्था ही सोस्यूरला भाषाभ्यासासाठी महत्त्वाची वाटली. परंतु वर्णनात्मक भाषाविज्ञानापेक्षा समाजभाषा अध्ययनाची दिशा वेगळी आहे. *उदाहरण - 'तू', 'तुम्ही', 'आपण'* यांच्यातील भेदांचे वर्णन भाषिक संदर्भाच्या आधारे वर्णनात्मक भाषाविज्ञानात केले जाते. परंतु समाजभाषाविज्ञानात वरील संदर्भांचा विचार समाजाच्या अंगाने केला जातो. मराठी भाषेतील 'तू' हा प्रयोग अनौपचारिक रित्या केला जातो. वयाने लहान व्यक्तीला संबोधताना 'तू' हा प्रयोग वापरला जातो. तर वयाने मोठ्या व प्रतिष्ठेनुसार 'तुम्ही'चा वापर व औपचारिक संदर्भात 'आपण'चा प्रयोग केला जातो. 'इंग्रजी वाङ्मयात ईश्वराला 'you' ऐवजी 'thou'ने संबोधतात.'[30] यामागे केवळ श्रेष्ठत्वाची, आदरार्थी भावना असते. समाजभाषाविज्ञानाने व्यवहारभाषेतील सामाजिक संदर्भांना महत्त्व देऊन भाषेचा अभ्यास करण्याची नवीन दिशा दाखविली. भाषाव्यवहार व सामाजिक संरचना या दोन्ही परस्परांवर अवलंबून असतात. भाषिक व्यवहार व्याकरणिक नियमांनी होत नसून सामाजिक संकेतांनी होत असल्याने 'भाषा' हा समाजाचा अभ्यास होय.

भाषेत असलेल्या सामाजिक संदर्भांचा शोध घेणे हे समाजभाषावैज्ञानिकाचे उद्दीष्ट आहे. भारतीय समाजात विविध विचारसरणी या सर्वांचे प्रतिबिंब भाषेत दिसून येते. या सर्वानुसार भाषेचे रूप तयार होत असते. समाजविज्ञानात कुटुंबव्यवस्था, जाती, लिंग, धर्म, उद्योग-व्यवसाय, श्रेष्ठ-कनिष्ठ या सर्वांचा अभ्यास होत असतो. तर सामाजिकभाषाविज्ञानात या सामाजिक संदर्भातील भाषा व्यवहाराचा समाजसापेक्ष दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. तसेच स्त्री-पुरुष-मुलांची भाषा, धर्मक्षेत्रे, दैनंदिन व्यवहाराची भाषा आदींचा विचार सामाजिकभाषाविज्ञानात केला जातो.

१.५ समाजभाषाविज्ञानाचे घटक

मानव भाषेच्या माध्यमातून संप्रेक्षण करतो. माणूस बोलू शकतो त्यामुळे माणसाला सामाजिक प्राणी म्हटले जाते. समाजभाषाविज्ञान ही शाखा १९६० नंतर उदयाला आली. समाजभाषाविज्ञानात समाज व भाषा यांच्यामध्ये असलेल्या संबंधाचा अभ्यास केला जातो. भाषा ही सामाजिक संस्था असून समाजाची निर्मिती, तिचा विकास व अस्तित्व या गोष्टी शक्य झालेल्या आहे. भाषेतील प्रत्येक शब्दांना प्राप्त होणारे अर्थ हा समाजसापेक्ष असतो. त्यामुळे बोलणाऱ्या भाषेचा अभ्यास हा समाजासंदर्भातच करावा लागतो.

समाजभाषाविज्ञानाचे घटक खालील प्रमाणे-

१.५.१ भाषिक भांडार (Linguistic Verbal)

"भाषिक भांडार' ही संकल्पना 'जॉन गम्पर्झ' यांनी समाजभाषाविज्ञानाअंतर्गत मांडली आहे. प्रत्येक समाजाचे भाषिक भांडार असते."[31] कोणतीही व्यक्ती एकचएक भाषा वापरताना दिसत नाही. कधी, कोणाशी, कसे, काय बोलायचे हे संकेत ठरलेले असतात. प्रत्येक व्यक्ती समोरच्याशी बोलताना वय, लिंग, प्रसंग, समाजातील त्या व्यक्तीचे असलेले स्थान लक्षात घेऊन बोलते. अशाप्रकारे बोलणाऱ्या क्षमतेला 'संदेशनक्षमता' म्हणत असून ही संदेशनक्षमता व्यक्तीच्या भाषिक भांडारावर अवलंबून असते. भाषा वापरण्याच्या संदर्भात अनेक अलिखित नियम पाळावे लागतात. त्यामुळे भाषा वापरण्याची क्षमता सर्वच भाषिकांजवळ असल्याने समाजभाषाविज्ञानामध्ये त्याला **'संदेशवहनात्मक क्षमता'** (Communicative competence) या नावाने ओळखले जाते.

नोम चॉम्स्की व इतर भाषाभ्यासकांनी गृहीत धरलेल्या पद्धतीनुसार जर भाषेचा वापर होऊ लागला तर समाजात भाषेसंदर्भात गोंधळ निर्माण होईल. कारण समाजात भाष्य करताना समोरची व्यक्ती, काळ, प्रसंग ओळखून त्याच्याशी बोलते. त्यामुळे पूर्णपणे स्थिर, एकसूत्री भाषिक नियमव्यवस्था कोणत्याही समाजाच्या भाषेमध्ये आढळत नाही. कोणत्याही सामाजिक भाषेचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास; विविध पैलू असणारे 'भाषिक भांडार' त्या समाजाच्या भाषेत नांदत असल्याचे आढळून येते.

विशिष्ट समाजातील लोक विचारविनिमयासाठी ज्या भाषा-बोलीचा वापर करतात या सर्वांना मिळून एक भाषिक कोश तयार होतो. मुंबई, पुणे येथील माणसे बोलताना एकच एक भाषा वापरत नाहीत. आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी हिंदी, इंग्रजी आदी भाषांचा वापर करतात. त्यामुळे या सर्व भाषांचा मिळून एक भाषिक कोश तयार होतो. या कोशावर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा गोष्टींचा प्रभाव असतो.[32]

१.५.२ लघुक्षेत्र (Domain)

वरील घटकामध्ये भाषिक भांडार ही संकल्पना समजून प्रत्येक समाजानुसार भाषिक भांडार भिन्न असते या गोष्टीची नोंद घेतली. एका विशिष्ट व्यवसाय किंवा क्षेत्रामध्ये विचारविनिमयासाठी ज्या भाषिक भांडाराचा उपयोग केला जातो त्यातून एक भाषिक शब्दकोश तयार होतो. *उदाहरणार्थ - शैक्षणिक क्षेत्रात शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी, वही, पुस्तक, खडू, फळा, पेन इ. शब्दांचा स्वतंत्रपणे वापर होताना दिसतो.* अशा विशिष्ट समाजातील भाषिक संदर्भानुसार वेगवेगळे कप्पे तयार होतात. भाषा वापराच्या अशा क्षेत्रांना **'लघुक्षेत्र'** असे म्हणतात. सर्वप्रथम लघुक्षेत्राची संकल्पना 'शिमट' आणि 'रोर' या जर्मन अभ्यासकांनी मांडली.[33] समाजातील व्यक्ती कामानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी एकत्र येत असतात. व्यक्तीच्या परस्पराच्या सहकार्यामुळे निर्माण झालेले सामाजिक नात्यांचे स्वरूपही निराळे असते. या सर्वांचा व्यवहारभाषेवर परिणाम होत असतो. एखादी व्यक्ती वडीलधारे, शिक्षक, मित्र यासर्वांशी बोलताना एकाच प्रकारची भाषा वापरत नाही. तर काळानुरूप, व्यक्तीनुरूप ती व्यक्ती आपली भाषा बदलत असते. कारण बदललेला प्रत्येक संदर्भ हा स्वतंत्र 'लघुक्षेत्र' असतो. शिक्षण क्षेत्र, न्यायालय, क्रिकेट, व्यापार आदी क्षेत्रात जागतिकीकरणामुळे भाषिक भांडार

वाढत असते. तसेच एकच वस्तु दुसऱ्या लघुक्षेत्रात दुसऱ्या नावाने ओळखली जाते. जसे स्वयंपाकघरातील तांदूळ हे देवघरात किंवा लग्नकार्यात अक्षता म्हणून वापरल्या जातात.

१.५.३ भाषिक प्रभावक्षेत्र

समाजातील व्यक्तींचा वेगवेगळया कारणांसाठी विविध लोकांशी त्यांचा संपर्क येत असतो. संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची भाषा ही एकसारखी नसून त्यात विविधता आढळते. प्रत्येक व्यक्तीच्या भाषिक कोशावर एक विशिष्ट क्षेत्राचा प्रभाव असतो. जेणेकरून त्या क्षेत्रातील शब्द सतत व्यक्तीच्या बोलण्यातून येत असतात. विशिष्ट क्षेत्राप्रमाणे सांस्कृतिक पर्यावरण, राहणीमान इ.चा प्रभावही भाषेत दिसून येतो. भारतीय उच्चशिक्षित लोकांच्या भाषेत इंग्रजीचा प्रभाव तसेच पाश्चात संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

१.५.४ भाषाव्यवहार

सर्व मानवजाती विचारविनिमयासाठी भाषा वापरते. कोणतीही लिपी नसलेली बोली देखील विचार अभिव्यक्तीच्या गरजा पूर्ण करते. ज्याप्रमाणे मनुष्य म्हणजे हात, पाय, नाक, कान, डोळे हे नसून त्याच्याकडे इतर प्राण्यांपेक्षा वेगळी कौशल्ये असतात. त्याचप्रमाणे भाषा म्हणजे ध्वनी, शब्द, वाक्य यांचा समूह नव्हे. भाषा ही सूक्ष्म, तरल, गुंतगुंतीची व्यवस्था असून ती समाजात स्थित असते. प्रत्येक व्यक्ती आपल्या प्रमाणे समाजात स्थित असलेल्या भाषेचा उपयोग करते. अशा व्यक्तीगणिक भाषावापराला भाषिक व्यवहार म्हणतात. व्यक्तीनुसार भाषेचा उपयोग जरी वेगवेगळया प्रकारे होत असला तरी प्रत्येकाच्या मनात त्या भाषेची व्यवस्था ही एकच असते. यालाच सोस्यूरच्या संकल्पनेत **भाषाव्यवस्था** (Langue) म्हटले जाते. तर **भाषिक व्यवहार** (Parole) म्हणजे या भाषेचे वैयक्तिक व व्यावहारिक रूप होय.[34]

१.५.५ द्वैभाषिकता व बहुभाषिकता (Bilingual & Multilingualism)

विशिष्ट प्रदेशातील भाषिक समाज आपल्या दैनंदिन व्यवहारासाठी दोन भाषांचा वापर करतो. त्याला द्वैभाषिक समाज असे म्हणतात. गोवा या राज्यात कोंकणी व मराठी अशा दोन भाषांमधून दैनंदिन व्यवहार होत असतात. तसेच इंग्रजी भाषा देखिल शासकीय व्यवहारात येते. एखाद्या विशिष्ट प्रदेशातील द्वैभाषिक

समाजाच्या भाषिकव्यवहाराचा अभ्यास समाजभाषावैज्ञानिकाच्या अंगाने करता येतो. तसेच सामाजिक स्थरानुसारही समाजात द्वैभाषांचा वापर होतो. तर काही व्यक्ती घरात मराठी किंवा इतर मातृभाषेत भाषेत बोलायचे सोडून इंग्रजी भाषा वापरतात. परंतु नोकर किंवा इतरांशी मात्र त्यांना स्थानिक भाषेतच बोलावे लागते. तर काही व्यक्ती केवळ कामापूरते दुसऱ्या भाषेचा वापर करतात. त्या एका विशिष्ट भाषेवर त्यांचे प्रभूत्व नसते. *उदाहरण - गुजराती व्यापारी आपला व्यापार मराठी भाषेत करतो. परंतु त्या भाषेवर त्याचे प्रभुत्व नसते.*

द्वैभाषिकेनंतर बहुभाषा समाजाची निर्मिती होते. भारत हा बहुभाषिक देश असून अनेक बोली भारत देशात बोलल्या जातात. सर **जॉर्ज ग्रिअर्सन** यांनी भारतीय बोली अभ्यासाच्या इतिहासात राबविलेला "भारतीय भाषा आणि बोलींच्या अभ्यासाचा प्रकल्प सर्वात मोठा आणि महत्त्वपूर्ण असा आहे."[35] असे अनेक संदर्भ भाषेच्या संदर्भात भारतात राबविण्यात आले. अनेकवेळा स्थलांतरित व्यक्ती हे बहुभाषिक असतात. त्यांच्या गरजेमुळे ते बहुभाषिक होतात. घरी जरी कन्नड बोलत असला तरी स्थानिक भाषा म्हणून कोंकणी भाषेचा अवलंब करतो, तर राष्ट्रभाषा म्हणून हिंदीची जाण त्याला असतेच व शासकीय व्यवहारात इंग्रजीचा वापर करतो. या सर्व भाषांच्या उच्चारावर त्याच्या मातृभाषेचा प्रभाव जरी जाणवत असला तरी इतर भाषांवर त्याचे प्रभुत्व असलेले दिसते. स्थळ, काळ, व्यक्ती, संदर्भानुसार भाषेचा वापर त्या एका विशिष्ट व्यक्तीकडून होत असतो.

१.५.६ भाषाद्वित्व (Diaglossia)

'सर्वप्रथम **'चार्ल्स फर्गसन'** याने समाजभाषाविज्ञानामध्ये **'भाषाद्वित्व'** ही संकल्पना मांडली.'[36] समाजभाषाविज्ञानामध्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या भाषेचा विचार स्वतंत्रपणे केला जात असून त्याला व्यक्तीबोली या नावाने संबोधले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या भाषेची औपचारिक व अनौपचारिक अशी दोन रुपे असतात. शिक्षण, प्रसारमाध्यमे, शासकीय व्यवहार आदी क्षेत्रात औपचारिक भाषा तर कुटुंब, दैनंदिन व्यवहारात अनौपचारिक भाषा वापरली जाते. अशाप्रकारची भाषेची दोन्ही रुपे एकाच समाजात जेव्हा अस्तित्वात येतात तेव्हा त्या स्थितीला भाषाद्वित्व असे म्हटले जाते.

१.५.७ भाषामिश्रण आणि भाषापरिवर्तन

कोणत्याही समाजातील भाषा तिच्या संपर्कात येणाऱ्या बोली किंवा भाषेपासून ऋण घेऊन ती समृद्ध बनते. मराठी भाषेने कन्नड, इंग्रजी, फारसी, अरबी या भाषेतील काही शब्द स्वीकारून भाषा समृद्ध बनविली. अशाप्रकारचे भाषेचे आदान-प्रदान व्यापार, नोकरी, भाषिक व्यवहाराच्या माध्यमातून होत असते. तसेच विविध भाषांच्या संपर्कामुळे अनेक वेळा भाषेतील व्याकरणावर त्याचा परिणाम होत असतो. अनेक कारणांनी बदल होत असलेल्या भाषेचे पडसाद समाजजीवनावर होत असतात. अनेकवेळा आपण बोलताना आपल्या मातृभाषेचे शब्द वगळून फॅशन म्हणून परकीय भाषेतील शब्दांचा प्रयोग करतो. *उदाहरण - 'आज स्कूल किती वाजता सुटणार?, तिला चिकनपॉक्स आले होते, आपण डिनरला बाहेर जाऊ.'* अशा प्रकारच्या भाषा वापराला 'भाषामिश्रण' असे म्हणतात. बदलता समाज आणि बदलत्या सामाजिक गरजा भाषामिश्रण व भाषापरिवर्तनाला कारणीभूत ठरतात. परंतु ही भाषेची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. परकीयांचे आक्रमण, उच्चशिक्षणाचा प्रसार, सतत स्थलांतर, उच्चभ्रू लोकांच्या भाषेचे अनुकरण अशा अनेक कारणांनी भाषामिश्रित होते.

१.५.८ भाषाबदल

भाषिक परिवर्तनाला चालना देणारी अशी प्रक्रिया म्हणून **'भाषाबदल'** या प्रक्रियेचा विचार केला जातो. आपण संभाषण साधत असताना जर समोरचा दुसऱ्या भाषेत बोलत असेल तर आपण थांबतो. आपण आपली भाषा बदलून समोरचा ज्या भाषेत प्रतिसाद देत आहे त्या भाषेत संभाषण साधतो. यालाच 'भाषाबदल' असे म्हणतात. जागतिकीकरणामुळे भाषेचे स्वरूप बदलताना दिसते. पूर्वी शहरी वस्तु खेड्यांमध्ये विकणारे फिरस्ते त्या एका विशिष्ट खेड्याच्या भाषेतच वस्तूची विक्री केली जात असे. पण आता वेगळे रूप पहावयास मिळते. आता खेड्यांमध्ये विविध भाषा बोलणारे उच्चशिक्षित, परराज्यातील विविध कंपन्यांचे जाहिरातदार फिरताना दिसतात. मात्र हे फिरस्ते ग्रामीण भाषेत न बोलता हिंदी भाषेचा वापर करतात. खेड्यातील माणसेही त्यांच्याकडे मोडकी-तोडकी हिंदी बोलण्याचा प्रयत्न करतात. ही भाषिक बदलाची प्रक्रिया आहे. मुंबई हे जरी महाराष्ट्राचे शहर असले तरी तिथे पोहोचताच आपण हिंदी भाषेचा वापर करण्यास सुरू करतो.

'समाजभाषाविज्ञानामध्ये भाषामिश्रण व भाषापरिवर्तन यांच्या अभ्यासातून सामाजिक प्रवृत्ती व कारणांचा शोध घेता येतो.'[37] असे मत डॉ. रमेश वरखेडे यांनी मांडले आहे. त्यांच्या मतानुसार काहीवेळा स्थानिक बोली वापरणे योग्य ठरते. दलित किंवा ग्रामीण साहित्यकृतीमध्ये विशिष्ट एक बोली वापरल्यास त्या साहित्यकृतीचा जिवंतपणा टिकून राहतो. त्या ऐवजी जर प्रमाण मराठी वापरली तर ते कृत्रिम वाटण्याची शक्यता आहे. त्यामुळे अभिव्यक्तीमध्ये लेखकाला वास्तवचित्रणाच्या निवडीतून असे भाषापरिवर्तन करावे लागते. जसे दैनंदिन जीवनात मारवाडीच्या दुकानात गेल्यावर मराठी भाषिक मराठी सोडून हिंदी बोलणे योग्य मानतो. तसेच भाजीवालीशी बोलताना स्थानिक बोलीत (कोंकणी) बोलणे योग्य मानतो. म्हणून संज्ञापन व्यवहाराची निवड हे भाषा बदलाचे कारण असते.[38]

१.५.९ भाषानिषिद्धता

समाजामध्ये भाषेच्या संदर्भात काही सामाजिक संकेत असून त्यांचा विचार समाजभाषावैज्ञानिकामध्ये केला जातो. हे संकेत सामाजिक वर्ग, शुभ-अशुभाची कल्पना आदी कारणांनी तयार होतात. कोणत्याही समाजातील भाषाव्यवहारामध्ये भिन्नता ही जाती, धर्म, सत्ता आदी घटकांनी दिसून येते. समोरील व्यक्तीशी बोलताना त्या व्यक्तीचा दर्जा, काळ, परिस्थिति पाहून बोलले जाते. तसेच काय बोलावे, काय बोलू नये हे संस्कार समाजिकरणाच्या प्रक्रियेत अप्रत्यक्षपणे व्यक्तीवर होत असतात. यातूनच भाषानिषिद्धतेचे संकेत तयार होतात व ते प्रत्येक व्यक्तीकडून पाळले जातात. भारतीय समाजामध्ये कुंकू वाढले, बांगडी वाढली, तसेच स्त्री-पुरुषाच्या गुप्तांगाबद्धल चोरून बोलले जाते. वरील सर्व उदाहरणे भाषानिषिद्धतेची आहेत.[39]

१.५.१० भाषाप्रदूषण

अनेक परकीय भाषांच्या संपर्कामुळे भाषा प्रदूषित झाली असे म्हणता येते. पण अशा प्रक्रियेला भाषेच्या विकासाची वाट म्हणून भाषाविज्ञानामध्ये पाहिले जाते. त्यामुळे एखादी भाषा दुसऱ्या भाषेच्या संपर्कात आल्यावर भाषा प्रदूषण असे म्हणता येत नाही. उलट अशा संपर्कामुळे भाषेचा विकास होतो. परंतु याचा काही अंशी परिणाम मूळ भाषेवर पडतो. एखादा शब्द मूळ भाषेत असूनही न उच्चारता परकीय भाषेतील शब्दाचा वापर केला जातो. अशाने शब्द, वाक्यांच्या रचनेमध्ये बदल होतो. अनेकवेळा निष्काळजीपणामुळे

बोलताना, लिहिताना चुका निर्माण होतात. ह्या चुका भाषिक प्रदूषणाचाच भाग होय. 'डॉ. रमेश धोंगडे भाषाप्रदूषणासाठी 'वाचासरमिसळ' व 'वाचापदल' म्हणजेच भाषसंपर्कतील शब्दस्थरातील बदलांना वाक्यस्थरावरील बदलांना असा शब्दप्रयोग करतात.'[40]

१.६ प्रमाण मराठी भाषा आणि बोली

संपूर्ण जगात बोलल्या जाणाऱ्या भाषांचा विचार केल्यास प्रत्येक भाषेमध्ये अनेक भेद आढळतात. एका देशात एकच एक भाषा बोलली जात नाही. भारत देशाचा विचार करता कन्नड, मराठी, गुजराती, कोंकणी, हिंदी, गुजराती, पंजाबी, सिंधी अशा कितीतरी भाषा बोलल्या जातात.[41] या सर्व भाषांमध्येही त्यांच्या बोली असून त्यातील एक भाषा ही 'प्रमाण' भाषा असते. ही प्रमाण भाषा व्यवहारिक पातळीवर तसेच दोन दुभाषिकांमधला संवाद सुरळीत होण्यासाठी वापरली जाते. *उदाहरण - महाराष्ट्रात बोलली जाणारी मराठी व महाराष्ट्राच्या बाहेर बोलली जाणारी मराठी यात फरक आहे*. इतकेच नव्हे तर दर बारा कोसावर वाणी व पाणी बदलते या म्हणीनुसार प्रत्येक प्रदेशातील भाषा देखील बदलते. कारण प्रत्येक समाजात जाती, धर्म, व्यवसाय, लिंग, वय असे अनेक गट पडले जातात. हे गट इतर समाज गटाशी भिन्न असल्याने त्याचा परिणाम भाषेवर दिसून येतो. यासोबतच भौगोलिक परिसरामुळेही भाषा वेगळी ठरते. जरी दोन प्रदेशामधील भाषा वेगळी असली तरी एकमेकांना ती भाषा समजते. अशा एकाच भाषेच्या अंतर्गत वावरणाऱ्या भाषा भेदांना बोली असे म्हटले जाते.

प्रमाणभाषा व बोली यातील भेद सांगताना असे म्हणता येईल की एका विस्तीर्ण प्रदेशात बोलली जाणारी व भौगोलिक व सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेल्या बोलीभेदांना सामावून घेणारी भाषा म्हणजे **'प्रमाणभाषा'** होय. तर प्रत्यक्ष समाजगटाकडून बोलली जाणारी, त्यांच्या अंगवळणी पडलेली व प्रमाणभाषेशी थोडी वेगळी असणारी जी भाषिक रुपे वापरली जातात त्याला **'बोली'** असे म्हटले जाते. मराठीच्या असलेल्या अनेक बोली जसे - **कोल्हापुरी, अहिराणी, पुणेरी, खानदेशी** या सारख्या बोली **'प्रमाण मराठी'** भाषेत सामावल्या जातात. प्रत्येक प्रदेशातील बोली ही सारखीच बोलली जात नाही. त्यामुळे 'अहिराणी' किंवा 'वऱ्हाडी' बोलीचे आकलन सर्वांना होतेच असे नाही. उच्चार, शब्दसंग्रह, वाक्य तयार

करण्याची पद्धत आदी व्याकरणिकदृष्ट्या फरक असल्याने एक बोली दुसऱ्या बोलीपेक्षा वेगळी ठरते. त्यामुळे ज्यावेळी बोली समजण्यास कठीण जाते तेव्हा प्रमाण मराठी भाषेचा वापर केला जातो.

प्रमाणभाषा ही लिपिबद्ध असते. तर काही बोलींना लिपि नसते. बहुदा ज्याप्रमाणे एखादी बोली बोलली जाते तिचे लेखन जसेच्या तसे करणे अवघड जाते. बोली ही तिच्या अंगभूत गुणाने स्वाभाविक रूपात प्रकटते. तर प्रमाणभाषा ही व्यवहारिक भाषा असून ती कागदोपत्री, दूरदर्शन, आकाशवणी इ. ठिकाणी बोलली जाणारी, थोडी कृत्रिम व मुद्दाम शिकावी लागणारी भाषा आहे.

१.६.१ प्रमाणभाषा आणि बोली सहसंबंध

प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील सहसंबंध दर्शविताना असे म्हणता येते की बोलीतूनच प्रमाणभाषा उदयाला येते. एखाद्या ऐतिहासिक घटनेमुळे भाषेचे एखादे रूप पुढे येऊन तिचा विकास क्रमाक्रमाने प्रमाणभाषेच्या रूपात होतो. पुण्यात पेशवे राज्य करत असल्यामुळे तिथली मराठी तेथील मराठीला प्रमाण रूप प्राप्त झाले.[42] प्रमाणभाषेच्या तुलनेत बोली जिवंत व लवचिक असते. तिला चढ - उतार, वेग, वेगवेगळे हेल असल्याने ती आकर्षक वाटते. परंतु प्रमाणभाषेत उच्चार आणि लेखनात विविध प्रयोग होत नसल्याने ती स्थिर असते. तर बोलीमध्ये स्वाभाविकपणे विविध प्रयोग होत असतात. बदलत्या काळात शिक्षणप्रसारासाठी प्रमाणभाषेचा वापर अधिकाधिक करावा लागतो. भाषेच्या दृष्टीने समाज अधिकाधिक संघटित होत असतो. परंतु दैनंदिन व्यवहारासाठी बोली वापरणे आणि लेखन व सांस्कृतिक व्यवहारासाठी प्रमाणभाषा वापरणे यातूनही सामाजिक ऐक्याने द्विविध स्वरूप आणि प्रगतीच प्रतिबिंबित होते.[43] जरी बोलींमध्ये बदल झाला असला तरी प्रमाणभाषेतील सर्व घटकांचा समावेश तिच्यात होईलच असे नाही. तद्वत प्रमाणभाषेतील सर्व घटक अमुक एका बोलीत दाखवता येत नाही.

एका प्रमाणभाषेच्या वर्तुळात अनेक स्थानिक बोलींचा समावेश होतो. तिला एक केंद्रवर्ती क्षेत्र, संक्रमण-प्रसारण क्षेत्र आणि सीमाक्षेत्र असते. प्रमाणभाषेच्या सीमाक्षेत्रात असलेल्या बोलीत भाषामिश्रण आढळते. सीमाभागावरील दोन भाषांचे मिश्रण झाल्याने द्वैभाषिक समस्या उद्भवतात. प्रमाणभाषेतून लुप्त

झालेले काही शब्द बोलीभाषेत जशेच्या तसे आढळून येतात. तर प्रमाणभाषेत काही शब्द हे बोलीतून घेतले जातात.

१.६.२ बोली आणि गैरसमज

कोणतीही भाषा शुद्ध किंवा अशुद्ध असत नाही. भाषाविज्ञान भाषेबद्धलचे असे भेद मानत नाही. प्रत्येक समाजाची वैशिष्ट्यपूर्ण अशी ती भाषा असते. बोलीबद्धलचे अनेक गैरसमज आहेत. बोली म्हणजे 'गावंढळ' असे समजले जाते. प्रमाणभाषेच्या वर्चस्वातून असे गैरसमज निर्माण झालेले दिसतात. 'समाजात प्रमाणभाषा बोलणारी माणसे ही सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टीने प्रगत असतात. त्यामुळे साहजिकच त्यांच्या नजरेत बोलीभाषा बोलणारी माणसे ही अप्रगत व गावंढळ ठरतात.'[44] प्रमाणभाषा ही कागदोपत्री, शिक्षण, धर्मवाङ्मय इ.साठी वापरत असल्याने बोलीभाषा ही हलकी व कमी दर्जाची असे मानले जाते.

वास्तविक पाहता प्रत्येक बोली ही स्वतःच्या क्षेत्रानुसार, गरजेनुसार विकसित झालेली आहे. तसेच तिचा स्वतःचा असा शब्दसंग्रह ही आहे. तिचे स्वतःचे व्याकरणिक नियम असतात व बोलणारा हे भाषिक नियम पाळत असतो. हे बोलीभाषेच्या अभ्यासावरून सिद्ध झालेले आहे. त्यामुळे बोली ही अशुद्ध असते, तिचे उच्चार चुकीचे असून तिची व्याकरणिक रूपेही चुकीची असतात असे विधान करणे विपर्यस्त ठरते. म्हणून "बोलीभाषा म्हणजे एक परिपूर्ण असे भाषिक रूप असते हे मान्य करावे लागते."[45] जगातील सर्वच बोलींना लिपी असतेच असे नाही त्यामुळे त्या बोली अविकसित असतात असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण दैनंदिन वापरात प्रमाणभाषेचा वापर होत नसून बोलीभाषेचा वापर केला जातो.

बोलीच्या शुद्ध - अशुद्धतेच्या कल्पनेमुळे ती लेखनभाषा होऊ शकत नाही असा एक गैरसमज बोलीभाषेबाबत झालेला होता. परंतु आता जास्त प्रमाणात बोलीभाषेत लेखन होताना दिसते. त्यामुळे लेखन पेलण्याची क्षमताही बोलीत आहे हे सिद्ध होते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य ही या संदर्भातील उत्तम उदाहरणे आहेत.[46]

१.६ समारोप

पहिल्या प्रकरणामध्ये सी. एफ. हॉकेट या प्रसिद्ध भाषावैज्ञानिकाने भाषेची सात प्रमुख लक्षणे सांगितली असून भाषाविज्ञान व सामाजभाषाविज्ञानाबद्धल विवेचन केलेले आहे. भाषाशास्त्र आणि भाषाविज्ञानातील फरक सांगताना 'मानवी मुखेंद्रियातून निर्माण होणाऱ्या ध्वनिभाषेचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणून भाषाशास्त्राकडे पाहिले जाते'. कला आणि शास्त्र यांना जोडणारा दुवा म्हणजे भाषाशास्त्र असून लिखित भाषा आणि बोली यांचे निरीक्षण, पृथक्करणातून वस्तुनिष्ठपणे केले जाते. भाषाशात्रातील सिद्धांत हे व्यक्तीनिरपेक्ष असतात. भाषाशास्त्रात जरी भाषेचा अभ्यास होत असला तरी त्यामध्ये हावभाव, चित्रे, चिन्हांचा अंतर्भाव होत नाही. तर अर्थावरून भाषेतील ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास भाषाविज्ञानात अपेक्षित असतो. **फेद्रिनां द सोस्यूर** या अभ्यासकाने २०व्या शतकात पारंपरिक भाषाभ्यासाविरुद्ध आक्षेप घेतले. त्यांनी एककालिक व कालक्रमिक भाषाभ्यास भेदाची प्रेरणा मांडली. तसेच **भाषिक वर्तन** व **भाषिक व्यवस्था** हा मौलिक भेद ही त्यांनी सांगितला. **नोम चॉम्स्की** या अभ्यासकाने **भाषिक प्रयोग** व **भाषिक क्षमता** हा भेद सोस्यूरच्या भेदाशी तंतोतंत जुळत नसला तरी त्याच्याशी नाते सांगणार आहे. भाषाविज्ञानामध्ये व्यवहार भाषेचा अभ्यास केला जातो. संरचनावादी शाखेचा प्रणेता प्रसिद्ध भाषावैज्ञानिक **लेनार्ड ब्लूमफील्ड** या अभ्यासकाने **स्वन, स्वनिम, रूपिम, वाक्यविचार व अर्थविचार** असे भाषाभ्यासाचे पाच स्थर मानले.

१९६० समाजभाषाविज्ञान ही शाखा उदयाला आली. प्रत्येक समाजाची वेगळी समाज भाषा असते. त्या भाषेवर भौगोलिक प्रदेश, संस्कार, रूढी, जाती इ.चा प्रभाव पडलेला असतो. तसेच स्त्री-पुरुष-मुले यांची देखील वेगळी भाषा असते. अशा समाजभाषेचा अभ्यास समाजभाषाविज्ञानामध्ये केला जातो. समाजभाषाविज्ञान हे क्षेत्र विकसनशील आहे. समाजभाषाविज्ञानातील सर्व घटकांमध्ये व्यक्तीनुसार, समाजानुसार भाषेत बदल कसा होत जातो, तसेच भाषा कशी समृद्ध होत जाते, त्याचे फायदे-तोटे आदींचे विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रकरणाच्या शेवटच्या अनुच्छेदाद्वारे प्रमाणभाषा व बोली यांचे परस्पर संबंध व भेद सांगण्यात आला आहे. तसेच बोलीसंबंधीचे गैरसमजही मांडण्यात आलेले आहेत. प्रमाण भाषा ही अनेक भाषिक बोलींना

सामावून घेणारी भाषा आहे तर बोली ही एका विशिष्ठ समाजात बोलली जाणारी भाषा होय. जिचे स्वतःचे व्याकरणिक नियम असतात. त्यामुळे एक बोली दुसऱ्या बोलीपासून भिन्न ठरते.

१.७ निष्कर्ष

१. भाषाशास्त्रामध्ये लिखित भाषा आणि बोली यांचा निरीक्षणात्मक अभ्यास केला जातो.

२. भाषाविज्ञानामध्ये भाषेचा वर्तमानकालीन व इतिहास स्वरूपाचा अभ्यास होतो.

३. भाषाशास्त्र ही इतर शास्त्राप्रमाणे अनुभवाने सिद्ध होणारे शास्त्र होय.

४. स्वनांचा विचार हा भाषानिरपेक्ष असून स्वनिम व स्वनांतरांचा विचार हा भाषासापेक्ष केला जातो. लिपीवरून भाषेच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येत नसल्याने भाषा कशा प्रकारे बोलली जाते यावर भर दिला जातो.

५. समाजभाषाविज्ञानात विशिष्ट व्यक्तीची भाषा स्थिर मानून त्या भाषेचा वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास होतो.

६. समाजभाषाविज्ञानामध्ये समाजाला केंद्रस्थानी ठेऊन विविध व्यक्तींच्या भाषेचा अभ्यास होत असतो.

७. सामाजिक व भौगोलिक परिस्थितीमुळे एक बोली दुसऱ्या बोलीपासून वेगळी ठरते.

८. अनेक सामाजिक बोलींना सामावून घेण्याचे काम प्रमाणभाषा करते. प्रमाणभाषा ही विस्तीर्ण प्रदेशात बोलली जाते. लेखन व्यवहारात तिचा उपयोग होतो.

संदर्भ

---

[1] कदम, चंद्रकांत. *मराठी भाषा आणि भाषा विज्ञान*. रंगराव पाटील प्रशांत पब्लिकेशन्स ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव २०२२, पृ. ३१.

[2] कुलकर्णी, आरती. *भाषाविज्ञान: संकल्पना व स्वरूप*. विजय प्रकाशन, पृ. ५३.

[3] कुलकर्णी, आरती. *भाषाविज्ञान: संकल्पना व स्वरूप*. विजय प्रकाशन, पृ.५४.

[4] कुलकर्णी, आरती. *भाषाविज्ञान: संकल्पना व स्वरूप*. विजय प्रकाशन, पृ.५४.

[5] कुलकर्णी, आरती. *भाषाविज्ञान: संकल्पना व स्वरूप.* विजय प्रकाशन, पृ.५२.

[6] कुलकर्णी, आरती. *भाषाविज्ञान: संकल्पना व स्वरूप.* विजय प्रकाशन, पृ. ५३.

[7] कुलकर्णी, आरती. *भाषाविज्ञान: संकल्पना व स्वरूप.* विजय प्रकाशन, पृ.५१.

[8] काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान.* प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. ३६.

[9] संपादक पाटील, शिवाजी, गवळी, अनिल पांडुरंग. *आधुनिक भाषाविज्ञान.* एम. ए. भाग १ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ.२१.

[10] मालशे, स. गं., पुंडे, द. दि., सोमण,. *भाषाविज्ञान परिचय.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २००५, पृ. १६.

[11] संपादक मुसळे, सीमा. *वर्णनात्मक भाषाविज्ञान, प्रमाणभाषा व बोली.* एम. ए. भाग एक (मराठी), संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई. पृ.३२.

[12] संपादक मुसळे, सीमा. *वर्णनात्मक भाषाविज्ञान, प्रमाणभाषा व बोली.* एम. ए. भाग एक (मराठी), संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई. पृ.३२.

[13] काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान.* प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. ६६.

[14] काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान.* प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. १२२.

[15] संपादक पाटील, शिवाजी, गवळी, अनिल पांडुरंग. *आधुनिक भाषाविज्ञान.* एम. ए. भाग १ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ८७.

[16] काळे, कल्या., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान.* प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. १४७.

[17] काळे, कल्या., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान.* प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. १५०

[18] काळे, कल्या., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान*. प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. ३३६.

[19]https://www.tmv.edu.in/AitihasikVaVarnanatmakBhashaVidnyan.pdf पृ. १०.

[20] https://www.tmv.edu.in/AitihasikVaVarnanatmakBhashaVidnyan.pdf पृ. ११.

[21] वरखेडे, रमेश नारायण. *समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना*. सुमती लांडे, शब्दालय प्रकाशन, वॉर्ड क्र. ७, श्रीरामपूर २००१, पृ. १२.

[22] वरखेडे, रमेश नारायण. *समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना*. सुमती लांडे, शब्दालय प्रकाशन, वॉर्ड क्र. ७, श्रीरामपूर २००१, पृ. १३.

[23] काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान*. प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. ३६.

[24] काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान*. प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. ३४१.

[25] काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान*. प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. ३४२.

[26] काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान*. प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९, पृ. ३४२.

[27] https://www.tmv.edu.in/AitihasikVaVarnanatmakBhashaVidnyan.pdf पृ. ७४.

[28] मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी*. अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२, पृ. २८.

[29] वरखेडे, रमेश नारायण. *समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना*. सुमती लांडे, शब्दालय प्रकाशन, वॉर्ड क्र. ७, श्रीरामपूर २००१, पृ. १६.

[30] वरखेडे, रमेश नारायण. *समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना*. सुमती लांडे, शब्दालय प्रकाशन, वॉर्ड क्र. ७, श्रीरामपूर २००१, पृ. १७.

[31] मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२, पृ. ३८.

[32] मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२, पृ. ३९.

[33] मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२, पृ. ४०.

[34] मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२, पृ. ४२.

[35] मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२, पृ. ४६.

[36] मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२, पृ.४७.

[37] संपादक मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान.* एम. ए. भाग २ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. क्र. १५.

[38] संपादक मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान.* एम. ए. भाग २ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. क्र. १६.

[39] संपादक मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान.* एम. ए. भाग २ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. क्र. १६.

[40] संपादक मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान.* एम. ए. भाग २ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. क्र. १७.

[41] कदम, चंद्रकांत. मराठी भाषा आणि भाषा विज्ञान. रंगराव पाटील प्रशांत पब्लिकेशन्स ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव २०२२, पृ. ११५.

[42] संपादक मुसळे, सीमा. *वर्णनात्मक भाषाविज्ञान, प्रमाणभाषा व बोली*. एम. ए. भाग एक (मराठी), संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई. पृ. ८४.

[43] संपादक मुसळे, सीमा. *वर्णनात्मक भाषाविज्ञान, प्रमाणभाषा व बोली*. एम. ए. भाग एक (मराठी), संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई. पृ. ८४.

[44] कदम, चंद्रकांत. *मराठी भाषा आणि भाषा विज्ञान*. रंगराव पाटील प्रशांत पब्लिकेशन्स ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव २०२२, पृ. १२२.

[45] कदम, चंद्रकांत. *मराठी भाषा आणि भाषा विज्ञान*. रंगराव पाटील प्रशांत पब्लिकेशन्स ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव २०२२, पृ. १२३.

[46] कदम, चंद्रकांत. *मराठी भाषा आणि भाषा विज्ञान*. रंगराव पाटील प्रशांत पब्लिकेशन्स ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव २०२२, पृ. १२३.

प्रकरण २

खानापूर प्रदेशातील लोकभाषा आणि संस्कृती

प्रास्ताविक..42

२.१ खानापूर प्रदेश : व्याप्ती व प्रदेश वैशिष्ट्य...43

२.१.१ खानापूर प्रदेशाच्या अंतर्गत येणारी गावे 44

२.१.२ प्रदेश वैशिष्ट्य...45

२.२ समाज वैशिष्ट्य...48

२.२.१ धर्म, जाती 49

२.२.२ व्यवहार 51

२.२.३ सण-वार, व्रतवैकल्य 53

२.२.३.१ चाली-रिती..57

२.३ लोकभाषा व त्यांचे वैशिष्ट्य...60

२.३.१ कोंकणी बोली 61

२.३.२ उमरगा तालुक्यातील बोली...62

२.३.३ चंदगडी बोली..63

२.३.४ खानापुरी बोली 64

२.४ खानापुरी बोली आणि संस्कृती सहसंबंध..65

२.५ समारोप 68

२.६ निष्कर्ष 69

संदर्भ 70

प्रकरण २

खानापूर प्रदेशातील लोकभाषा आणि संस्कृती

प्रास्ताविक

कोणत्याही प्रदेशातील बोली ही तिथल्या मानवी जीवनात खोलवर रुतलेली असते. भौगोलिक परिस्थिती, तिच्याशी जुळवून घेणारी जीवनपद्धती, रूढी, प्रथा, परंपरा, खाद्य संस्कृती, धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था या सर्वातून विशिष्ट बोली घडत जाते. या सर्वासोबत परभाषेचा शेजारही भाषेमध्ये मोलाची भर टाकतो. लोकभाषेबद्धल विचार करताना असे म्हणता येते की, एखादी बोली त्या बोलीभाषकांच्या समाजव्यवहाराला जितकी सक्षम बनवते, तितकीच ती बोली अधिक सक्षम ठरते. कोणतीही बोली अस्तित्वात येताना आपली स्वतःची स्वतंत्र संदेशनव्यवस्था प्रमाण भाषेशी सहधर्म आणि वैधर्म राखून जन्मत असते. बोलीत येणारा एखादा वैशिष्ट्यपूर्ण शब्द प्रमाण भाषेतील संपूर्ण वाक्याचा अर्थ सांगून जातो.

कर्नाटकातील 'खानापूर' तालुक्यात बोलली जाणारी 'खानापुरी बोली' ही सभोवतालच्या परिसरामुळे वैशिष्ट्यपूर्ण बनलेली आहे. खानापूर हा प्रदेश प्रदीर्घ असल्याने कन्नड, कोंकणी, पोर्तुगीज, हिंदी भाषेचा प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला आहे. तसेच खानापूर तालुक्यामध्ये विविध सणवार साजरे केले जातात. खानापूर हा तालुका जवळच्या गावांकरिता व्यवहारासाठी महत्त्वाचा ठरतो. या बोलीच्या अभ्यासासाठी विशेष लिखित स्वरूपात साहित्य उपलब्ध नाही. तसेच या परिसरातील साहित्यिकांनी अद्याप त्यांच्या लेखनासाठी खानापुरी बोलीचा वापर केलेला नाही. तद्वत या विषयात संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

सदर प्रकरणातून खानापूर प्रदेशाची व्याप्ती व वैशिष्ट्ये मांडण्यात आलेली आहेत. याचबरोबर खानापूर तालुक्याचा इतिहासही सांगण्यात आलेला आहे. लोकभाषा व वैशिष्ट्ये सांगताना इतर बोलींचाही विचार तत्संबंधात होणे आवश्यक आहे. खानापूरातील समाजवैशिष्ट्ये सांगताना खानापूरातील धर्म, जाती, व्यवहार, सण-वार यांचा विचार करण्यात येणार आहे. तसेच खानापुरी बोली व संस्कृती यांचा सहसंबंद्ध दर्शविण्यात येणार आहे.

२.१ खानापूर प्रदेश : व्याप्ती व प्रदेश वैशिष्ट्य

कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यापासून २७ कि.मी.च्या अंतरावर खानापूर हा तालुका आहे. बेळगाव, कित्तूर, अळणावर व गोवा या सीमाभागांशी हा प्रदेश जोडलेला असून पणजी - बेळगावच्या राष्ट्रीय महामार्ग **NH 4A** वर खानापूर तालुका आहे. खानापूर प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ १७४८.३ कि. मी. आहे. '२०११च्या जनगणनेनुसार खानापूरातील लोकसंख्या ३४,१०२ इतकी आहे. त्यामध्ये पुरुषांची संख्या १७,१९४ इतकी असून महिलांची संख्या १६,९०८ इतकी आहे.'[1] 'खानापूर तालुक्यामध्ये एकूण २२० गावे असून ५१ पंचायती व १ नगर परिषद आहे.'[2] खानापूर हे बेळगाव जिल्ह्यातील एक पंचायत शहर आहे. तसेच हे शहर नगरपरिषद शहराचा कारभार पाहते. 'खानापूर' हे खानापूर तालुक्याचे मुख्यालय आहे. हा प्रदेश **'राष्ट्रीय स्तरावरील कुंभारकाम प्रशिक्षण केंद्रा'**साठी प्रसिद्ध आहे. 'सेंट्रल व्हिलेज पॉटरी इन्स्टिट्यूट' ही खादीद्वारे व मलप्रभा नदीच्या काठावर असलेले ग्रामोद्योग आयोग हे चालवितात. इथे रेडवेअर व व्हाईटवेअर तंत्रज्ञानामध्ये उत्कृष्ट रित्या मातीकाम प्रशिक्षण दिले जाते. तसेच **'चौदा मुशी असलेला ब्रिटिशकालीन पूल'**, **कदंबकालीन 'नृसिंह मंदिर' हलशी, 'भिमगड अभयारण्य'** आदीसाठी प्रसिद्ध आहे.

बेळगाव नजीक असलेल्या 'कणकुंबी' गावातून उगम पावलेल्या **मलप्रभा** नदीचा प्रवाह या प्रदेशातून वाहतो. ही नदी या खानापूर प्रदेशाकरिता महत्त्वाची ठरते. संपूर्ण खानापूरातील शेती या नदीच्या पाण्यावर अवलंबून असते. खानापूरचा संपूर्ण भाग हा घनदाट झाडीने वेढलेला असल्यामुळे तिथे थंड हवामान असते. तसेच खानापूर अंतर्गत येणाऱ्या गावांपैकी अनेक गावे ही जंगलाने वेढलेली आहेत. त्यामुळे या भागात उष्णतेचा परिणाम जास्त जाणवत नाही. खानापूर हा तालुका बेळगाव नजीक जरी असला तरी बेळगावपेक्षा खानापूर प्रदेशात उष्णतेचा प्रभाव कमी आहे. त्यामुळे हा प्रदेश थंड प्रदेश म्हणून ओळखला जातो.

खानापूर हा 'कर्नाटक' राज्याचा भाग असल्याने सर्व सरकारी दस्ताऐवज कन्नड भाषेत आहेत. कन्नड ही जरी राज्यभाषा असली तरी मराठी भाषा देखील समप्रमाणात बोलली जाते. कन्नड व मराठी भाषिक समाज या प्रदेशात प्रामुख्याने आढळतो. याचसोबत कोंकणी, उर्दू भाषिकही या प्रदेशातून आढळतात.

खानापूरातील अर्थव्यवस्था कृषिकेंद्रीय आहे. येथे ऊस, चिकू, 'भयमुग' (भुईमुग), भात, नाचणी, यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. तसेच इतर भाज्यांचीही शेती केली जाते. शेतात काळी माती असल्याने पिकही चांगले येते. खानापूरातील शेतकरी वर्षातील बाराही महीने काही ना काही तरी शेतात पिकवत असतात. या सोबत काजूचे पिकही येथून घेतले जाते. तसेच चुरमुरे आणि गूळ यासारख्या खाद्यपदार्थासाठीही खानापूर प्रसिद्ध आहे.[3] खानपूरच्या अंतर्गत येणाऱ्या खेड्यांना व्यवसायासाठी खानापूर महत्त्वाचे आहे. विविध खेड्यातून, विविध जातीजमातीची माणसे व्यवसायाकरिता येतात. त्यामुळे सहजच भाषेची देवाण - घेवाण होत असते. यावेळी प्रमाणभाषेचा वापर न करता खानापुरी बोलीतूनच हा व्यवहार केला जातो. त्यामुळे मुस्लिम, ख्रिस्ती धर्मीयसुद्धा खानापुरी बोलीतूनच व्यवहार करतात.

खानापूर प्रदेश

सौजन्य – https://en.wikipedia.org/wiki/khanapur

२.१.१ खानापूर प्रदेशाच्या अंतर्गत येणारी गावे

खानापुरी बोली ही खानापूर तसेच खानापूर तालुक्याच्या अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये ही बोलली जाते. या गावातून बोलल्या जाणाऱ्या बोलीचा अभ्यास थोड्या फार प्रमाणात करण्यात आलेला आहे.

प्रबंधिकेला आखलेल्या मर्यादेमुळे सर्व गावातील बोलींचा अभ्यास करता आला नाही. खालील गावांना खानापूर हा प्रदेश सर्व अर्थाने महत्त्वाचा ठरतो.

खानापूर	रुमेवाडी
मुडेवाडी	आसोगा
हत्तरगुंजी	शिंदोळी
हलकर्णी	हालशी
खेमेवाडी	कापोली
आंकले	शिवठाण
गणेबैल	माचाळी
रामगूरवाडी	माचीगड
इदीलोंड	डुक्करवाडी
बाचोळी	लक्केबैल
होनकल	हारुरी
जाळगा	हेब्बाळ
जांबोटी	खैरवाड
मोदेकोप	लोकोळी
नागुर्डा	सिंगिंकोप
यडोगा	करजगी

तक्ता क्रमांक २.१ खानापूर तालुक्यातील गावे

वरील गावांमध्ये कमी अधिक फरकाने खानापुरी बोली बोलली जाते. येथील लोक दैनंदिन व्यवहारासाठी खानापूरात येतात.

२.१.२ प्रदेश वैशिष्ट्य

बेळगाव - गोवा महामार्गावर स्थायिक असलेला प्रदेश म्हणजे ‘खानापूर’ तालुका होय. या तालुक्याचा इतिहास थोड्याफार प्रमाणात मांडणे महत्त्वाचे आहे. खानापूर हा प्रदेश प्रदीर्घ आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक प्रदेशाला पुरातनीय नाव असते, त्याचप्रमाणे खानापूर तालुक्याचे देखील नाव आहे. भोज, कदंबांच्या काळात खानापूर या प्रदेशाला **ओक्कलुतान** या नावाने ओळखले जात होते. या नावाचा संदर्भ बा. द. सातोस्करांच्या ‘गोमंतक: प्रकृती आणि विकृती’ या ग्रंथात तसेच ‘कर्नाटका ग्राम चरित्र कोश बेलगाम’ या ग्रंथात सापडतो.

कदंब, भोज, इंग्रज या राजवटींचे राज्य खानापूर तालुक्यावर होते. तसेच कदंब राजवटी दरम्यान कदंबांची उपराजधानी ही खानापूर तालुक्यातील 'पलासिका' म्हणजेच आजचे **हलशी** गाव होते.[4] खानापूर तालुक्याचा इतिहास हा तसा व्यापाक आहे. या तालुक्याच्या अनेक गावांमध्ये प्राचीन काळातील शिलालेख सापडतात. तसेच या संदर्भातील काही नोंदी गोमंतकाच्या इतिहासात सापडतात. यातील हलशी या गावाचा उल्लेख जास्त प्रमाणात येतो. 'हळशी' म्हणजेच आजचे हलशी या गावात गोवा राज्यातील कदंब स्थायिक होते. असा संदर्भ बा. द. सातोस्करांच्या 'गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती खंड १ ते ३' या ग्रंथात सापडतो. तसेच गोवा कदंबाचे अनेक लेख गोवा, धारवाड सोबत खानापूरातही सापडतात.[5] यासोबतच 'कापोली' या गावात भोज राजवटीतील ताम्रपट सापडतो.[6]

खानापूरात इंग्रजकालीन पूल पहावयास मिळतो. इंग्रजांचे राज्य तसेच इतर राजवटींचे ही राज्य होते. त्याचा पुरवा म्हणजे हलशी या गावात असलेले कदंबकालीन 'नृसिंह मंदिर', मिशीनरींच्या शाळा होय. या प्रदेशात हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती या धर्माचे तसेच विविध जातींचे लोक मिळूनमिसळून राहतात.

खानापूर हे 'राष्ट्रीय स्तरावरील कुंभारकाम प्रशिक्षण केंद्रासाठी' जास्त प्रसिद्ध आहे. मलप्रभा नदीच्या उत्तरेकडील तीरावर 'कर्नाटक राज्य सरकार संचालित पोलिस प्रशिक्षण शाळा' आहे. ही शाळा कर्नाटक राज्यात पोलिस हवालदार म्हणून नियुक्त केलेल्या नवीन भरतींना मूलभूत प्रशिक्षण देते. तसेच हलशी या गावात असलेले **'कदंबकालीन नृसिंह मंदिर'**, **'भिमगड अभयारण्य'** यासाठी प्रसिद्ध आहे. याचबरोबर 'चौदा मुशी' असलेला ब्रिटिशकालीन पूल, कदंब शैलीतील देवगाव येथे असलेले 'कमला नारायण मंदिर' प्रसिद्ध आहे. मलप्रभा नदीच्या काठावर वसलेले **'असोगा'** या गावात **'कदंब राजांच्या'** काळात बांधलेले मंदिर पर्यटकांना आकर्षित करते. १९७० साली गाजलेला 'अभिमान' या चित्रपटातील 'नदीया किनारे' या गीताचे चित्रण याच नदीच्या किनारी करण्यात आले होते. त्यामुळे ही जागा जास्त प्रमाणात प्रेक्षणीय ठरली.[7] तसेच 'भीमगड अभयारण्य', 'शिंदोळी बी. के.' या गावात पांडवांनी बांधलेले **शिव मंदिरही** प्रसिद्ध आहे.

दर बारा वर्षांनी 'लक्ष्मी देवीची जत्रा' खानापूरात होते. ही जत्रा सलग नऊ दिवस असून विशेष तालुक्याची म्हणून बऱ्याच मोठ्या प्रमाणात ही जत्रा भरते. तद्वत खानापूर हा तालुका प्रदीर्घ असल्याने छोटेखानी स्वरूपात तीन- चार गावे मिळून त्या गावाच्या नावाने लक्ष्मी जत्रा केली जाते. 'मऱ्यामा देवी'

(मरी अम्मा, महाराष्ट्रातील मरी आई), 'श्री रवळनाथ', 'चौराशी देवी', 'श्री सातेरी', श्री विठ्ठल, श्री हनुमान ही खानापूरातील महत्त्वाची देवस्थाने आहेत'.[४] दर रविवारी भरणारा आठवड्याचा बाजार हा येथील प्रत्येक गावासाठी महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणे गुरांचा बाजारही येथे भरतो.

खानापूर तालुक्याचा गोवा राज्याशी अधिक जवळचा संबंध आहे. रोटी-बेटी या व्यवहाराच्या दृष्टीने हा संबंध अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे खानापूरात बोलल्या जाणाऱ्या खानापुरी बोलीवर कन्नड सोबतच कोंकणी भाषेचा ही प्रभाव तितक्याच प्रमाणात दिसून येतो. गोमंतकात ज्याप्रमाणे 'देसाई' समाजाला मान असतो त्याचप्रमाणे खानापूरात देखील जमीन, पूजेसाठी त्यांना मान दिला जातो. आणखीन एक वैशिष्ट्य सांगायचे झाल्यास प्रत्येक जातीजमातीची वस्ती इथे पहावयास मिळते. तद्वत येथील माणसांचे आडनाव, जाती व धर्माप्रमाणे गल्लीची विभागणी केली आहे. *उदाहरण- घाडी गल्ली, देसाई गल्ली, लक्ष्मी नगर, मारुती गल्ली, मेदर गल्ली, पादरी गल्ली, कसाब गल्ली आदी.* या सोबतच खानापूरातील काही रहिवासीयांची वंशावळ लिहून ठेवण्याची प्रथा आहे. अशी वंशावळ लिहिणाऱ्या व्यक्तीला 'हेळवा' या नावाने संबोधले जाते. 'हेळव्या'ला वंशावळ लिहिण्याच्या मुबतला हंडा, धान्य असे दिले जाते.

खानापूर तालुक्यातील बहुतांशी रहिवासीयांचे कुळदैवत हा कोल्हापूरचा **ज्योतिबा** व **सौंदत्तीची यल्लम्मा** आहेत. ग्राम देवासोबतच या दैवतांवरही येथील लोकांची फार श्रद्धा आहे. तसेच येथील काही लोकांची नावेही याच देवाच्या नावावरून ठेवली जातात. जसे- रेणुका, ज्योतिबा, परशुराम, यल्लप्पा, मोनेश्वर आदी. त्यामुळे एकाच नावाच्या अनेक व्यक्ती इथे सापडतात. तद्वत एकाच कुटुंबात दोन सारखीच नावे असलेली व्यक्तीही पहावयास मिळते. वारकरी संप्रदायाबद्धलची निष्ठा खानापूरात पहावयास मिळते. ऑक्टोबर महिन्यात सलग दहा दिवस 'सार्थ ज्ञानेश्वरीचे पारायण' केले जाते. या पारायणाला इतर गावातील लोकही सामील होतात. रात्रीच्या वेळी कीर्तनाचा कार्यक्रम असतो व शेवटच्या दिवशी गावजेवण असते. तसेच काही गावांमध्ये विठ्ठलाचा सप्ताह केला जातो.

दळणवळणाबद्धल सद्य स्थितीचा विचार करता आता बऱ्या प्रमाणात पक्के रस्ते झालेले आहेत. जांबोटी क्रॉस जवळ असलेले 'नवे' तर मुख्य बाजार पेठेत असलेले 'जुने' अशी दोन बस स्थानके खानापूरात आहेत. त्यामुळे खानापूर-गोवा, खानापूर-बेळगाव, खानापूर-हुबळी, खानापूर-कोल्हापूर अशी

बससेवा उपलब्ध आहे. तसेच इतर गावांमध्ये जाण्यासाठीही बसची सोय आहे. काही मोजकी खेडी वगळल्यास सर्व खेड्यांकडे जाण्यासाठी पक्के रस्ते झालेले आहे. याचबरोबर कन्नड व इंग्रजी शाळेसोबतच मराठी व उर्दू शाळा देखील या प्रदेशात आहेत. तसेच दोन समृद्ध ग्रंथालये आहेत तर उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये देखील आहेत.

२.२ समाज वैशिष्ट्य

'समाजभाषाविज्ञानामध्ये समाज भेदासोबत भाषिक भेदही लक्षात घ्यावे लागतात. डॉ. मिलिंद मालशे यांच्या मतानुसार बोलींचा भेद केवळ प्रादेशिक किंवा भौगोलिक प्रदेशानुरूप निश्चित करता येत नाही. तर सामाजिक रचनेतील भेदांच्या आधारे भाषा भेदांचा शोध घेता येतो. धार्मिक भेद, जाती-जमाती, उपजाती, वय, लिंग हे भेद सामाजिक तसेच भाषिक भेदांच्या दृष्टीतून महत्त्वाचे आहेत'.[9] प्रत्येक समाजाची भाषा वेगळी असते. खानापूर तालुका हा प्रदीर्घ असल्याने अनेक जवळच्या प्रांतांचा प्रभाव खानापुरी बोलीवर, येथील संस्कृती, व्यवहारावर झालेला दिसून येतो. 'ज्या समाजाची भाषा असेल त्या समाजाचा प्रभाव स्वाभाविकपणे त्या भाषेवर पडतो. तसेच समाजाच्या सामाजिक वातावरणाचा परिणामही भाषेवर होतो. एकाच भाषिक समाजात वेगवेगळी भाषा बोलली जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक समाज गटाची भाषादेखील वेगळी असते'[10].

खानापूर तालुक्यात अनेक जाती-जमाती, विविध धर्म, भाषा, व्यवसाय इ. आढळतात. त्यामुळे या समाजातील विविधता या बोलीतही आढळते. या तालुक्यात प्रामुख्याने हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्माचे लोक राहतात. तसेच धनगर, मारवाडी, वडार, ढोरी, चांभार,डोंबारी आदी भटक्या जमातीचे लोक राहतात.

इथे एक नमूद करणे महत्त्वाचे आहे. ते म्हणजे प्रबंधिकेच्या मर्यादेमुळे जातीनुसार भाषेचा अभ्यास येथे करण्यात आला नाही. केवळ धर्मानुसार भाषेचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

खानापूर तालुक्यातील प्रत्येक घरामध्ये एक कुलदैवत (पुरुष देवत) व एक कुलदेवता (स्त्री देवता) आहे. काहींचा कुलदेव हा कोल्हापूरचा ज्योतिबा असतो. तर काही लोकांची कर्नाटकातील सौंदत्तीची यल्लम्मा असते. या दोन्ही दैवतांवर खानापूरातील लोकांची फार श्रद्धा आहे. येथील लोकांची धार्मिक व भाविक वृत्ती, धर्माचरण करण्याकडे तसेच पापपुण्याच्या कल्पनेवर असलेला त्यांचा विश्वास हे समाजाचे

अजून एक वैशिष्ट्य सांगता येते. येथील बहुतांशी विवाह हे आपल्याच आते किंवा मामे मुला/मुलीशी व्हायचे. वर्तमानात या नात्यांचे स्वरूप क्वचित बदलताना दिसते.

२.२.१ धर्म, जाती

खानापूर तालुक्यात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन या धर्माचे लोक राहतात. खानापूरात बहुतांशी कुटुंबातील कुलदैवत व कुलदेवता हे 'कोल्हापूरचा ज्योतिबा' व 'सौंदत्ती यल्लम्मा' आहेत. ज्योतीबा देवाच्या गुलालासोबत यल्लम्मा देवीचा 'भंडारा' देखील प्रत्येकाच्या कपाळी असतो. या देवांवर येथील लोकांची फार श्रद्धा आहे. दर मंगळवारी व शुक्रवारी गावातील जोगतिणी यल्लम्मा देवीच्या नावे जोगवा मागायला जातात. त्यावेळी 'या कूंदे जोगवा' असे म्हणत जोगवा मागतात. ज्या घरी यल्लम्मा देवीच्या परड्या असतात ते दर मंगळवार व शुक्रवार कडक पाळतात. कोणीही इथे सौंदत्तीला जातो असे न म्हणता 'यल्लम्माला' जातो असे म्हणतात.

खानापूरातील काही लोक 'रान पुनवेला' (रांड पौर्णिमेला) **यल्लम्माला** जाऊन येतात तर काही 'चुडी पुनवेला' (चुडी पौर्णिमेला) सौंदत्ती यल्लम्माला जातात. यल्लम्मालाहून आल्यावर थेट घरी न जाता गावाबाहेर एका मळ्यात राहतात. त्याला 'बागेत' असे म्हटले जाते. तिथे एक रात्र राहून दुसरे दिवशी सर्व गावातील लोक मिळून देवीचा 'मारग मळतात', ही एक प्रकारची छोटी जत्रा असते. 'मारग' मळताना देखील जातीनुसार विभागणी केली जाते. याचे सविस्तर खानापूरच्या जाती व्यवस्थेबाबत सांगताना मांडण्यात येईल. त्या दिवशी 'मांडांत' परड्या भरल्या जातात. 'परड्या' या शब्दाला खानापुरी बोलीत **'पडल्या'** असे संबोधले जाते. तसेच दसरा, लग्नकार्याला सुरुवात करताना परड्या भरल्या जातात. तद्वत काही गावात गृहप्रवेश करतानाही परड्या भरतात.

ज्याप्रमाणे यल्लम्मा देवीचा मारग मळला जातो त्याचप्रमाणे **ज्योतिबा** देवाचाही मारग मळला जातो. या दोहोंमध्ये फरक इतकाच की ज्योतिबाहून आल्यावर 'खानापूरातील' माणसे मळ्यात न राहता देवळात राहतात. परंतु मारग मात्र मळ्यात मळतात. दुसऱ्या दिवशी ज्यांचा कुलदेव ज्योतिबा आहे केवळ तीच माणसे मारग मळायला जातात. तर यल्लम्मा देवीचा मारग मळताना संपूर्ण गाव जाते.

खानापूरात हिंदूप्रमाणे इस्लाम धर्मीयदेखील समप्रमाणात आहेत. रमजान, ईद हे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करतात. मुस्लिम धर्मीय लोकांवर खानापुरी तसेच प्रमाण मराठी भाषेचा प्रभाव दिसून येतो.

हिंदी, उर्दू बोलताना काही मराठी शब्द त्यांच्या बोलण्यातून येतात. खानापूरात अनेक ठिकाणी मशीदी आहेत. तसेच त्यांची एक गल्लीदेखील आहे. त्या गल्लीचे 'कसाबगल्ली' व 'जळका वाडा' अशी नावे आहेत. तर काही मुस्लिम धर्मीय लोक जिथे हिंदू धर्मीय लोक राहतात त्याच गल्लीत राहताना दिसतात. इथे हिंदू - मुस्लिम मधील एकी पहावयास मिळते. काही मुस्लिम धर्मीय लोक खानापूरात भाजीचा व्यापार करताना खानापुरी बोलीचाच वापर करतात. त्यामुळे खानापुरी बोली ही त्यांच्यासाठी 'व्यवहार भाषा' ठरते. मुस्लिम प्रमाणे ख्रिश्चन धर्मीय लोक ही खानापूरात आहेत. 'पादरी गल्ली' ही त्यांच्यासाठी नेमलेली आहे.

ख्रिस्ती समाजाची भाषा कोंकणी व खानापुरी मिश्रित असल्याने हिंदू लोक त्यांना 'कोकनी लोक' या नावाने संबोधतात. काही प्रमाणात प्रमाणभाषा देखील त्यांच्या बोलण्यातून येते. दर रविवारी इगर्जित होणारी प्रार्थना ही कोंकणी भाषेत होते. तर प्रार्थने नंतरची आरती कोंकणी, मराठी, इंग्रजी या भाषांतून होते.

ज्याप्रमाणे खानापूर तालुक्यामध्ये विविध धर्म आहेत त्याचप्रमाणे **जातीभेद** ही आहेत. मराठा, कुंभार, चांभार, सुतार, वडार, परीट, ढोर, महार (म्हार), सोनार, मारवाडी, धनगर (कुरबर) आदी जाती जमाती आहेत. या जातीनुसारही भाषेत बदल होतो. त्यांच्या बोलण्यात रोजच्या व्यवहारातले शब्द येतात. देव-धर्माच्या बाबतीत जातीव्यवस्था फार पाळल्या जातात. जरी खानापूरात ब्राह्मण समाज असला तरी काही देवांची पूजा हे गावातील मानकरी करतात. घाडी, गुरव, मिराशी, पाटील, देसाई या जातीतील लोकांना काही मंदिरे वाटून दिलेली आहेत. ते मंदिरातील रोजची पूजा करतात. जत्रा, देवीचा उत्सव या वेळी मात्र ब्राह्मणांकडून पूजा केली जाते. तर दुसरीकडे अशा उत्सवांमध्ये 'मादार' जमातीतील लोकांना देवपूजेसाठी वेगळा मान राखून ठेवला जातो. ज्यावेळी नवजोडप्यांची 'नजर काढायची' (दृष्ट काढायची) असते त्यावेळी 'महार' जातीतील स्त्रीला बोलावले जाते. याचबरोबर ज्यावेळी 'परड्या' भरल्या जातात तेव्हा महार लोकांसाठी वेगळे पान काढून ठेवले जाते. अशा प्रकारच्या नैवेद्याला 'म्हारताळ' असे म्हटले जाते. 'धनगर' या जमातीला खानापूर बोलीत 'कुरबर' या नावाने संबोधले जाते.

समाजभाषाविज्ञानात भाषेचा समाजसापेक्ष अभ्यास केला जात असल्याने भाषाभेदांचा अभ्यास महत्त्वाचा मनाला जातो. कोणताही समाज एकाच प्रकारची भाषा वापरत नाही. प्रदेश, लिंग, व्यवसाय, वर्ग, वयोमानानुसार भाषेत बदल होत असतात.[11]

२.२.२ व्यवहार

खानापूर तालुका हा जवळच्या खेडेगावांसाठी व्यवहाराच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तसेच खानापूरातील माल हा नजीकच्या राज्यामध्ये, गावांमध्ये पोहोचविला जातो. मुंबई, गोवा अशा ठिकाणी खानापूरातील भाजी, विटा अशा इतर व्यवहारिक गोष्टी पोहोचविल्या जातात. तसेच येथील लोकही व्यवहारासाठी इतर प्रदेशात जातात. महाराष्ट्र, गोवा या ठिकाणी खानापूर प्रदेशातील लोक जास्त प्रमाणात स्थलांतरीत झालेले आढळतात. या सर्वांमुळे सहजच इतर भाषेचा प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला आहे. कोंकणी भाषेचा प्रभाव खानापुरी बोलीवर जास्त असलेला दिसून येतो. खानापूरातील मिठाई, दागिने, किराणा या प्रकारचा व्यवसाय मराठा लोकांसोबतच मारवाडी समाजातील लोकही करतात. त्यामुळे सहजच त्यांच्याकडून खानापुरी बोलीचा, हिंदी, कन्नड भाषेचा वापर होतो.

खानापूर तालुका हा मागील नमूद केलेल्या गावांसाठी व्यवहारिक दृष्टीने महत्त्वाचा आहे. ‘कृषि व्यवसाय’ हा मोठ्या स्वरूपात आहे. वर्षाचे बाराही महीने येथील लोक शेतात काही ना काही तरी पिकवत असतात. इथे आठवड्याचा बाजार रविवारी भरतो. आजूबाजूच्या गावातील माणसे आपला माल विकण्यासाठी खास या बाजारात येत असतात. तसेच नंदगड या गावात बुधवारी आठवड्याचा बाजार छोटेखानी स्वरूपात भरतो. खानापूर हे नगर असल्याने या बाजाराचा ओढा प्रत्येकाला असतो. या बाजारात विविध गावातील धर्माचे, जातीचे लोक एकत्र येतात. येथे व्यवहार करताना प्रमाण भाषेचा वापर न करता खानापुरी बोलीचा वापर केला जातो. वेगवेगळया गावातून लोक आल्यामुळे सहजच त्यांच्याही तोंडून खानापुरी बोली बोलली जाते. त्यामुळे या लोकांसाठी ही व्यवहार भाषा ठरते.

खानापूर प्रदेशातील पीके आणि उत्पादने जसे ऊस, चिकू, मिरची, भुईमूग, नाचणी यांचा व्यवहार इतर राज्यांमध्ये केला जातो; तसेच ‘हलकर्णी’ या गावात साखरकारखाना असल्याने खानापूरच्या आजूबाजूला असलेल्या गावातील ऊस या कारखान्यात येतो. त्याच बरोबर गूळ उत्पादन (गुड उत्पादन) करायचा व्यवसाय ही येथे केला जातो. विटा बनविण्याचे काम या प्रदेशात मोठ्या प्रमाणात चालते. त्याला ‘विटा मारणे’ असे म्हणतात. तसेच बऱ्याच प्रमाणात गावातील स्त्री-पुरुष रोजगाराला जातात. या व्यवसायासोबत कुंभार काम, चांभार काम, सुतार काम, सोनार, लोहार काम, बांबुकाम असे व्यवसायही येथील लोक करतात.

या सोबत मासे विकण्याचाही व्यवसाय केला जातो. काही माणसे प्रत्येक गावात जाऊन मासे विकतात. विशेषतः 'सुके बांगडे', 'सुकी कोळंबी' ही विकतात. हा व्यवसाय करताना प्रत्येक गावानुसार यांची नावे बदलतात. काही ठिकाणी 'बांगडे' तर काही ठिकाणी 'मासोळी' असे म्हटले जाते. 'सुकी कोळंबी' हिला 'कोळंबी' या नावाने या प्रदेशात कोणीही संबोधत नाही. तर तिला 'झिंगे', 'चिंगूळ', 'सुकी सुंगटं' अशा नावाने संबोधले जाते. प्रत्येक गावानुसार अशा प्रकारे नावे बदलताना दिसतात. काही प्रमाणातील मासे हे बेळगावहून खानापूरात विक्रीसाठी आणतात व हे मासे विकत घेण्यासाठी खानापूर व इतर गावातील लोक येतात. तसेच कारवार, गोवा येथूनही मासे खानापूरात विक्रीसाठी येतात. त्यामुळे भाषेच्या अनुषंगाने सांगायचे झाल्यास मासे विकणाऱ्या लोकांवर बेळगावी भाषेचा प्रभाव जाणवतो.

तसेच एका विशिष्ट दिवशी 'गुरांचा बाजार' भरतो. याच बाजारात बकरी, कोंबडे विकण्यासाठी इतर गावातील माणसे एकत्र येतात. त्यामुळे कन्नड, हिंदी या भाषांचा प्रभाव खानापुरी भाषेवर होतो. केवळ खानापूरच नव्हे तर बेळगावातील लोक ही या बाजारात आपले बैल, बकरी घेऊन येतात किंवा विकत घेऊन जातात. या व्यवहारातूनही भाषेची देवाण-घेवाण होत असते.

सराफांचा ही व्यवसाय येथे पहावयास मिळतो. खानापूर हा 'तालुका' असल्याने सर्व गोष्टींनी तो समृद्ध आहे. खानापूर अंतर्गत येणाऱ्या गावातील लोक **खानापूर** तसेच **नंदगड**मधील सराफांची दुकाने गाठतात. क्वचित एखादा बेळगावला जातो. सोनार व्यवहार करताना प्रमाणभाषेचा वापर करतो. तर गावातून येणारे गिऱ्हाइक हे खानापुरी व प्रमाणभाषा अशा मिश्र भाषेत बोलतात. तसेच जातीनुरूप येथे व्यवसाय पहावयास मिळतात. कुंभार, चांबार (चांभार), म्हाला (न्हावी), गोर्लाकी, जांगळी (गुराखी) ,काचेच्या बांगड्या भरणारा '**बरगाळ**' (कासार) असे विविध व्यवहार खानापूर तालुक्यात होतात. जातीनुसारही बोलीत शब्दांची भर पडत जाते. प्रत्येक व्यवसायात लागणाऱ्या वस्तूंना वेगवेगळी नावे ही त्या व्यवसायातील माणसेच देतात. कुंभारकाम करणाऱ्या माणसांकडून पेटने, गाडगं, मटकी, नितळी, शेतकऱ्यांकडून कुदळ, हेंडोरं, कुरी, जॉत, कचकी (नडणी), भांगलणे, व्हइन, रूळ, नांगर, कोडती, गॉक्का, पेसाटी, हुट/ कोळपा, इळा (विळा), सुतारांकडून करगस, गवंडीकाम करणाऱ्यांकडून थापी, वळंबा, टिपनी, पट्टी, गिलावा, सेंट्रिंग, पानीपट्टी, आदी शब्द खानापुरी बोलीमध्ये आलेले आहेत. प्रमाणभाषेत काहींना नावही नसेल किंवा हेच वरील शब्द वापरतात.

२.२.३ सण-वार, व्रतवैकल्य

या प्रस्तुत ठिकाणी खानापूर तालुक्यातील सणवार व व्रतवैकल्याची नोंद करण्यात येणार आहे. प्रत्येक गावात थोड्याफार प्रमाणात सणातील विधी बदलतात. सर्वेक्षणाच्या दरम्यान भेट दिलेल्या गावातील लोकांनी सांगितल्याप्रमाणे खालील सणवार व व्रतवैकल्याची माहिती देण्यात आलेली आहे.

मागे सांगितल्याप्रमाणे खानापूरात मराठी सोबत कन्नड भाषिक लोकही राहतात. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीप्रमाणे ते 'कर्नाटकी बेंदूर' हा सण साजरा करतात तेच मराठा लोक वटपौर्णिमा साजरी करतात. याच पौर्णिमेला खानापुरी बोलीमध्ये **'वडाची पुनाव'** असे म्हटले जाते. या सर्व संस्कृती संक्रमणामुळे भाषेमध्ये बदल झालेला दिसून येतो. कानडी हेल काढून खानापुरी बोली बोलली जाते.

खानापूरात काही सणवार हे पौर्णिमा अमावस्या यानुसार साजरे केले जातात. याचा उल्लेख मागे केलेला आहे.

गुरुपौर्णिमा हा दिवस खानापूरात '**उंड्याची पुनाव**' या नावाने साजरी केली जाते. या दिवशी 'उंडे' केले जातात. उंडे हे तांदळाच्या आरगाड्या (जाडसर) पिठाचे केले जातात. या उंड्यांचा नैवेद्य घरच्या देवाला तसेच मंदिरात दाखविला जातो. या दिवशी घरातील सर्व गोरांची पूजा केली जाते व बैलांच्या शिंगांना रंगवून घोंडे बांधले जातात. तडस (मोठे दाभण) इंगाळांवर ठेऊन बैलांच्या शिंगना भोक पाडतात. अनसाचे किंवा कुंबियाचे बट शिंगांमध्ये घालतात व त्या बटांना घोंडे बांधतात. तसेच दुसऱ्या दिवशी सर्व गुरांच्या गळयात उंडे बांधले जातात. जांगळी (गुरे राखणार) जेव्हा गुरे राखायला जातो तेव्हा लहान मुले त्या गोऱ्यांच्या गळयातील उंडे तोडून खातात. अशाप्रकारे उंडे खाणे ही एक प्रथा आहे.

त्यानंतर येणारी '**नागाची आमोश्या**' या दिवशी खानापूरच्या सर्व मंदिरात पूजा केली जाते. ही अमावस्या नागपंचमीच्या अगोदर येते म्हणून तिला 'नागाची आमोश्या' असे म्हणतात. नागपंचमी दिवशी काही घरांमध्ये दोन नाग पूजवले जातात. एका नागाची पूजा देवाऱ्यात केली जाते. तर दुसऱ्या नागाची पूजा **भरमा** नावाच्या दैवताकडे केली जाते. 'भरम' हा खानापूरातील फार कमी लोकांच्या घरी असतो. भरम हा गुरांचा राखणदार असतो. म्हणून घरातील गोठ्यात एका **देवळीत** (भिंतीत असलेली छोटीशी खाच) त्याची स्थापना केली जाते. या दिवशी पोहे, रव्याचे लाडू, लाहया, काळ्या वाटाण्याच्या उसळीची

मेजवानी असते. या सणाला **तंबीट** (गोड पदार्थांची भेट) दिले जाते. तसेच या दिवशी प्रत्येक घरात पाळणा बांधला जातो व नागपंचमीचे गीत गायले जाते.

गणेश चतुर्थीला आकाराने लहान असणाऱ्या गणपतीची स्थापना केली जाते. हा गणपती जरी छोटा असला तरी त्याचा मान मोठा असतो. त्यामुळे त्याला **थोरला गणपती** असे म्हणतात. त्यानंतर मुख्य गणपतीची स्थापना केली जाते. त्यादिवशी पूरणपोळीचा नैवेद्य केला जातो. तर चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी **'हुंदरी'** केली जाते. परंतु आता काही ठिकाणी लोक ही प्रथा पाळत नाहीत. या दिवशी मांसाहार बनवला जातो. गणपतीचे वाहन उंदीर याला नैवेद्य म्हणून मांसाहार बनविला जातो. तसेच शेतामध्ये शिंपडून तेथील कीटकांना तृप्त केले जाते. उंदीर या शब्दावरून हुंदरी हा शब्द आल्याचे दिसून येते. तर चतुर्थीच्या पाचव्या दिवशी गौरी पूजन केले जाते. त्याचसोबत **'ओवसा'** हा विधी केला जातो. हा विधी घरातील विवाहित स्त्रियांसाठी महत्त्वाचा असतो. यादिवशी पूर्ण दिवस उपवास करून गौरीची स्थापना केली जाते. काही गावांमध्ये **'पाताळे'** (पातोळे) तर काही गावांमध्ये उकडलेल्या **'न्हवऱ्या'** (करंज्या) करतात. पाच भाज्यांची मिळून एक भाजी केली जाते. हळदीच्या पानावर खोबऱ्याचा तुकडा, वाळकू (काकडी), चिरमुरे हे सर्व साहित्य ठेवले जाते. घरातील प्रत्येक सुहासिनीच्या नावे पंचवीस पाने ठेवली जातात. यालाच खानापुरी बोलीत **ओवसा** असे म्हटले जाते. हा ओवसा घरातील प्रत्येक व्यक्तीला देऊन आशीर्वाद घेतला जातो. तसेच गल्लीत व मंदिरात हा ओवसा ठेवला जातो. नवदांपत्य जोडीने हा ओवसा व नारळ ठेवतात. त्यानंतर रात्री हा उपवास सोडला जातो.

याच कालावधीत अनंत चतुर्दशीला **'जोकमाराचे'** राज्य संपून **'कामाना'** राजाचे राज्य सुरू होते असे येथील लोक म्हणतात. जोकमार (चुनगार पुजारी) व कामाना हे राजाचे पुत्र होते. दोघांचे सहा-सहा महीने राज्य या प्रदेशावर असते. असे येथील लोकांची भावना आहे. 'जोकमार' या नावाबद्धल सांगायचे झाल्यास 'जोकमार' हा जरी राजा असला तरी खानापुरी बोलीत याचा उल्लेख शिवी करीता केला जातो. **'यला बग जोकमार गाव हिंडोन'** अशा प्रकारे त्याचा उल्लेख केला जातो. अनंत चतुर्दशी ते होळी पौर्णिमेपर्यंत कामानाचे राज्य असते.

अनंत चतुर्दशी नंतर पितृपक्षाला आरंभ होतो. याच कालावधीत 'म्हाळ' केला जातो. या दिवशी घरातील पितृत्म्यांच्या शांतीसाठी पूजन आणि परिवारीक भोजनाचा कार्यक्रम होतो. यामध्ये 'झील-चेडू'

(कुमार-कुमारिका) असतात. तसेच नवरा-बायकोची जोडी असते. या जोडीला '**नावकारी**' असे म्हणतात. सकाळी पुरुषांनी केलेला दहीभाताचा नैवेद्य कावळयांना दिला जातो. त्याला '**काकावळ**' असे म्हणतात. त्यानंतर दुपारी घरातील सर्व स्त्रिया मिळून जेवण बनवतात व जोडप्यांना वाढतात व त्यांची ओटी भरतात.

नवरात्रीला '**नवपूजा**' असे म्हणतात. घटस्थापने दिवशी मंदिरात घट बसवून नऊ दिवस त्यांची पूजा केली जाते. तर दसऱ्या दिवशी घटातून आलेले कोंब स्त्रियांना केसात माळायला देतात. घटातील कोंबांना **'रव'** असे म्हणतात. दसरा हा सण इतर सणांपेक्षा मोठा मनाला जातो. नऊ ही दिवस खानापूरातील लोक गावातील देवांना 'तेल वाढतात'. म्हणजेच गावातील प्रत्येक मंदिरात जाऊन समईत तेल घालतात. तसेच **(खंडी पूजन)** खंडे नवमीला अवजारांची पूजा करून दसऱ्याच्या दिवशी 'यल्लम्मा देवी'च्या परड्या भरल्या जातात. याच दिवशी गुंजी या गावात माऊलीची जत्रा भरते. बहुतांशी गावांमध्ये **माऊलीचे** देवस्थान आहे. मोजक्याच गावांमध्ये तिची जत्रा केली जाते.

यानंतर येणारी '**पंडवाची पुनाव**' म्हणजेच कोजागरी पौर्णिमेला शेतात असलेल्या पाच दगडांना पांडव समजून त्यांची पूजा केली जाते. तसेच घरच्या देवाला नैवेद्य दाखवतात. या नैवेद्यात '**तेलचीया**' (गोड पुरी) केल्या जातात. शेतातून घरी येताना शेतातील पिकलेली भाताची '**लोंबं**' घेऊन येतात व घरच्या चौकाटीला लावतात.

दिवाळी दिवशी घरच्या अंगणात व उंबरठ्यावर '**बेनके**' (शेणाचे गोळे) ठेवले जातात व घरच्या पुरुषांना ओवाळले जाते. या दिवशी घरात 'सान्न व बांगड्या'चे जेवण बनवले जाते. दिवाळी पाडव्या दिवशी घरात तसेच गोठ्यात शेणाचा पाडवा घातला जातो. घरात घातलेल्या पाडव्याजवळ 'दळूजातं', 'मौळाची सळाती', 'बैलांच्या गळयातील घुंगरू', 'लवगीया' ठेवल्या जातात. तसेच पाडव्याला घोंड्याची फुले, कुर्डू, कारीट लावले जाते. त्यानंतर या पाडव्याची पूजा केली जाते व रात्री याच पाडव्याजवळ बायको आपल्या नवऱ्याला ओवाळते. पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी '**मोरपाडवा**' केला जातो. या दिवशी तांदूळ आणि गव्हाच्या पिठाचे मिळून वड्डे (वडे) केले जातात. त्यादिवशी सर्व गोऱ्यांच्या गळयात **'वड्डे'** (वडे) बांधले जातात. तसेच दिवाळीच्या नंतर येणाऱ्या अमावास्येला प्रत्येक मंदिरात कार्तिक लावतात. म्हणजेच पणत्या पेटवून दिवाळीची समाप्ती करतात.

खानापूरातील काही लोक रान पुनवेला (रांड पौर्णिमेला) यल्लम्माला जाऊन येतात तर काही चुडी पुनवेला (चुडी पौर्णिमेला) सौंदत्ती यल्लम्माला जातात. यल्लम्माला जाणे हा एक सोहळाच असतो. यल्लम्मालाहून आल्यावर थेट घरी न जाता गावाबाहेर एका मळ्यात राहतात. त्याला 'बागेत' असे म्हटले जाते. तिथे एक रात्र राहून दुसरे दिवशी सर्व गावातील लोक मिळून देवीचा **'मारग मळतात'**. ही एक प्रकारची छोट्या स्वरूपातील जत्रा असते. मारग मळताना देखील जातीनुसार विभागणी केली जाते. त्या दिवशी 'मांडांत' परड्या भरल्या जातात. या दिवशी कडबो (पूरण घालून केलेली करंजी), वांगे-बटाट्याची भाजी, खीर, भात, आमटी केली जाते. हा सर्व पदार्थ नैवेद्याला ठेवतात. पूजेच्या दरम्यान ज्यांच्या गळयात देवक बांधलेले आहे त्यांच्या अंगात देवी येते. त्याला **'वारं'** असे म्हणतात. तसेच घरी आल्यावरही प्रत्येकाच्या घरी पुन्हा एकदा परड्या भरल्या जातात. परड्या भरल्यावर परशुराम पोहोचविण्याचा विधी केला जातो. या विधीमागे रेणुका देवी (यललम्मा) आपल्या पुत्राला परशुरामाला लोकांना सुखरूप घरी पोहोचवून येण्यास सांगते. लोकांची अशी भावना आहे की सौंदत्तीहून निघताना यल्लम्मा आपल्या मुलाला लोकांसोबत पाठविते. 'परड्या' या शब्दाला खानापुरी बोलीत **'पडल्या'** असे संबोधले जाते. तसेच दसरा, लग्नकार्याला सुरुवात करताना परड्या भरल्या जातात. तद्वत काही गावात गृहप्रवेश करतानाही परड्या भरतात. यल्लम्मा देवीला चुडा भरून तिला सजविले जाते म्हणून तिला **'चुडी पुनाव'** असे म्हटले जाते. या दोन्ही पौर्णिमांना जर एखाद्या लहान मुलाला किंवा मुलीला जट आली तर ती जट यल्लम्माच्या डोंगरावर सोडतात. तसेच त्या मुलाचे/मुलीचे नाव यल्लम्मा देवीच्या नावावरून ठेवतात. जसे मुलीचे नाव रेणुका, यल्लू व मुलाचे नाव परशुराम, मोनेश्री, यल्लप्पा अशी नावे ठेवली जातात.

होळी पौर्णिमेनंतर खानापूरात **'चव्हाट्याची जत्रा'** केली जाते. होळी पौर्णिमेला गावात होळी पेटवली जाते. काही गावांमध्ये पुरुष गावच्या सीमेबाहेर जाऊन आग पेटवतात व त्या आगितून 'हैरा सैरा' असे म्हणत उड्या मारतात व येशीत (वेशीवर) येऊन थांबले की गावातील मुली त्यांना ओवाळतात. त्या वर्षीचा असलेला मानकरी माणसांना **'व्हळं'** (खोबऱ्याची वाटी) देतो व काही दक्षिणा देतो. त्यानंतर होळीच्या पाचव्या दिवशी **'शिपनी'** साजरी केले जाते. त्यावेळी गावातील मानकरी 'शिपने घेवा' असे म्हणत प्रत्येकांच्या घरी जातो. संध्याकाळी हाच मानकरी तळयाकडे जाऊन तिथे नारळ फोडतो व गावातल्या प्रत्येकाच्या घरच्या तुळशीकडे पाणी न्हातात (पाणी अंगावर घेतात). यालाच 'शिपणे नहाणे' असे म्हणतात. नंतर गावाच्या बाहेर जाऊन पुन्हा एकदा आंघोळ करून तेथून तांब्यातून पाणी घेऊन येतात.

येताना पुन्हा एकदा आगितून लोक उड्या मारतात व पुन्हा त्यांना ओवाळले जाते. आरतीत नारळ ठेवला जातो. या नंतर गावातील पुरुष गावच्या व्हळेकडे (तळीकडे) जातात. त्यातील एकटा वर चढून खोबऱ्याचे चार तुकडे 'कोळं घेवा' म्हणत उंच फेकतो. तर पाचव्या वेळेला 'पाऊस' म्हणत तांब्यातील पाणी उंच उडवतो. यानंतर पाऊसाची सुरुवात होते असे मानले जाते.

खानापूरात १२ वर्षाने भरणारी लक्ष्मी देवीची जत्रा ही खास वैशिष्ट्यपूर्ण आहे. नऊ दिवस ही जत्रा सुरू असते. देवी लक्ष्मी जेव्हा सिंहासनावर विराजमान होते त्याला **'गदगेवर बसली'** असे म्हटले जाते. पूर्ण नऊ दिवस खानपूरच्या प्रत्येकाच्या घरी मांसाहार असतो. तसेच देवीला राक्षसरूपाने बैलाचा बळी दिला जातो. पण नंतर सरकारने आक्षेप आणल्याने केवळ बैलाच्या कानाला घाव दिला जातो. हा बैल नंतर महार घेऊन जातो. देवीचा बैल घेऊन जाणे हा त्यांचा मान असतो. या नंतर प्रत्येकांच्या घरी बकरी, कोंबडीचे जेवण बनविण्यात येते.

तसेच काही कालावधीत लक्ष्मी देवीचे वार पाळले जातात. त्यादिवशी मात्र कुणाच्याच घरी भाकऱ्या केल्या जात नाहीत.

खानापूरातील 'मऱ्यामा देवीची' जत्रा दर वर्षी जून महिन्यात भरते. खानापूर तालुक्यातील ही एक महत्त्वाची जत्रा होय. या देवीची पूजा करण्याचा मान घाडी व गुरव यांना असतो. दरवर्षी पूजा करण्याचा मान एका घरातून दुसऱ्या घराला दिला जातो. दोन दिवस ही जत्रा भरते.

येथील बहुतांशी सणांमध्ये मांसाहार बनविला जातो. तसेच देवाच्या किंवा देवीच्या नावाने बकरी, कोंबड्यांचा बळी दिला जातो. येथील लोकांचा असा समज आहे की देवीला बकरी किंवा कोंबड्यांचा बळी दिला की त्यांची इच्छा पूर्ण होते. तसेच एखादा नवस करताना देखील 'देवीला बकरी मारतो' असे म्हणत नवस केला जातो. इतकेच नव्हे तर मंदीराच्या शेजारी खाटीकाचे दुकान पहावयास मिळते.

२.२.३.१ चाली-रिती

मुलीला पहिली मासिक पाळी आल्यावर संपूर्ण पाच दिवस 'पाच सन' (पदार्थ) केले जातात. दिवशी, घवनं, शिरा, दोशे व उंडे असे पदार्थ केले जातात. पाचव्या दिवशी मोठा कार्यक्रम केला जातो. मुलीला मामाने दिलेली साडी नेसवून तिला हळदी कुंकू वाहून पाच पेरूनी तिची ओटी भरली जाते. तसेच

काही गावांमध्ये गोड गाव जेवणही घातले जाते. ‘भाहेरची झाली’, ‘कावळा बोचला’, ‘दुकान घाटलीन’, ‘गदगेस बसली’ अशी नावे मासिक पाळीच्या संदर्भात वापरली जातात.

लग्न समारंभात गावातील पाच स्त्रिया नेमल्या जातात. त्यांना **होवळिया** असे म्हटले जाते. या होवळिया मुलगा किंवा मुलीच्या लग्नातील सर्व विधी करतात. हळदी ते पाचपरतनपर्यंत केला जाणार सर्व विधी याच स्त्रिया करतात. हळदी दिवशी सकाळी ‘घना’ घातला जातो. घना घालताना विशिष्ट गीत गायले जाते. या भागात हळदीचा कार्यक्रम रात्री केला जातो. रात्री गावातील पंच येऊन मुलगा किंवा मुलीला समोर बसवून घट बसवितात. त्यानंतर ते पंच अगोदर मुलाला हळद लाऊन त्याची उष्टी हळद सुख्या खोबऱ्याच्या वाटीत / ‘**बेल्यात**’ घालून स्त्रियांसोबत नवरी मुलीच्या घरी वाजंत्रीसहित पाठवून देतात. मुलीच्या घरीसुद्धा घट बसून मुलाची उष्टी हळद लावली जाते. हळदीच्या कार्यक्रमानंतर सर्व होवळिया मिळून मुलगा/ मुलीचे ‘नीम’ काढतात. नीम काढताना भाताने मुलगा/ मुलीची ‘श्यास’ भरतात. म्हणजेच घरातील प्रत्येक व्यक्ती भात घेऊन मुलगा/मुलीच्या डोक्यापासून पायापर्यंत व नंतर पायापासून डोक्यापर्यंत भात वाहिला जातो. त्याला नीम चढविणे व नीम उतरविणे असे म्हणतात. या विधीनंतर कोणीही मुलगा किंवा मुलीजवळ जात नाही. त्या दिवशी मुलगा किंवा मुलीला अंघोळ घालायचा मान त्यांच्या बहिणीला असतो. सुरुवातीचे पाण्याचे पाच तांबे बहिणीला त्यांच्या डोक्यावरून ओतावे लागते. या प्रत्येक विधील गीत गायले जाते.

लग्ना दिवशी नवऱ्या मुलाला मांडवात सजविले जाते. नवरा जेव्हा मांडवाजवळ येतो तेव्हा मुलीचे आई-बाबा नवऱ्याला ओवाळतात. तसेच मुलीच्या दोन बहिणी डोक्यावर ‘घागर’ व ‘डेरा’ घेऊन येतात. या वस्तु घेण्याचा मान नवऱ्याच्या बहीणींचा असतो. या दोन्ही वस्तूंची देवाण घेवाण नवऱ्याला ओवळतानाच होते. तसेच मांडावात एका बाजूला रुखवत ठेवला जातो. लग्नाच्या सर्व विधीनंतर नवरा-नवरीच्या जेवणाच्या वेळी ‘**बडान**’ भरले जाते. बडान म्हणजे एका सुपात नवऱ्या, लाडू, केळी अशा प्रकारचे जिन्नस असतात. बडान भरताना त्यावर सूप झाकले जाते व त्यावर खोबऱ्याची वाटी, दाभण ठेऊन हे बडान भरले जाते. यावेळी देखील गीत गायले जाते. त्यानंतर त्या बडानातील जिन्नस नवरा व नवरीने खायचे असते.

तसेच लग्नानंतर पाचपरतनच्या दिवशी '**घनाच्या भाकाऱ्या'** केल्या जातात. पाचपरतन याला खानापुरी बोलीत 'परतवान' असे म्हटले जाते. या घनाच्या भाकऱ्या होवळिया करतात व पहिल्या पाच नवीन नवरी करते. या भाकऱ्या तसेच सांडग्यांची भाजी करून पाच कऱ्यांवर ठेवली जाते. त्यानंतर नवीन नवरी पूजेला लावलेला प्रत्येक 'करा' उचलून एक एक होवळीला देते. या कार्यक्रमानंतर होवळियांचा कार्यभाग संपतो. असे अनेक विधी लग्नसमारंभात केले जातात. तसेच गावानुसार या विधीमध्ये काही भर घातला जातो.

खानापूर तालुक्यामध्ये लग्न समारंभानंतर येणारा प्रत्येक नवीन सण हा मुलीच्या घरी साजरा केला जातो. संपूर्ण एक वर्ष नव वराने आपल्या सासरी सण साजरे करायचे असतात. तसेच दर वेळी सासरी व माहेरी जाताना गोड खाद्यपदार्थांची 'भ्याट' नेली जाते. या एका वर्षात कोणताही तिखट पदार्थाची देवाण घेवाण केली जात नाही. जाताना नववराच्या हाती कट्यार व नववधू जवळ ओटी असते. प्रत्येक नवीन सणाला या वस्तु वधू - वराने आपल्या जवळ ठेवायच्या असतात. त्या वर्षभरात नववधू व नववराची आई एकमेकांच्या घरी जात नाही. दिवाळीच्या सणापासून त्यांचे येणे - जाणे सुरू होते. येथील लोकांची अशी भावना आहे की दिवाळीपर्यंतच लग्न झालेल्या जोडप्यांसाठीचा नवेपणा असतो. आषाढी एकादशीला नवीन जावयाचा मान असतो. मुलगी आपल्या नवऱ्यासोबत आषाढी एकादशीला माहेरी येते व गुरुपौर्णिमेला परत सासरी जाते. जाताना जावयाला 'बटन छत्री' किंवा 'रेनकोट' दिला जातो.

गरोदर असलेल्या स्त्रीची पाचव्या महिन्यात मुलीच्या मावशीकडून '**चोर ओटी'** भरली जाते. त्यात हिरवी काकणे, नारळ व साडीने ओटी भरली जाते. सातव्या महिन्यात '**चोळी'** (फुले माळणे) केली जाते. गळयात '**पोवतं'** (जानवं) घालतात तसेच नारळाला देखील पोवतं बांधतात. त्यानंतर प्रत्येक स्त्रिया येऊन तिला हळदीकुंकू लावतात. तसेच मूल जन्माला आल्यावर पाचही दिवस देवविधी केला जातो.

मूल जन्माला आल्यावर बाळंतीण आपल्या बाळासह माहेरी जाते. काही गावांमध्ये **महिना दिस उना** (महिना पूर्ण व्हायला एक दिवस कमी) किंवा ३ महिन्याने, ५ महिन्याने पाळणा (बारसा) केला जातो. हा पाळणा नवऱ्याच्या घरी केला जातो. पाळणा हा मुलीचे मामा किंवा आई - बाबा देतात. मात्र सासरी जाताना बाळाच्या मामाने डोक्यावर पाळणा घेऊन जायचे असते. त्या अगोदर त्या पाळण्याला सजवून पाच मंदिरात नेऊन नंतर मुलीच्या सासरी घेऊन जातात. आई, मूल व पाळण्यासहित बाळाचे मामा

अंगणात येऊन थांबतात. मामा व पाळण्याला ओवाळून बाळाच्या मामाला 'आयार' (अहेर) केला जातो. तसेच बाळाचे नाव ठेवण्याचा मान आत्याला असतो. आत्यानेच पाळण्यात बाळाला ठेवून नाव ठेवले जाते. नाव ठेवताना बाजूला जमलेल्या स्त्रिया तिच्या पाठीवर जोरात धपाटे घालतात.

प्रत्येक गावानुसार अत्यंसंस्कारचा विधी थोड्याफार फरकाने वेगळा असतो. काही ठिकाणी अग्नि दिला जातो तर काही ठिकाणी 'मुजुन्याची' (पुरण्याची) प्रथा आहे. अत्यंसंस्कारच्या वेळी मृत देह मांडी घालून बसवला जातो. त्यानंतर अंगणात त्याला स्नान घालून नवीन कपडे त्याला घातले जातात. स्त्री असेल तर तिची ओटी भरली जाते. पुरुषाला फेटा बांधला जातो. त्या नंतर त्या मृत देहासाठी बांबुचा रथ बनविला जातो. त्या रथात त्याला बसविले जाते. या दिवशी महार त्या घरच्या बाहेर थांबून हलगी वाजवितो. या हलगीच्या आवाजाने कोणी तरी वारले आहे हे लोकांना समजते. स्मशान भूमीकडे पोहोचेपर्यंत ही 'हलगी' पूर्ण प्रवासात वाजविली जाते. काही गावांमध्ये फार वृद्ध व्यक्ती वारला असेल तर अशाच प्रकारे मृदंग वाजविला जातो. ज्यांच्यात पुरण्याची प्रथा आहे ते शेवटी मृत देहाला विवस्त्र करून बसलेल्याच अवस्थेत पुरतात. इथे एक गोष्ट नमूद करणे गरजेची आहे ती म्हणजे अंत्यविधील पुरुषांसोबत स्त्रिया, मुली देखील जातात.

तिसऱ्या दिवशी पुन्हा त्या जागी जाऊन मृत पावलेल्या व्यक्तीला आवडणारे पदार्थ त्या जागेवर ठेवले जातात व कावळा शिवला की सर्वजण घरी येतात. बाराव्या दिवशी ब्राह्मणांना बोलावून शुद्धीकरण केले जाते. काही ठिकाणी या दिवशी गाव जेवण घातले जाते. अत्यंसंस्काराबाबत बोलणे देखील अपशकुन मानले जाते. बहुतांशी या बाबतीत बोलायला येथील लोक टाळतात.

२.३ लोकभाषा व त्यांचे वैशिष्ट्य

'महाराष्ट्रसारख्या प्रदीर्घ प्रदेशातील मराठी समाज जी भाषा बोलतो ती मराठी भाषा असे आपण म्हणतो. परंतु मराठी भाषा सर्वत्र सारखीच बोलली जात नाही. भौगोलिक परिस्थितीनुसार, प्रदेशानुसार ती बदलत जाते. संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील मराठी समाजाकडून मराठीच्या बोली बोलल्या जातात. या सर्व बोलींमध्ये एक प्रमाणबोली असते. ज्याप्रमाणे प्रमाणबोलीला महत्त्व असते तद्वत प्रत्येक समाजातील बोलीला महत्त्व असते. कारण बोली ह्या सामाजिक आणि संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या असतात. त्यामुळे भाषा, प्रदेश व संस्कृतीचा जवळचा संबंध असतो'[12].

लोकभाषा म्हणताना विशिष्ट प्रदेशातील लोकांच्या तोंडून येणारी भाषा, म्हणी, वाक्प्रचार, शिव्या आदींचा उल्लेख येतो. प्रत्येक प्रदेशातील भाषेमध्ये अशी अनेक वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

२.३.१ कोंकणी बोली

कोंकणी सामान्यपणे 'दमणपासून रत्नागिरीपर्यंत उत्तर कोंकणी, तर राजापूर ते गोवा कारवारपर्यंत दक्षिण कोकणी'[13] अशी दोन स्वरूपे ठळकपणे अभ्यासकांनी मांडलेली आहेत. अशाच प्रकारचा विचार गोमंतकातील कोंकणीचा करताना असे निदर्शनास येते की दक्षिण व उत्तर गोव्याकडील कोंकणी भाषा ही थोड्याफार प्रमाणात वेगळी आहे. सदर बोलीच्या सर्वेक्षणादरम्यात असे आढळून आले की उत्तर गोव्यातील कोंकणी भाषेमध्ये मराठीचे शब्द अधिक दिसून येतात. तर दक्षिण गोव्यातील कोंकणीमध्ये कानडी भाषेतील शब्द व काही प्रमाणात कानडी हेल जाणवतो. कोंकणी, मराठी सोबतच पोर्तुगीज भाषेचाही वापर होतो. तसेच प्रत्येक गावानुसार व जातीनुसार भाषेत, शब्दात बदल झालेला आढळून येतो.

उदाहरणार्थ – *आसाळी- चिवरा, चुडीत- चुट्ट, उदक, उदीक - उदं आदी.*

कानडी शब्द - *मडवळ, केळवण, घल्ल्यांन आदी.*

पोर्तुगीज शब्द- *कदेल, जनेल, बटाट आदी.*

"कोणाकsss?" अशाप्रकारे हेल काढून दक्षिण गोव्यात बोलले जाते, तर उत्तर गोव्यात अगदी सुटसुटीत शब्दांचा उच्चार केला जातो. दोन्ही भाषेचे निरीक्षण केल्यावर असे निदर्शनास येते की दक्षिण गोव्यातील माणसे ही घाई गडबडीने बोलतात. तर उत्तर गोव्यातील माणसे ही सावकाश व प्रत्येक शब्दाचा स्पष्ट उच्चार करत बोलतात.

उदाहरणार्थ-
१. हांगा किदें करता?(दक्षिण गोवा)
२. हयसर किते/ कियें करता? (उत्तर गोवा)
३. फालच्यान चालू करत्लो. (दक्षिण गोवा)
४. फाल्याच्यान चालू करतलों. (उत्तर गोवा)

दैनंदिन व्यवहारात सहजपणे तोंडून म्हणी, वाक्प्रचारांचा वापर होतो. तर तरणाट्यांकडून (तरुण) घनचेकटर, उज्जो हे शब्द वारंवार ऐकू येतात. 'घनचेकटर' हा शब्द बावळट, वेडा, विचित्र या अर्थाने येतो. यासोबतच *'शीत फुडे मीट खाता', 'देव पावता पूण दॅवचार नाट्टा', 'कितलेय केल्या ओमत्या*

कळशा(र) उदक' अशा प्रकारच्या म्हणी ऐकायला मिळतात. ख्रिस्ती गावडा समाजाची व हिंदू समाजाची कोंकणी भाषा ही वेगळी आहे. तसेच या दोन्ही समाजाची भाषा प्रमाण भाषेपेक्षा वेगळी ठरते. उदाहरणार्थ- *मुगे/ मुगेलो, भाडकान, किते कॉत्ता गे?, रोप (कपडे)* अशा प्रकारचे शब्द ख्रिस्ती गावडा समाजाच्या बोलीतून येतात तर हिंदू समाजाची *"माग्ये वयी दी", 'भाडकार'* तर प्रमाण कोंकणीत *भौमानिस्त, येवकार आदी.*

२.३.२ उमरगा तालुक्यातील बोली

उमरगा तालुक्यातील बोलीवर महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्याचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे या प्रदेशात मराठी आणि कन्नड भाषा बोलतात. या बोलीत मुक्त वाक्यरचना आढळते. *उदाहरणार्थ- व्हयकी, का करावं बगा, न्हाई उटलनी अजून इ.* तसेच काही वेळेला 'का न्हाई बगा' या शब्दांपासून वाक्याची सुरुवात होते.[14] उमरगा तालुका हा कृषिप्रधान असल्याने शेतीविषयक अवजारांची, बी- बियाणे शब्द व शब्दप्रयोग आढळतात. जसे *कुळव नांगर नांगरणी करणे- जसे पेरले तसे उगवेल, सुगी, दिवाळी होणे, चाबूक, कासरा इ.*[15] भौगोलिक पर्यावरणामुळे 'कोणच्या' ऐवजी 'कोन', 'नाही' च्या ऐवजी 'न्हाई', 'घे' च्या ऐवजी 'घी', 'तेव्हा'च्या ऐवजी 'तवा' अशा प्रकारचे उच्चारण उमरगा बोलीत आढळते. तसेच ही बोली प्रमाणमराठीपेक्षा वेगळी आहे.

उदाहरणार्थ – "कुटं ऱ्हातेत आता? पुन्याला ऱ्हातेत... बिन शिकल्याले पोरं. उगं कायतर करीत हिंडायचं."[16]

उमरगा तालुक्यात अनेक जाती धर्माचे लोक राहतात. त्यामुळे विविध संस्कृतीच्या प्रभावाने कन्नड सोबत इंग्रजी, फार्सी, हिंदी, उर्दू, अरबी, पोर्तुगीज भाषेतील शब्द या बोलीत आलेले आढळतात.

इंग्रजी शब्द- कलर, डबल, नंबर, आडर (ऑर्डर), कोरटं (कोर्ट), कलास (क्लास) आदी. इंग्रजी भाषेतील काही शब्द जसेच्या या बोलीत स्वीकारलेले आहेत, तर काही शब्द रूप बदलून आलेले आहेत.[17]

फार्सी अरबी शब्द- हद्द, मुलुख, बाजार, रिवाज आदी. [18]

उर्दू आणि हिंदी शब्द- जल्दी (लवकर), पूस (विचारणे), दोस्त (मित्र), जिनगानी (जीवन) आदी. [19]

२.३.३ चंदगडी बोली

चंदगड हा महाराष्ट्रातील तालुका आहे. चंदगडी बोली ही “चंदगड परिसरासह कर्नाटक-महाराष्ट्र सीमावर्ती प्रदेशातील अनेक गावांची ती बोलीभाषा आहे.”[20] चंदगडी बोलीवर कानडी भाषेचा तसेच कोंकण प्रदेशाचा प्रभाव आहे. त्यामुळे काही भागात बोलताना कानडी हेल तर काही भागात कोंकणी मिश्रित पोर्तुगीज शब्द येतात. चंदगडी बोलीच्या संदर्भात सांगायचे झाल्यास चंदगडी बोली ही विशिष्ट हेल काढून बोलली जाते. तसेच बोलीतील काही वैशिष्ट्यपूर्ण म्हणी ह्या दैनंदिन बोलण्यात वापरल्या जातात.

उदाहरणार्थ – *१. लाडकं लाडकं केलं आणि रेडकासंग गेलं.*
२. खिशात न्हाय आना, अन् सरपंच म्हणा.
३. मरतो रांडे, पाय काढ.

तसेच या बोलीत संयुक्त क्रियापदांचा वापर होताना दिसतो. संयुक्त क्रियापदे म्हणताना असे सांगता येते की प्रमाण मराठीमध्ये जेथे वाक्य पूर्ण करताना दोन क्रियापदांचा वापर होतो; तेथे चंदगडी बोलीत एकाच क्रियापदाचा वापर केला जातो. उदाहरणार्थ - *मीय्या जाऊलोय (मी जात आहे.), खट्टे गेल्लेस (कुठे गेला होतास)* अशा प्रकारची वाक्ये या बोलीत आढळतात. कानडी वळणाने देखील ही बोली बोलत असल्याने कानडी हेल काढून **कुठे** चा **खट्टे**, **कशाला** चे **कास**, **आलो** चे **आलोनी**, **गेलो** चे **गेल्लोनी** अशा शब्दांवर जोर देऊन बोलले जाते. सदर प्रदेशातील स्त्रिया बोलताना पुल्लिंगी क्रियापदे वापरतात. *उदाहरण- मिय्या येतो, मिय्या जातो.* तसेच काही कोंकणी मिश्रित वाक्येदेखील पहावयास मिळतात.[21]

उदाहरणार्थ- *१. झाडा हालतय हा.*
२. तो माका मारतला.

सौजन्य: मोरे, नंदकूमार. “चंदगडी बोली”, पगारे म. सु., पाटील आशुतोष. ‘बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा’, श्री रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, जळगाव, पृ. ६७.

चंदगडी बोलीचे ‘उच्चारण’ हे अजून एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. एक विशिष्ट हेल काढून ही बोली बोलली जाते. ‘जाऊलेसाय’ हा जरी एक शब्द वाटत असला तरी या बोलीमध्ये एका वाक्याचे काम करतो. जाऊलेसाय हा शब्द चंदगडी बोलीमध्ये ‘तू जात आहेस का?’ या अर्थाने वापरला जातो. वरील शब्द हा प्रश्नार्थक आहे. परंतु ही प्रश्नार्थकता या बोलीच्या बलाघात पद्धतीतून, सुरवटीतून, सुर ओढण्याच्या पद्धतीतून प्राप्त होते.[22]

२.३.४ खानापुरी बोली

बेळगाव जिल्ह्यात असलेला ‘खानापूर’ तालुक्याची भाषा ही देखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. अहिराणी, मालवणी, डांगी, चंदगडी, कोंकणी इ. अनेक बोलींपैकी खानापुरी बोली आहे. ही बोली खानापूर तालुक्यात सर्व ठिकाणी बोलली जाते. या तालुक्याअंतर्गत येणाऱ्या खेड्यांमध्येही कमी अधिक फरकाने ही बोली बोलली जाते. दर बारा कोसावर वाणी व पाणी बदलते त्याप्रमाणे इथेही काही अंशी बोलीभाषा बदलते. या तालुक्यात अनेक जाती-धर्मांचे लोक राहतात. खानापुरी बोलीवर कन्नड, हिंदी, उर्दू, पोर्तुगीज, कोंकणी या भाषेचा प्रभाव जाणवतो. तसेच ही बोली बेळगावी व चंदगडी बोलीच्या जवळ जाणारी आहे. खानापूर हा प्रदेश प्रदीर्घ असल्याने आजूबाजूच्या गावातील माणसे मोठ्या प्रमाणात व्यवहार, व्यापारासाठी येत असतात. त्यामुळे त्यांच्याही बोलीचा प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला आहे.

उदाहरणार्थ- खानापूरातील काही खेडवळ गावांमध्ये ‘चीबुड’ या फळाला ‘फुट्ट’ असे म्हणतात. त्यामुळे खानापुरी बोलीमध्ये चीबुड व ‘फुट्ट’ ही दोन्हीही नावे उच्चारली जातात.

खानापूरातील बरीच माणसे व्यवहार, व्यापारासाठी आजूबाजूच्या प्रदेशात जातात. तर इतर राज्य, प्रदेशातील माणसे व्यवहारासाठी खानापूरात येतात. इतकेच नव्हे तर ज्याप्रमाणे खानापूरातील मुली लग्न करून इतर राज्य, प्रदेशात जातात. तद्वत इतर राज्य, प्रदेशातील मुली खानापूरात येतात. त्यामुळे विविध संस्कृतीचा मिलाफ झालेला दिसून येतो. यातून भाषेची देवाण-घेवाणही होते. या सर्वांचा परिणाम खानापुरी बोलीवर झालेला दिसतो. मराठी सोबत कन्नड, कोंकणी भाषेतील शब्द खानापुरी बोलीत रुळलेले आहेत.

उदाहरणार्थ- *१. आज सकाळच्यान मॉड (दमट) हाय. (कन्नड शब्द ‘मॉड’)*
२. येदोळच्यान मिया बसलोय इत्ते तर कोनच यउनाय (‘येदोळच्यान’ कोंकणी शब्द)

वरील उदाहरणातून खानापुरी बोलीचे मिश्र भाषा स्वरूप दिसून येते.

येथील लोक ‘पाणी’ न म्हणता ‘पानी’ असा शब्द उच्चरतात. तसेच नारायन, आनी, म्हना अशा प्रकारे ‘ण’ हा शब्द ‘न’ ने उच्चारला जातो. परंतु तेच जर प्रमाणभाषेसंदर्भात विचार केल्यास असे आढळून आले आहे की येथील काही लोक प्रमाणभाषेतील मजकुराचे वाचन करताना प्रत्येक ठिकाणी ‘ण' या शब्दाचा वापर करतात. इथे कुठेच ते ‘न’ वापरताना आढळत नाही.

उदाहरणार्थ – *१. णमण करितो अणंता (नमन करितो अनंता)*

२. सूचणा (सूचना)

परंतु जरी प्रमाणभाषेतून बोलत असले तरी खानापुरी बोलीचा हेल त्यांच्या बोलण्यातून दिसून येतो.

या प्रदेशात एकत्र कुटुंब पद्धती दिसून येते. त्यामुळे मोठ्या भावाला 'वडलाप्पा', 'अण्णा' या नावाने संबोधले जाते. तर बहिणीला 'आक्का', 'ताई', असे म्हटले जाते. खानापूरच्या काही भागात बहिणीला 'आक्का' म्हणतात तर काही भागात आईला 'आक्का' या नावाने संबोधतात. त्यामुळे एकाच शब्दाने दोन नाते दर्शक अर्थांची मांडणी एकाच पद्धतीने किंवा ध्वनींनी होते. अण्णा, आक्का, वडलाप्पा हे शब्द कानडीच्या प्रभावाने आलेले आहेत. तसेच मुलींना प्रेमाने 'आऊ', 'बाळी' या नावाने तर मुलांना 'बाळ्या' या नावाने बोलवतात. घरातील सर्वात लहान मुलाला 'बारक्या' असे म्हटले जाते. तद्वत बोलण्यातून सहजपणे शिवी, म्हणींचा उल्लेख होताना दिसतो. तसेच मांसाहारला 'इसवान' असे म्हटले जाते.

येथे कधीच कुणाला नाश्ता केला का असे न विचारता 'भाकरी खाल्लीस?' असा प्रश्न विचारला जातो. तसेच बोलताना स्त्री-पुरुष यांच्यातील क्रियापदे ही सारखीच असतात. स्त्रिया बोलताना पुल्लिंगी क्रियापदाचा वापर करतात.

उदाहरणार्थ- *१. मिया यतो थांब.*
२. मिया खाल्लो नी.
३. मिया तिसऱ्या हानुस लावलो.

वरील उदाहरणामध्ये पुल्लिंगी क्रियापदे आलेली आहेत. अशाच प्रकारे स्त्रिया बोलतात. तसेच तिसऱ्या उदाहरणामध्ये कोंकण प्रदेशाचा प्रभाव भाषेतून जाणवतो.

२.४ खानापुरी बोली आणि संस्कृती सहसंबंध

बहुतांशी बोली ह्या लोकसंस्कृतीच्या निर्मिती असतात. बोलींच्या बाबतीत लिखित रूपापेक्षा मौखिक रुपालाच अधिक महत्त्व असते. विशिष्ट प्रदेशाने अनेक पिढ्यांपासून जपलेले भाषारूप म्हणजे बोली होय. त्या प्रदेशातील लोकसमूहाच्या सर्व ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक मूल्यव्यवहारांचे संक्रमण बोलीच्या माध्यमातून होत असते. अशा बोलींना स्वतःची बोली नसते. ती ज्या मुख्य प्रमाणभाषेच्या कक्षेत येते तीच लिपी बोलीच्या लेखनासाठी वापरली जाते. [23]

समोरच्याला काहीतरी सांगण्यातून भाषेची निर्मिती झालेली आहे. समाज व बोली यांचा अगदी जवळचा संबंध आहे. बोली ह्या समाज, प्रदेश, संस्कृती, वर्ग, जातीनुसार बदलत जातात. त्यामुळे एकच एक भाषा बोलणाऱ्या विस्तृत प्रदेशात स्थानभेदानुसार, संस्कृतीभेदानुसार, व्यवसायभेदानुसार, निरनिराळया बोली अस्तित्वात आहेत. तसेच प्रत्येक व्यक्तीनुसारही बोली बदलते.[24] संस्कृतीबद्धल सांगताना **टायलर** यांची व्याख्या महत्त्वाची वाटते. ते म्हणतात की, *"संस्कृती म्हणजे ज्ञान, कला, नीतिनियम, चालीरीती, श्रद्धा आणि मानवाने आत्मसात केलेल्या सवयी यांचा समुच्चय होय."*[25] या व्याख्येतून असे दिसून येते की माणसाच्या दैनंदिन जीवनातील सवयी म्हणजे संस्कृती होय. त्यामध्ये माणसाच्या श्रद्धा, चालीरीती, त्यांचे नीतिनियम या गोष्टी येतात.

बोलीचा दर्जा हा समाजाच्या सामाजिक दर्जावर अवलंबून असतो. बोली व समाज यामध्ये घनिष्ठ संबंध असतो. समाजानुसार बोलीत बदल होत जातात. त्यामुळे एकच भाषा बोलणाऱ्या व्यापक प्रदेशात भाषा व संस्कृती ह्या एकमेकांमध्ये गुंफालेल्या आहेत. भाषेतून संस्कृती व संस्कृतीतून भाषेचा विकास होत असतो. भाषा आणि मानवी जीवन हे एकमेकांपासून वेगळे नसते. त्यासाठी संस्कृती निर्मितीमागे भाषेचा म्हणजेच बोलीचा महत्त्वाचा वाटा असतो. मानवी जीवनात घडणारे बदल, आचार-विचार, रूढी, प्रथा, परंपरा, पाप-पुण्याच्या गोष्टी या सर्वांचे प्रतिबिंब बोलीतून उमटत असते. त्यामुळे बोली, समाज व संस्कृती यांचे अतूट नाते असते. भाषेतून विविध संस्कृतीची देवाण-घेवाण होत असते. तसेच केवळ एखाद्या बोलीतून एखादी व्यक्ती कोणत्या समाजातील आहे हे समजून येते. एखाद्या समाजातील चाली-रीती, आचार-विचार, संस्कारांना बांधून ठेवण्याचे काम संस्कृती करते. विविध समाजगटाच्या आदानप्रदानातून एखाद्या संस्कृतीचे संस्कार जन्माला येत असतात.[26]

खानापूर तालुक्यामध्ये अनेक जाती- धर्माचे लोक राहतात. या जाती धर्माप्रमाणे वेगळी संस्कृती देखील आहे. या सर्वांचा परिणाम खानापुरी बोलीवर झालेला दिसून येतो. तसेच रोटी-बेटीच्या व्यवहारातून भाषेची देवाण-घेवाण होत असते. जास्त प्रमाणात कन्नड व कोंकणी भाषेचा प्रभाव या बोलीवर झालेला दिसून येतो. त्यामुळे बोलीतून येणारे नीरपनस, सुंगटं, झिंगे, मडवळ, चिबुड, निसन आदी शब्द या दोन्ही भाषेच्या संस्कृतीच्या मिलाफातून आलेले आहेत. कानडी संस्कृतीमधील अनेक गोष्टी मराठी संस्कृतीने स्वीकारलेल्या आहेत. संस्कृतीची सरमिसळ झाल्यामुळे त्याचा परिणाम खानापुरी बोलीवर झालेला दिसून

येतो. 'आक्का', 'बाळया', 'कडबू', 'मंगं', 'उंडे', 'जांगळी' आदी कानडी शब्द खानापुरी बोलीत पूर्णपणे रुळून गेल्यामुळे ते खानापुरी बोलीमधलेच शब्द वाटतात. वडीलधाऱ्यांना 'अण्णा', 'वडलाप्पा', 'आप्पा', 'आक्का' या नावाने संबोधले जाते. तसेच पुरुषांना 'गा' व स्त्रियांना 'गे' ह्या शब्दांचा उपयोग आदर देण्यासाठी वापरला जातो. एखाद्या व्यक्तीच्या केवळ बोलीवरून विशिष्ट प्रदेशाची, समाजाची संस्कृती दिसून येते.

उदाहरणार्थ – *१. खई जाऊलीसाय गा ?*
२. व्हय गे आक्का! कन्न गे यलीस तिया?

तसेच लहान मुले **'बे'**च्या पाढ्यात बोलतात. *जसे -" काय बे काय करुलीसाय", "अबे हिकडी य".* आदी. मुलांच्या बोलण्यातून उर्दू भाषेचा प्रभाव दिसून येतो. त्यांच्या बोलण्यातून येणारा 'बे' हा शब्द उर्दू भाषेतील आहे. 'भुट्टीतला जोकमार' या मागासलेल्या जातीच्या सणातून 'जोकमार' हा शब्द खानापुरी बोलीत आलेला आहे. परंतु या बोलीत येताना हा शब्द शिवीच्या रूपाने येतो. काही जातीवाचक शब्द हे खानापुरीमध्ये शिवीच्या रूपाने वापरतात. *उदाहरणार्थ- मुसल्या, भंगी, डोंबारी, कुरबर आदी.* याचबरोबर प्रत्येक सणवारात गायली जाणारी गीते ही देखील येथील संस्कृतीशीच निगडीत आहेत.

उदाहरणार्थ - हळदी समारंभात गायले जाणारे गीत

आमुचा नवरा गिंडीन पानी न्हाई
सरवंग लोटू जाई केकदबनी
केकदबनीचे बन देतील झुलाडू
त्याचेर बसून किरा मोर पानी पीती लू
माळातल्या माळसनी
गंगेचं जळपानी
पानी तापू भेनी नवऱ्याच्या

या गीतातून आलेला 'गिंडीन' हा शब्द कानडी आहे. गिंडीन म्हणजे तेलाची गिंडी होय. वरील गीतातून हळदी समारंभातील एक विधी या गीतातून सांगितलेला आहे. नवरा किंवा नवरीला अंघोळ घालताना हे गीत म्हटले जाते. या गीतातून पर्यावरण, कृषीजीवला महत्त्व दिले आहे. तसेच नवरा किंवा नवरीच्या बहिणीला गंगाजल (पाणी) चुलीवर तापवायला सांगितले जाते. त्याचबरोबर बहिणीला नवरा किंवा नवरीला अंघोळ घालण्याचा मान असतो. खानापुरी बोलीमध्ये कानडी संस्कृतीचा जास्त प्रभाव

दिसून येतो. यल्लम्मा देवीची आराधना करणे, सणाला केले जाणारे कडबू, तेलची, सणामध्ये म्हटली जाणारी काही कन्नड गीते यातून कानडी संस्कृती दिसून येते.

खानापूर तसेच अनेक गावांमध्ये 'डुक्कर' हा शब्द उच्चारला जात नाही. जर कोणी हा शब्द उच्चारला तर लगेच त्याला 'उरूस' असे म्हणण्यास सांगतात. कारण डुक्कर म्हणणे हे 'खोडपानी' (अपशकुन) समजले जाते. तसेच काही गावांमध्ये असे अपशकुनी शब्द उच्चारल्यास 'मोकली' असे म्हटले जाते. 'मोकली' किंवा 'उरूस' असे म्हटल्याने तो अपशकुन टळतो अशी येथील लोकांची समजूत आहे. याचप्रमाणे कोणा व्यक्तीची, देवाची शपथ घेतल्यास त्याचे 'बालंट' लागू नये यासाठी देखील 'मोकली' असे म्हणण्यात येते.

खानापूरातील समाज व्यवस्था ही पुरुषप्रधान संस्कृतीवर चालणारी आहे. 'बाईच्या जातीला ते कशाला' या नावावरून तिचा व्यक्तिमत्व विकास खुंटीत केला जातो. 'आई-बाबाच्या नावासाठी पोरीस मरोचं लागताय' असे म्हणत एक मुलगी आपल्या सासरी आपल्या माहेरचा मान राखण्यासाठी झुरत असते. घरातील कोणतीही व्यक्ती बाहेर गेल्यावर लगेच अंघोळ करण्यास मनाई करतात. हे देखील अशुभ असे मानले जाते.

लग्नसामारंभात मुलीच्या किंवा मुलाच्या मामाच्या घरच्यांना विशेष मान दिला जातो. त्यांच्यासाठी 'आजियाळ' (आजीचा अहेर), 'मावळयार' (मामाचा अहेर) या नावाने अहेर दिला जातो.

गोवा हा शेजार प्रदेश असल्याने खानापुरी बोलीत काही कोंकणी शब्द रूढ झालेले आहेत. जसे- येदोलच्यान, निसर, म्हाला, तान आदी. अशा अनेक शब्दांप्रमाणेच गोमंतकातील व खानापूरातील लोकसंस्कृती ही जवळपास सारखीच आहे. 'लग्नगीतांना गोमंतकामध्ये 'होवयो' असे म्हणतात.'[27] तेच खानापूर प्रदेशामध्ये 'व्हैयो' असे संबोधले जाते.

२.५ समारोप

सदर प्रकरणातून एकंदर खानापूर तालुक्याची ओळख होते. खानापूर तालुक्याची व्याप्ती तसेच त्या प्रदेशाचे असलेले वैशिष्ट्य या प्रकरणातून मांडलेले आहे. भोज, कदंब, इंग्रज यांच्या राजवटीतील काही पुरावे ग्रंथांच्या आधारे सांगण्यात आलेले आहेत. खानापूरच्या लोकभाषेबद्धल सांगताना इतर

बोलींचा ही विचार करण्यात आलेला आहे. खानापुरी भाषेवर कोंकणी, कन्नड, हिंदी, पोर्तुगीज भाषांचा प्रभाव दिसून येतो. कानडी हेल काढून ही बोली बोलली जाते. कानडी भाषेप्रमाणे कानडी संस्कृतीचा ही परिणाम या भाषेवर तसेच समाजावर झालेला आहे. सण, खाद्यपदार्थ अशा अनेक गोष्टींवर कानडी संस्कृती दिसून येते.

खानापूर तालुका हा कृषिप्रधान प्रदेश असल्याने बाराही महीने काही ना काही येथील लोक शेतात पिकवत असतात. खानापूर अंतर्गत येणाऱ्या गावांसाठी 'खानापूर' हे शहर महत्त्वाचे असल्याने उद्योग-धंद्यासाठी, शिक्षणासाठी गावकऱ्यांना इथे यावे लागते. विविध धर्म - जातीतील लोक या प्रदेशात वावरतात. गावातील दैवतांसोबतच 'कोल्हापूरचा ज्योतिबा' व 'सौंदत्तीची यल्लम्मा' या दैवतांवर येथील लोकांची फार श्रद्धा आहे. खानापूरातील सण-उत्सव देखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. जास्त प्रमाणात हे सण पौर्णिमा व अमावसेच्या नावाने संबोधले जातात. येथील लोक हे आस्तिक असून चालीरितींना फार महत्त्व देतात. त्यामुळे त्यांच्या जगण्यातून देवदेवता, त्या अनुषंगाने येणारे सण, उत्सव इत्यादी गोष्टी येतात. तसेच श्रद्धा-अंधश्रद्धांच्या प्रती भावना त्यांच्या जगण्यातून दिसून येतात. रोटी-बेटी व्यवहारामुळे विविध धर्म, संस्कृतीचा प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला आहे. संपूर्ण खानापूर तालुक्यात खानापुरी बोली बोलली जात असली तरी काही शब्दांचे संदर्भ बदलताना दिसतात. या तालुक्यात कन्नड ही राजभाषा असून खानापुरी बोली ही व्यवहार भाषा ठरते. हिंदू धर्मासोबत इतर धर्मातील माणसेही खानापुरी बोलीचा वापर करतात.

२.६ निष्कर्ष

१. खानापूर हा कृषिप्रधान तालुका आहे.
२. खानापूर तालुका हा भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे.
३. कदंब राजवटीपासून खानापूर व गोमंतकाचा सांस्कृतिक सहसंबंध असलेला आढळतो.
४. खानापुरी बोलीतून तेथील लोकांच्या रूढी, प्रथा, परंपरा दिसून येतात.
५. खानापुरी बोलीवर जवळच्या राज्यांचा, प्रदेशाचा प्रभाव पडलेला आहे.

६. संस्कृतीच्या वैविध्यतेमुळे खानापूरात विविध भाषा आढळतात. त्या भाषांचा प्रभाव खानापुरी बोलीवर आढळतो.

७. खानापूर तालुक्यामध्ये राज्यपातळीवर कन्नड भाषा व व्यावहार पातळीवर खानापुरी बोलीचा वापर होतो.

८. गोमंतकाशी रोटी-बेटीचा व्यवहार असल्याने खानापुरी बोलीत कोंकणी भाषेचा प्रभाव दिसतो.

९. खानापूर तालुक्यातील विविध संस्कृतीचा प्रभाव बोलीवर झालेला दिसून येतो.

१०. खानापूर तालुक्यातील लोकांचा कल हा धर्माचरणाकडे असून पापपुण्याच्या कल्पनेवर त्यांचा जास्त विश्वास आहे.

११. धार्मिक दृष्ट्या बहुतांशी खानापूर तालुक्यातील लोक 'सौंदत्ती यल्लम्मा' या देवीचे व्रत फार कडक पाळतात.

१२. खानापुरी बोलीचे स्वरूप खेड्यांनुसार थोड्याफार फरकाने बदलत जाते. तसेच एकच शब्द वेगवेगळ्या गावात वेगळ्या संदर्भाने उच्चारला जातो.

१३. खानापूरातील सण-उत्सवांची नावे ही पौर्णिमा व अमावस्येनुसार ठेवलेली आहेत.

१४. भौगोलिक भेदाप्रमाणे समाजातील जाती, धर्म, वय हे भेदही भाषिक भेदांच्या दृष्टीतून महत्त्वाचे आहेत.

१५. संस्कृती ही एखाद्या समाजातील चाली-रिती, संस्कारांना, आचार-विचारांना बांधून ठेवते.

संदर्भ

---

[1] ('ಕರ್ನಾಟಕ ಗ್ರಾಮ ಚರಿತ್ರೆ ಕೋಶ, ಬೆಳಗಾವಿ) Naik D. B. *Karnataka Grama Charitre Kosha Belgavi District: part 2',* Prof. D. Murahari Naik, Director, Center for Extension & Consultancy, Karanataka Janapada Vishwavidyalaya Gotagodi.

[2] https://newkhanapur.com/about-khanapur

[3] http://en.wikipedia.org/wiki/Khanapur

[4] सातोस्कर, बा. द. *गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती खंड १ ते ३.* महेश आंगले, शारदीय प्रकाशन ३, गंगोत्री, डॉ. आत्माराम बोरकर मार्ग, पणजी गोवा, पृ. ७३५.

[5] सातोस्कर, बा. द. *गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती खंड १ ते ३.* महेश आंगले, शारदीय प्रकाशन ३, गंगोत्री, डॉ. आत्माराम बोरकर मार्ग, पणजी गोवा, पृ. ६१७.

[6] सातोस्कर, बा. द. *गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती खंड १ ते ३.* महेश आंगले, शारदीय प्रकाशन ३, गंगोत्री, डॉ. आत्माराम बोरकर मार्ग, पणजी गोवा, पृ. ५४१.

[7] http://en.wikipedia.org/wiki/Khanapur

[8] ('ಕರ್ನಾಟಕ ಗ್ರಾಮ ಚರಿತ್ರೆ ಕೋಶ, ಬೆಳಗಾವಿ) Naik D. B. *Karnataka Grama Charitre Kosha Belgavi District: part 2',* Prof. D. Murahari Naik, Director, Center for Extension & Consultancy, Karanataka Janapada Vishwavidyalaya Gotagodi.

[9] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली.* श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. २७.

[10] मोरे, नंदकूमार *"चंदगडी बोली".* पगारे, म. सु., पाटील, आशुतोष. 'बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा'. श्री रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, जळगाव, २०१२, पृ. ५७

[11] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली.* श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ५३.

[12] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली.* श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. १५

[13] मालशे, स. गं., पुंडे, द. दि., सोमण, अंजली. *भाषाविज्ञान परिचय.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २००५, पृ. १२२.

[14] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली.* श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ७१.

[15] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली.* श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ३९.

[16] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली.* श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ६५-६६.

[17] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली.* श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ६३.

[18] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली*. श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ६३.

[19] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली*. श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ६३.

[20] मोरे, नंदकूमार *"चंदगडी बोली"*. पगारे, म. सु., पाटील, आशुतोष. 'बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा'. श्री रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, जळगाव, २०१२, पृ.१२८.

[21] मोरे, नंदकूमार *"चंदगडी बोली"*. पगारे, म. सु., पाटील, आशुतोष. 'बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा'. श्री रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, जळगाव, २०१२, पृ.६२

[22] मोरे, नंदकूमार *"चंदगडी बोली"*. पगारे, म. सु., पाटील, आशुतोष. 'बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा'. श्री रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, जळगाव, २०१२,पृ. १३२.

[23] काजरेकर, गोविंद, भोसले, वसंत, कामत, सतीश. *मालवणीतल्या वाटा (मालवणी बोली)*. सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स क्र. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर, २०१७, पृ. ९.

[24] मोरे, नंदकूमार *"चंदगडी बोली"*. पगारे, म. सु., पाटील, आशुतोष. 'बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा'. श्री रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, जळगाव, २०१२, पृ.५४.

[25] भोसले, द. ता. *लोकजीवन आणि लोकसंस्कृती*. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, मुंबई ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई. पृ.२२६.

[26] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *लोकसाहित्य व लोककला*. एम. ए. भाग १ : मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ.१२.

[27] भोसले, द. ता. *लोकजीवन आणि लोकसंस्कृती*. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, मुंबई ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई. पृ. २२२.

प्रकरण ३

खानापुरी बोलीतील भाषिक नमुने

प्रास्ताविक...75

३.१ खानापुरी बोलीचे स्वरूप...75

३.२ लोकगीते..78

३.२.१ लग्नसमारंभाचे गीत 78

३.२.२ नहाण गीत...79

३.२.३ नागपंचमी गीत 79

३.२.४ गणपती गीत...79

३.२.५ ओवसा गीत 80

३.२.६ अंगाई गीत 80

३.२.७ बालगीत 80

३.२.८ चिलिया बाळ गीत 81

३.२.९ श्रावण आयतार गीत..82

३.२.१० डोहाळे गीत...82

३.२.११ फुगडी 82

३.३ उखाणे / नाव..83

३.४ म्हणी...83

३.५ कोडी / इमान 84

३.६ वाक्प्रचार 84

३.७ शिवी...85

३.८ इंग्रजी शब्द 85

३.९ कन्नड शब्द 86

३.१० कोंकणी शब्द..86

३.११ पोर्तुगीज शब्द 87

३.११ मराठीतील ‘आ’करांत व ‘अ’कारांत नावे खानापुरी बोलीमध्ये आकरांत होतात.....87

३.१२ स्त्रियांची नावे 'ई' ने संपवतात....................88

३.१३ हिंदी, उर्दू, फारशी शब्द....................88

३.१४ माणसाला वेगळ्या नावाने संबोधणारी नावे....................88

३.१५ 'व' च्या ऐवजी 'इ' व 'य' 88

३.१६ 'ठ' चा 'ट' 89

३.१७ 'ढ' चा 'ड' 89

३.१८ क्रियापद 89

३.१९ केवलप्रयोगी....................89

३.२० क्रियाविशेषण अव्यय 90

३.२१ उभयान्वयी अव्यय 90

३.२२ वचन....................90

३.२३ लिंग 91

३.२४ भाषिक नमुने....................91

३.२५ खानापुरी बोली व प्रमाण मराठीचे नाते....................95

३.२६ समारोप....................96

३.२७ निष्कर्ष....................97

संदर्भ 98

प्रकरण ३

खानापुरी बोलीतील भाषिक नमुने

प्रास्ताविक

सामाजिक भाषाविज्ञानामध्ये भाषेचा समाजसापेक्ष विचार करण्यात येत असल्याने समाजात वापरल्या जाणाऱ्या भाषाभेदांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. कोणताही समाज एकसारखीच भाषा वापरत नाही. प्रदेश, व्यवसाय, लिंग, जात या भेदानुसार भाषेतही भेद दिसून येतात.[1] कोणत्याही समाजाची जडणघडण समजून घेण्यासाठी त्या परिसरातील बोलीच्या शब्दसंपत्तीचा, वाक्यरचनांचा, वाक्प्रचारांचा, म्हणींचा आदी बोलीतील भाषिक भांडाराचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

खानापुरी बोली ही खानापूर तालुक्याच्या अंतर्गत येणाऱ्या खेड्यांमध्येही कमी अधिक फरकाने बोलली जाते. दर बारा कोसावर वाणी व पाणी बदलते या म्हणी प्रमाणे ही बोली देखील बदलताना दिसते. एकाच वस्तूला दोन नावाने तसेच एका नावाचे दोन अर्थ या बोलीत आढळतात. खानापूर प्रदेश हा व्यवसाय केंद्री असल्याने विविध राज्यांशी या प्रदेशाचा संपर्क येतो. त्यामुळे कन्नड, मराठी, हिंदी, पोर्तुगीज सोबत कोंकणी भाषेचा ही प्रभाव प्रस्तुत प्रदेशावर झालेला दिसतो.

दुसऱ्या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे खानापूर प्रदेशात विविध सण, उत्सव साजरे केले जातात. तसेच लग्नात लग्न गीते ही गायिली जातात. विविध सण-उत्सवाच्या संदर्भात या बोलीत गीते आढळतात. तशीच बालगीते ही आहेत. खानापुरी बोलीतील म्हणी, कोडी, वाक्प्रचार, उखाणे इ. मौखिक साहित्य व शाब्दिक भांडार या बोलीला वैशिष्ट्यपूर्ण बनवते. या प्रकरणात खानापुरी बोलीतील विविध भाषिक नमुने तसेच मौखिक साहित्य व शाब्दिक भांडार नमूद करण्यात येणार आहे.

३.१ खानापुरी बोलीचे स्वरूप

कर्नाटक राज्यातील खानापूर तालुक्यात बोलली जाणारी ‘खानापुरी बोली’ ही इतर बोलींप्रमाणे वैशिष्ट्यपूर्ण आहे. खानापूर हा तालुका बेळगाव, कित्तूर, अळणावर व गोवा या सीमा भागांशी जोडलेला आहे. खानापुरी बोलीवर जास्त प्रमाणात कन्नड भाषेचा प्रभाव दिसून येतो. कन्नड भाषेसोबतच कोंकणी, हिंदी, पोर्तुगीज भाषेचाही प्रभाव या बोलीवर असलेला पहावयास मिळतो. रोटी-बेटी व्यवहारामुळे,

राजकीय व सामाजिक बदलांमुळे बोलीवर या भाषांचा प्रभाव दिसून येतो. खानापुरी बोली ही चंदगडी, उमरगा, बेळगावी बोलींच्या जवळ जाणारी असली तरी तिचे स्वत:चे असे वेगळे वैशिष्ट्य आहे. खानापूर प्रदेशात येणाऱ्या विविध गावात बोलली जाणारी खानापुरी बोली ही प्रमुख बोली आहे. 'एखाद्या व्यक्तीच्या उच्चाराच्या लकबी आणि तिच्याकडून होणाऱ्या विशिष्ठ म्हणींचा किंवा शब्दांचा उपयोग हा; ती व्यक्ती कोणत्या प्रदेशाची आहे हे समजणे शक्य होते.'[2] वेगवेगळया धर्माचे जातीचे लोक एकत्र राहत असल्यामुळे संस्कृतीची देवाण घेवाण होत असते. एकीकडे कन्नड भाषिक 'कर्नाटकी बेंदूर' हा सण साजरा करतात तर दुसरीकडे मराठी भाषिक 'वटपौर्णिमा' हा सण साजरा करतात. अशा सांस्कृतिक संक्रमणामुळे भाषेतही बदल होतो. या बोलीत प्रत्येक शब्दांवर जोर देऊन बोलले जाते. त्याचबरोबर संयुक्त क्रियापदेही या बोलीत आढळतात. *उदाहरणार्थ – 'मिया यन्नाय' – 'मी येणार नाही', 'खट्टे गेल्लीस तिया' – 'तू कुठे गेला होतास?'* तसेच या बोलीत कानडी शब्दही येतात. याचे विश्लेषण पुढील प्रकरणात करण्यात येणार आहे.

खानापुरी बोलीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य हे या बोलीचे उच्चारण आहे. एका विशिष्ट उच्चाराने व हेल काढून ही बोली बोलली जाते. *उदाहरणार्थ – 'यऊलीसाय' हा जरी एक शब्द वाटत असला तरी या बोलीमध्ये हा एकच शब्द पूर्ण वाक्याचे काम करतो. जसे – 'तू येत आहेस का?'* या अर्थाने वरील शब्द वापरला जातो. या शब्दातील 'ऊ' आणि 'सा' या ध्वनींचा उच्चार सुरावटीत केला जातो. तसेच या दोन्ही पदांवर आघात केला जातो. अशा प्रकरांच्या उच्चारांची सुरावट या बोलीतील अनेक शब्दांबाबत दिसून येते. तसेच "तिया यलीस" हे वाक्य प्रश्नार्थक आहे. परंतु ही प्रश्नार्थकता या बोलीच्या बलाघातातून, सुरावटीतून प्राप्त होते. *"तू आली होतीस का?"* हे प्रश्नार्थक वाक्य वरील केवळ दोन शब्दातून विशिष्ट सुरावटीतून बोलता येते. 'यलीस' या शब्दातील 'ई' आणि 'स' या दोन्ही ठिकाणी सुर ओढला जातो.

मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे खानापुरी बोलीवर कोंकणी भाषेचा प्रभावही दिसून येतो. जेव्हा खानापूरच्या भाषेबद्धल बोलले जाते तेव्हा सर्वेक्षणाच्या दरम्यात बहुतांशी लोकांकडून 'खानापूरची भाषा ही कोंकणी भाषेच्या जवळ जाणारी आहे.' असे विधान अधोरेखित करण्यात आले आहे. या बोलीत अनेक कोंकणी शब्दांचा वापर होताना दिसतो.

या परिसरात झालेल्या धर्मांतरामुळे 'बाटगा' हा शब्द शिवीकरिता तसेच मुस्लिम धर्मातील व्यक्तीला संबोधण्यासाठी वापरतात. त्याचप्रमाणे ख्रिस्ती धर्मीय लोक कोंकणी मिश्रित मराठी भाषा बोलत असल्याने त्यांना 'कोकनी' या शब्दाने संबोधतात.

खानापुरी बोलीमध्ये 'पण' हा शब्द उच्चारला जात नाही किंवा या बोलीच्या शब्दकोशामध्ये हा शब्द येत नाही असे म्हणता येते. 'पण' या शब्दाऐवजी 'खरं' हा शब्द उच्चारला जातो. *उदाहरणार्थ- 'मिया यनार व्हत्तो **खरं** माज बसच गावोनाय'.* तसेच 'खरं' हा शब्द सत्यता दर्शविण्यासाठी ही वापरला जातो. *उदाहरणार्थ- '**खरं**च गे बापडी काय सांगो मिया आनी तुज!'* त्यामुळे प्रसंगानुसार 'खरं' या शब्दाचा अर्थ या बोलीत बदलतो. तसेच स्त्रियांच्या तोंडून पुल्लिंगी क्रियापदे येतात. व्याकरणिक दृष्ट्या जरी हे चुकीचे वाटत असले तरी पुल्लिंगी क्रियापदे ही ह्या बोलीचे वैशिष्ट्य म्हणता येते.

उदाहरणार्थ –
१. थांब गे मिया यउलोय.
२. मिया करतो घे ते काम.
३. आत्त माज यन्नाय ग. खरंच आत्त कद्दी कायकी म्हटलो.

अशा प्रकारची क्रियापदे ह्या बोलीत रूढ झाली आहेत. वडीलधाऱ्या लोकांशी बोलताना *"कसा हाइस गा", "काय गा तिया?", "मिया बी यतो गा."* अशा प्रकारे **'गा'** शब्द वापरुन बोलले जाते. 'गा' हा शब्द आदर दर्शविण्यासाठी वापरला जातो. तसेच स्त्रियांशी **'गे'** या शब्दाचा वापर करून बोलतात. *"कन्नच्यान गे यउलिसाय तिया." "व्हय गे आक्का तो यताय म्हनी."* जुनी पिढीतील पुरुष आपल्या बायकोसोबत 'गे' चा उच्चार करून बोलतात. "जाननास गे तिया शेताडे" आता आधुनिकतेकडे वळताना भाषेत देखील बदल होत गेलेले आहेत. आताची पिढी आपल्या बायकोला 'गे' म्हणून संबोधत नाहीत. बऱ्याच प्रमाणात प्रेमाने मुलींना **बाळी** तर मुलांना **बाळ्या** या नावाने बोलविले जाते. तसेच "**संसार** नीट कर." असे म्हणताना "**बाळवी** नीट कर." अशाप्रकारे म्हटले जाते.

खानापूर प्रदेश हा कृषि केंद्रीय असल्याने अनेक कृषिशी निगडीत शब्द या बोलीत येतात. जसे- भांगलणे, कचकी, जॉत, मेर, पिक, शात (शेत), चिक्कल (चिखल) असे अनेक शब्द येतात. तसेच लहान व तरुण मुले आपापसात बोलताना शिव्यांचा वापर करून बोलतात. वाक्याची सुरुवातच शिवीपासून होते. इतर बोलींप्रमाणे खानापुरी बोलीतही म्हणी, शिव्या, वाक्प्रचार आढळतात. तसेच लोकगीतांचा संग्रहही या बोलीत आढळतो. 'यवू खेव तुज', 'डोबरा', 'आवाचं तर एक आनी गावाचं तर येक', 'उशास पोळी

जीव तळमळी' अशा प्रकारचे ध्वनी सतत ऐकू येतात. नवऱ्याला बोलवताना पारंपरिकरित्या धनी, मालक असे न **म्हणता व्हय जी, आयकोल्याशी, हिकडी यवा जरा** अशाप्रकारे बोलवले जाते. काही खेडेगावांमध्ये मुलांकडून त्यांच्या वडिलांना बोलवताना "तुमचा **काडला** (जन्माला घालणारा) खटे हाय" अशाप्रकरे 'बाबा'ला म्हटले जाते. तर आईला **बाय** या नावाने संबोधले जाते. "खय गेली तुजी बाय" (कुठे गेली तुझी आई?) अशाप्रकारे 'बाय' हा शब्द खानापुरी बोलीतून येतो.

खानापुरी बोलीच्या अभ्यासासाठी विशेष लिखित साहित्य उपलब्ध नाही. तसेच येथील साहित्यिकांनी त्यांच्या लेखनासाठी खानापुरी बोलीचा वापर अद्याप केलेला नाही.

३.२ लोकगीते

लोकगीतांतून विशिष्ठ प्रदेशाची संस्कृती, लोकजीवन व रितीरिवाजाचे दर्शन घडते. लोकगीते ही विधिप्रसंगी गायिली जातात. ही गीते वेगवेगळया विधीतील क्रियांशी जोडलेली असतात.[3] जसे हळद लावताना, नीम काढताना, गृहप्रवेशच्या वेळी दार धरताना गीते गायली जातात. अशा गीतांमुळे विधी अर्थपूर्ण होतो. काही गीते ही मनोरंजन, कष्ट हलके व्हावे यासाठी गायली जातात. आपल्या जीवनातील सुखदु:खाचे अनुभव स्त्रिया गीतातून मांडतात. तर काही गीते ही उत्सवाशी निगडीत असतात. जसे नागपंचमी, श्रावणी रविवार, डोहाळे गीत आदी. अशाच प्रकारची खानापुरी बोलीतील गीते या अनुच्छेदात मांडण्यात आलेली आहेत.

३.२.१ लग्नसमारंभाचे गीत

खानापूर तालुक्यात लग्नसमारंभातील प्रत्येक विधिला गीत गायले जाते. त्या गीतांतून खानापूर तालुक्यातील संस्कृतीचे दर्शन घडते.

घनाच्या घाटीला नमस्कारस्पती
आदी मानं देती रांगोळीसी
व्हैयो व्हैयो व्हैयो ।१।
घनाच्या घाटीला नमस्कारस्पती
आदी मानं देती उखळासी
व्हैयो व्हैयो व्हैयो ।२।
घनाशी घाटीला कुडवा खंडीचा
बल्लवा मांडीचा कूळू देवा
अशे हे कुळुदेव घोडे स्वार झाले

घने मूर्त दिले लघू करा
व्हैयो व्हैयो व्हैयो ।३।
देवाच्या देवकारन्या यतो म्हनत्यात
कुंकुमाचे जोड लेवत्यात
देवाच्या देवकारन्या यतो म्हनत्यात
काकनाचे जोड लेवत्यात
व्हैयो व्हैयो व्हैयो ।४।

३.२.२ नहाण गीत

मुलीला पहिली मासिक पाळी येते त्यावेळी मोठा समारंभ केला जातो. त्या समारंभात गीत म्हणून त्या मुलीची ओटी भरली जाते.

आरतअल्याळ आरतपल्याळ
जडजनीगळं संन्यमनीग सीतागळं
जोजमनीग कुसुमरीडाळ नीरचाल्याळ सूsss निंगय

३.२.३ नागपंचमी गीत

नागपंचमीच्या सणाला घरोघरी पाळणे बांधून मुली त्यावर झोका घेत गीत गातात. तसेच नागाची पूजा करताना देखील गीत गायले जाते.

गावात आला गावदेऊ
त्याचा गुडब्यावरचा खेळू
आई मी नाग खेळू जातो
नको लेकी लेवायासी नाही
नेसीन व्हन्नीची तर साडी
आन्ना जिवानी मारील
व्हन्नी शिव्या तर देईल

३.२.४ गणपती गीत

गणेश चतुर्थीला गावातील मुली व स्त्रिया एकत्र येऊन गणपती समोर गीत गातात.

दुदूमल्याची येल देवना गुंपेवर गेली
सोन्याच्या पंचारती देवा कोना ओवाळू
गणपती देव सदरेर बसलाय त्याला ओवाळू
देवानू त्याला ओवाळ

३.२.५ ओवसा गीत

गणेश चतुर्थीच्या पाचव्या दिवशी ओवसा हा सण साजरा केला जातो. हा सण सुहासनींसाठी खूप महत्त्वाचा असतो. या दिवशी पूजा करताना स्त्रिया खालील प्रमाणे गीत गातात.

पाचाचे पन्नास महिन्याचे दिवस
येउडे दिवस खई देवा राहिले
राहिलो राहिलो केगदीच्या बनी
पाच तर केगदी माज्या वोवशाला देशील
पाच तर वाळकं माज्या वोवशाला देशील
पाच तर पानं माज्या वोवशाला देशील

३.२.६ अंगाई गीत

खानापूर तालुक्यात लहान बाळाला झोपवताना खालील प्रमाणे अंगाई गीत गायले जाते.

बाळाचा पाळणा
सुंबाच्या दोरिया
बाळाचा पाळणा येत जात लोटी
बाळ करी गोष्टी गे पाळण्यात

३.२.७ पाळणा गीत

खानापूर तालुक्यात मुलाच्या पाळण्याच्या (बारसा) वेळी खालील प्रमाणे पाळणा गीत गायले जाते.

सन आटराशे सतवन सालात
आनंद झाला करवीर शेरात (शहरात)
पयल्या शुक्रवारी श्रावन महिन्यात
पुत्र जन्मला शाहू राजास
विस्रांती चंद उगवला लक्षुमी म्हालात
जो बाळा जो रे जो (जो- मूर्धन्य)

३.२.७ बालगीत

खानापूर तालुक्यात लहान मुले खेळताना खालील प्रमाणे गीतांचा वापर करतात.

बे एके बे
बांगडा भाजून दे
बांगडा झाला कच्चा
मामा आमचा लुच्चा

बांगड्याची वास
मी झालो पास

३.२.८ चिलिया बाळ गीत

आला बिगनेचा बावा
आला चांगुनेच्या दारी
आल्लं आल्लं कर गे माई
दानं वाडं चांगुनाबाई
हांडलीनं सुपबर साळिया
हांडलीनं सुपबर डाळिया
गेली बावा दानं वाडू आसल्या दानेची न्हाई आमा चटं
वाडं तुज्या वडील सासऱ्यासं
सासरा घरात तर न्हाई सासरा शेताशी तर गेलाय
वाडं तुज्या वडील सासवेसं
सासू घरात तर न्हाई सासू गावास तर गेली
वाडं तुज्या चिल्लिया बाळासं
(कन्नड) बिद्दीत खेळतल्या चिल्लिया रे बाळा
आंगी नी टोपनाच्या चिल्लिया रे बाळा
हातीत कयकटाच्या चिल्लिया रे बाळा
चिल्लिया बाळा ते धावत गे आले
चिल्लिया बाळाची मटनं करीली
बाळाची शिर काडून शिक्क्यावर ठेविली
शिजेची गदगदा परमाळ सुटला
उटा उटा गुरु तुमी आंगोळीशी करा
तुमी भोजनासी बसा
आसल्या दानेची न्हाई आमा चटं
मारं गे मारं शिक्क्यावयली शिरं
बाळाच्या शिरेची मटनं करीली
शिजेची गदगदा परमाळ सुटला
उटा उटा गुरु तुमी आंगोळीशी करा
तुमी भोजनासी बसा
कर गे कर ताई तीनं काई ताटं
आमी दोगं गुरु आनी तीनं ताटं कशी
हाकं नी मारं गे चिल्लिया बाळासं
आंगी नी टोपनाच्या चिल्लिया रे बाळा
हातीत कयकटाच्या चिल्लिया रे बाळा
चांगुना बाई ती विचारू लागली

येवडे दिवस खई बाळा न्हाइले
न्हाइलो न्हाइलो गुरूच्या मट्टात
तितल्या तीते गुरु न्हाईशे तर झाले

३.२.९ श्रावण आयतार गीत

श्रावण महिन्याच्या प्रत्येक रविवारी खानापूर तालुक्यातील स्त्रिया आयतार (रविवार) पूजतात. त्या पूजेच्यावेळी खालील गीत गायले जाते.

आयतारा दिवशी आयतार केला
चांद सूर्याला नमस्कार केला
हाराहारा देवा करीन तुजी सेवा
घेवा तुमचा चुडा देवा आमचा इडा
आमचा जोडा जलमजुगी थेवा

३.२.१० डोहाळे गीत

गरोदर स्त्रीची चोर ओटी तसेच डोहाळे जेवण करताना खालील प्रमाणे गीत गायले जाते.

एक महिन्याची न्हारी गरबिन विच्छा गेल्याई कशावरून
केळी बन्नाच्या देटावरून
केळी बन्नाचा देट कवुळा
वेनीत गजरा मावळा
शीतेबाईचे दिवाळे पुरवा
दोन महिन्याची न्हारी गरबिन न विच्छा गेल्याई कशावरून
पेरू बन्नाच्या देटावरून
पेरू बन्नाचा देट कवुळा
वेनीत आबोली मावळा
शीतेबाईचे दिवाळे पुरवा
तीन महिन्याची न्हारी गरबिन विच्छा गेल्याई कशावरून
खारुक बन्नाच्या देटावरून
खारुक बन्नाचा देट कवुळा
शीतेबाईचे दिवाळे पुरवा

(असे दर महिन्याप्रमाणे गायले जाते.)

३.२.११ फुगडी

गणेश चतुर्थीला गावातील स्त्रिया गणपती समोर फुगड्या घालतात.

१. दुगट बाई दुगट रवळी भर दुगट अण्णास बायको केलो रुपय गेली फुकट.

२. माळ्यावयनं पडली पिशवी हस्तल्याची जळली मिशी.

३. मोर बाई मोर आंब्यावयला मोर मंगलचा नवरा कवट चोर.

४. पनत बाई पनत भित्तीवली पनत आज वर्साची न्हवरी आवदू बानत.

३.३ उखाणे / नाव

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये बायको आपल्या नवऱ्याचे नाव थेट उच्चारत नाही. त्यामुळे लग्नसमरंभात नवऱ्याचे नाव सर्वांचा मान राखून उखाण्यातून नाव घेण्याची प्रथा आहे. तसेच नवऱ्याला देखील लग्नसमरंभात उखाण्यातून बायकोचे नाव घ्यावे लागते. अशाच प्रकारच्या उखाण्यातून खानापूर तालुक्यातील संस्कृती, वस्त्रसंस्कृती, परंपरा इत्यादींचे दर्शन घडते.

१. सोन्याची चईन अंधारात झळके ____ची बोली सभेमध्ये ओळखे.

२. चार दिले बैलाला पाच दिले झुलाला यवडं सईन कुनाला ___च्या गुनाला.

३. सोन्याचा नथ घेतला साडीच्या केल्यात ____ नाव घेतो सुवासणीच्या मेळयात.

४. कनकन कुदळी मनमन माती, तई तगाची; मिशी वागाची. लेक कुनाची; आईबापाची. सून कुनाची; सासू मायाची. रानी कुनाची; भर्ताराची. भर्तार! भर्तार! म्हटलं कुनी; आश्शी हाट्टी कुनासाठी. भेन आली भावासाठी. भेनीनं हांडलीन जरीकाटी, जरीकाटीचा भरला बाजार; बाजारातनं हांडले तीन हजार, तीन हजाराची पानं, नंदेच्या घरास जानं, नंदेचं बाळ तानं, तितनं जानं पुन्यास, पुन्यासनं हानली आपुची डबी, आपूच्या डबीचा पिका पिका रंग, ___रावांचे नाव घेतो सर्व लोक झाली दंग.

३.४ म्हणी

खानापूर तालुक्यातील बोलीतून दैनंदिन व्यवहाराच्या बोलण्यातून वेगवेगळ्या म्हणींचा वापर होताना दिसतो. यातील अनेक म्हणी ह्या अलंकारिक असून त्यातून विनोद, दैनंदिन जीवनातील घडामोडींचे दर्शन खानापुरी बोलीतील म्हणीतून होते.

१. डोळयात न्हाय दुक आणि रडतलं सुक.

२. वर्षास एक रयीत आनी गेला गू खाईत.

३. आबाचा भोपळा.

४. शान्याचा बैल रिकामा.

५. हिकुतीकून यऊंदे पाशात गाओंदे.

६. आगासली ती मागासली आनी पाटनं यली गरवार झाली.

७. मोडाचा दिस दिसेनाय आनी आळशी रांड उटेनाय.

८. निमतास धनी कुकुवास आदार.

९. येरे दिसा भर रे पोटा कदी येते गनेसा.

१०. आईबाप गेले गावा पोरं वाजवती पावा.

३.५ कोडी / इमान

खानापूर तालुक्यातील लोकांच्या बोलण्यातून वैशिष्ट्यपूर्ण म्हणी, वाक्प्रचार तसेच इमानांचा (कोडी) वापर होतो. या कोड्यांतून खानापूर तालुक्यातील संस्कृतीचे दर्शन होते.

१. कोकनातलं आला भट धर शेंडी आपट- शेंबूड

२. साता समुद्रा पलीकडे लावल्या केळी हालत्यात खरं मोडनात - हाताची बोटे

३. उल्लीशी असतानं हिरवं नेशे मोटी झाल्यावर तांबडं नेशे - मिरची

४. उल्लीशी नवरी सावलं नेशे भल्याभल्याच्या पंगतीत बसे - चिलीम

५. आट्या काट्याचा बांधला भारा खई रे जातीस ढोनग्या पोरा - पनस (फणस)

६. साता समुद्रा पलीकडे रामाने लावले अळे त्यावर दोनच फळे - चंद्र आणि सूर्य

७. काळूगया काळूगया जळो तुजं लक्सान घासा गनकनी मागते मकान - पोळयाची काईल (तवा)

८. हारन पळे दुद गळे - जातं

९. माजं हुमान किया किया भुत्तुर पिकताय भाहीर बिया - मधमाश्यांचे पोळे

१०. उल्याश्या देवळीत लुल्लूबाय खेळे - जीभ

३.६ वाक्प्रचार

वाक्प्रचारांचा समाजजीवनात उत्स्फूर्तरित्या वापर होत असतो. कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त आशय वाक्प्रचारातून व्यक्त होत असतो. अगदी अशिक्षित व्यक्ती देखील बोलण्यातून वाक्प्रचारांचा वापर करते. खानापुरी बोलीतील वाक्प्रचारातून खानापूर तालुक्यातील समाज, संस्कृती व साहित्याचे पडसाद उमटतात.

१. पूजा करणे - खरडपट्टी काढणे

२. कोंबडा शिकला – काही तरी बिनसणे

३. वारं चुकलं- वाट चुकली

४. झेजरतो तुज – बराच मार देणे

५. चामार चौकशी करणे- नको त्या गोष्टीत लुडबूड करणे

६. तट्टा भरला – पोट भरणे

७. एक्कातलं दोनात करणे – पसारा करणे

८. वशाड पडो, पाड पडो – सत्यानाश

९. जिवाची हांग नसतानं – जिवाची पर्वा नसताना

३.७ शिवी

शिवी हा एक सहज भाषिक आविष्कार आहे. त्यामुळे त्याचे बोलीरूप प्रमाणभाषेपेक्षा अधिक नैसर्गिक व रांगडे असल्याने प्रत्येक बोलीमध्ये शिव्या असतात. परंतु दरवेळी शिवी राग किंवा तिरस्कारामुळे दिली जात नसून प्रेमापोटीही शिवी दिली जाते.[4]

१. हाडपित्तल्या
२. वश्शाड पडो
३. थू तुज्या जिन्यावर
४. थुकमारा बावा
५. जोकमार
६. कटलिया
७. डोंबारी
८. रांड
९. बोडकी
१०.छिनाल

३.८ इंग्रजी शब्द

खानापुरी बोलीमध्ये इतर भाषांप्रमाणे इंग्रजी भाषेतील शब्दांचा वापर होतो. काही शब्द जशास तसे वापरले जातात तर काही शब्दांचे रूप बदलून ते खानापुरी बोलीत आलेले आहेत.

इंग्रजी शब्द	खानापुरी बोली

Necklace	नकलेस
Fry	फराय
Frieze	फिरिज
Chain	चईन
Bag	ब्याग
Butter	बट्टर
Clip	किलिप
Bulb	बल्ब
Candle	मेनवात
Hospital	हासपिटल
Dance	डेन्स
Lipstick	लिपटीक

तक्ता क्रमांक ३.१ खानापुरी बोलीत येणारे इंग्रजी

३.९ कन्नड शब्द

खानापुरी बोलीवर कन्नड भाषेचा प्रभाव जास्त असलेला दिसून येतो. त्यामुळे कन्नड भाषेतील अनेक शब्द या बोलीत रूढ झालेले आहेत.

कन्नड शब्द	प्रमाण मराठी
भाय, भाव	विहीर
वडलाप्पा, अण्णा	मोठा भाऊ
माकाड, मंग	माकड
कडबू	करंजीचा गोड प्रकार
आक्का	मोठी बहीण/ आई
आप्पा	वडील
बिंदगा	हंडा
मॉड	दमट

तक्ता क्रमांक ३.२ खानापुरी बोलीत येणारे कन्नड शब्द

३.१० कोंकणी शब्द

गोवा हा खानापूर तालुक्याचा शेजार प्रदेश असल्याने कोंकणी भाषेचाही प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला आहे. रोटी-बेटी व्यवहारामुळे तसेच तिथे असणाऱ्या ख्रिस्ती धर्मियांमुळे खानापुरी बोलीमध्ये कोंकणी शब्दांचा वापर होत असतो.

कोंकणी	खानापुरी
झेम	झाम
कोतमिर	कोतमिर
चा	चा
वांगड	वांगडं
निकते	निकतं
वाग	वाग
येदोळच्यान	यदोळच्यान
सरपळी	सरपोळी
गावले	गावलं

तक्ता क्रमांक ३.३ खानापुरी बोलीत येणारे कोंकणी शब्द

३.११ पोर्तुगीज शब्द

गोवा हा खानापूर तालुक्याचे शेजार राज्य असल्याने कोंकणी भाषेत येणाऱ्या पोर्तुगीज भाषेचाही प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला दिसून येतो. पोर्तुगीजांच्या आक्रमणामुळे गोव्यातील संस्कृती व जीवनावर त्याचा बराच परिणाम झालेला आहे. गोव्याशी रोटी-बेटी व्यवहार असल्याने गोव्यातील खाद्य संस्कृती, तसेच तेथील संस्कृतीचा प्रभाव खानापूर तालुक्याच्या संस्कृतीवर थोड्याफार प्रमाणात झालेला आहे. खालील प्रमाणे पोर्तुगीज शब्द खानापुरी बोलीतून येतात.

इस्त्री	फालतू
घमेले	बटाटा
चावी	बाळडी
तंबाकू	बिस्कुट
पगार	बुच
परात	मेस्त्री
पाव	लिलाव

तक्ता क्रमांक ३.४ खानापुरी बोलीत येणारे पोर्तुगीज शब्द

३.११ मराठीतील 'आ'करांत व 'अ'कारांत नावे खानापुरी बोलीमध्ये आकरांत होतात

१. विठोबा - विठ्या
२. सुरेश - सुऱ्या
३. हेमंत - हेम्या
४. शाम - शाम्या

५. जोतिबा - जोत्या

३.१२ स्त्रियांची नावे ‘ई’ ने संपवतात

१. सुगंध - सुगंधी
२. सुमन - सुमनी
३. रेणुका - रेनी
४. अक्षता - अक्षी
५. कमल - कमली

३.१३ हिंदी, उर्दू, फारशी शब्द

१. जमीन जुमला
२. दवाखाना
३. हालत
४. हमाली
५. हद्द
६. मुलुख-मुलूक
७. लगाम
८. जल्दी- जल्दीन

३.१४ माणसाला वेगळ्या नावाने संबोधणारी नावे

१. तांबडं
२. बिळगं
३. मुक्कं
४. घुम्मं
५. कटकटी
६. केंगरं
७. शेरी
८. मुसलं
९. मुक्कं
१०. रोड्ड

३.१५ ‘व’ च्या ऐवजी ‘इ’ व ‘य’

१. विमल - इमल
२. विट - इट
३. वेणी - येनी
४. विश्वास – ईश्वास
५. विजार - इजार (तालव्य उच्चार)
६. विष – इस

७. वेचणे- येचने
८. विंचू - इंचू
९. विठ्ठल – ईट्टल

३.१६ 'ठ' चा 'ट'

१. काठी – काटी
२. कुठे – खटे
३. उठायला – उटोस
४. विठ्ठल – ईट्टल
५. मुठभर - मुटभर
६. आठ - आट

३.१७ 'ढ' चा 'ड'

१. दाढ - दाड
२. मढं - मडं
३. वाढ - वाड
४. काढ – काड
५. काढा – काडा

३.१८ क्रियापद

१. जाऊलोय -जात आहे
२. यऊलोय- येत आहे
३. करुलोय- करत आहे
४. खाऊलोय- खात आहे
५. पिओलोय- पित आहे
६. पळोलोय- पळत आहे
७. म्हनूल्यात- म्हणत आहेत
८. म्हनत्यात- म्हणतात
९. ठेऊलोय- ठेवत आहे
१०. नांगरुलोय- नांगरत आहे

३.१९ केवलप्रयोगी

१. अय्यो - कन्नड
२. आगे बाय
३. हाबग
४. आव्वा - आश्चर्य कारक शब्द आहे
५. बाई
६. आरे तिच्या न्हून

७. अय्यो गा
८. अय्यो देवा

३.२० क्रियाविशेषण अव्यय

१. केव्हा - कन्न
२. जेव्हा - जन्न
३. उद्या - उद्या
४. इकडे - हिकडी
५. कुठे - खटे
६. येथे - हित्ते
७. परवापासुन - परावाच्यान
८. तिथे - तित्ते
९. येथून - हितंन
१०. जेथे - जिकडी

३.२१ उभयान्वयी अव्यय

१. आणि - आनी
२. आणखी - अजून
३. शिवाय - नसतानं
४. किंवा - न्हायतर
५. पण - खरं
६. म्हणजे - म्हंटल्या
७. याकरिता - म्हनून
८. तर - तर
९. जर - तर - जर तर
१०. की- नी

३.२२ वचन

१. कतरी - कतऱ्या
२. नक - नकं
३. तांबिया - तांबिये
४. झाडू - झाडवा
५. डालं - डाली
६. आंगी - आंगिया
७. बाटली - बाटलिया
८. कोयता - कोयते

३.२३ लिंग

१. नेंता - नेंती
२. पोरगी - पोरगा
३. घोमानुस - बाईमानुस
४. म्हातारा - म्हातारी
५. डोंबारा - डोंबारी
६. येनी- इवाय

३.२४ अभ्यस्त शब्द

१. दोदोन
२. एकेक
३. टारटार
४. कटकट
५. धाधा
६. गाडगीबिडगी
७. भाजीबिजी
८. कन्नबिन्न
९. टनाटन
१०. झाडूबिडू

३.२४ भाषिक नमुने

खालील नमुने खानापूर तालुक्यातील खानापूर, रूमेवाडी, शिंदोळी, माचाळी या भागातील व्यक्तींची आहेत.

- कन्नं गे यलीस तिया ? खई पत्ता तुजा?

गप ऱ्हा गे बापडी. वाचलो ते म्हत्वाचं म्हन . काय खरं न्हवतं गे ते .

काय गे व्हलं तुज ? अशी काय बोलोलिसाय

लई गे शिक व्हत्तो मिया . धा दिस आसपिटलात व्हत्तो मिया . खईटन ताप यला कायकी बग उट्टोसच व्हईनाय झालं. पोटात बी काय ऱ्हाईनशे. परत कोरोना बी झाला आसं दिस्सोलागलं आऊ.

काय गे खाल्लीस तर तिया यवडं हुस?

काय नाय गे . ढोक्या आंब्याचं बग लोंचं घाटलो. ते खालो आनी गेलो मिया शेताडे. परत घराडे यतो म्हटल्याsss आंगच तापल की गे नी. आनी कमीच हुसनाय . खरं मिया बग गे एकच फॉड खाल्लो आनी यवडं लागोचं !

आगे बाय! यवड्याच यवडं जालं तुज . काय आऊ तिया बी. आंबे म्हटल्या काय मरली उटतीसाय तिया .

काय करुवा घे . जाव्वा आमी य तिया.

प्रमाण मराठी

- कधी आलीस तू ? कुठं पत्ता तुझा ?

गप रहा ग बाई . वाचले ती महत्वाचे म्हण. काही खरं नव्हतं माझं.

काय ग झालं तुला ? अशी काय बोलतेस .

खूप आजारी होते मी . दहा दिवस हॉस्पिटलमध्ये होते मी. कुठून ताप आला मला काय माहीत उठायलच होत नव्हते. पोटात पण काही रहात नव्हते. परत कोरोना झाला असं वाटलं मला.

काय ग खाल्लं होत तर तू इतकं व्हायला?

काही नाही ग. ढोक्या आंब्याचं लोणचं घातलं होतं बघ. ते खाल्लं आणि गेली मी शेताकडे. परत घराकडे येते म्हणजे अंग तापलं आणि कमीच झालं नाही. खरं तर मी एकाच फोड खाल्ली होती आणि इतकी लागायची!

काय ग बाई ! इतक्याच इतकं झालं तुला . काय तू पण . आंबे म्हटले की तू मेलेली उटतेस.

काय करूया . जाऊया आम्ही ये तू

- **जानकी लक्ष्मण मोटार (गृहिणी)**

आत्त माजं सामान ह्यासनी गाव्याल! ह्याचेगत झाल्या गांडीस डोका लाऊन पळे व्हत्ता. ऱ्हानच न्हाय. खानापूरात जाऊन आनी यला बग लई यळबर. ते बी राती बसला म्हनून नायतर ययीव्हात्ता वाडबर. तरी

पावसान बरं केल्यान नी. यल्लं तवडच उल्ल आनी गेलं. माळ भुत्तूरली तोडल्यान पोरान हाबं हित्ते बसोन... काय ते कपडे का आसली का काय म्हनतलं तन्न. तांदूळ टाकुस आनी ब आसलं नीच हिरवं. आमची वयनी काय म्हनूली "आसलं घेतलं न्हाय आऊ फुगल्यागत दिसताय आनी हेच बरं." बावलीगात यवडं दिसे.

आगदी सोप्प हाय खरं, काय सांगतीस. पाजे तवडी शाळा शिकली तर बी हे गावनाय. एक एक इमान हाय! हो पावना यलाय की नी आज? त्यानी आईकत्यात

एक यवडं मानुस ऱ्हालं तर बी गळा वडताय... आसं वळको पायजे नी मानं टपाटपा यताय... आगे बाय ! असलं बी पायजे. तन्नच्या लोकांचं घून काय केलीस घे... ते मागे तर करलं गेलं आत्त तर देवाचं ध्यान करताय का बगुवा... काय गे बाय कौतीक... इमान यताय खरं ते धंदा करतानं तिया एक मिया एक सांगतानं यताय.

शब्दार्थ

ह्यासनी- यांना, गाव्याल- सापडेल, ह्याचेगत- याच्यासारखं, यला- आला, यल्लं – आलं, भुत्तूरली- आतली, ययीव्हात्ता- आला असता, वाडबर- मघाशी, आसली- असले, तन्न- तेव्हा, म्हनूली-म्हणत होती, बावलीगात- बाहुलीसारखं, यवडं- एवढीशी, खरं- पण, पाजे- पाहिजे, गावनाय- मिळत नाही, घून- घेऊन, बगुवा- बघूया/ पाहूया, इमान- कोडं, यताय- येतय. .

गावलं हा शब्द जरी एक असला तरी प्रसंगानुसार त्याचा अर्थ मिळणे, सापडणे किंवा भेटणे असा होतो.

- **कितेरीन कायतान डिसोझा (मासेवाली)**

कसं काय वारं चुकलं !
यलो काम एक हाय म्हनून
हित्ते कन्न घर बांदल्यायी बगुसच न्हाय नी मिया. बगुनाय ह्यांनी म्हनूल्यात
लय दिवस झाले नी बांदोन
मिया तिकडी बगटलो तुमानं
त्या घराडे ?

होऽऽय.

तीतेऽऽ म्हाल ठेवतो. झिंगे-बिंगे चाळतो.

मिया हित्ते बगुसच न्हाय.

शब्दार्थ

म्हनूल्यात- म्हणत आहेत, झिंगे – सुकलेली सुंगटं, लय- खूप, बगटलो- बघितलं, घराडे- घराकडे

- **लक्ष्मी ज्योतिबा गुरव (गृहिणी)**

पाऊसऽऽ लागोलाय म्हटल्या यऊल्याशी. पानी हाय. होऽऽय. कन्न सनात बरं व्हननाय ते. पावसान बरं केल्यान गे बाय. कोंबडीची जत्रा बग गे. कोंबडीची जत्रा. मुसल्याच्यास्न लई कोंबडी नी दांडगी. लई पिल्लावळ... कास बोलवुले म्हन्नार ती यवडेदी बलवूनाय नी. ही इकते नी. बाजारात. झालं? करली पूजा ? ये गे खाव्वा भाकरी. माज बोलतलच कटीन यलं तीते आत्त... यतीऽऽस कद्दी यतीस. सगळे बरे हात आराम. मामाऽऽ आत्त जरा उटोन बसलाय बग. शीक जरा व्हत्ता हो. कल दिवसबर उट्टोसच न्हाय. इंजिश्नं करुन हांडल्यान. तीन इंजिश्नं झाली आत्त. मानं काय करतीसाय! आत्त हास काय घरात? काय म्हटलो दुट्टीर गेलीसाय... सासूबाई करून बरी हात? बरं घे. वोवसा हानुस जाऊ पाजे लवकर यवा.

शब्दार्थ

सनात -सणात, केल्यान- केलं, लई- खूप, दांडगी- प्रचंड, कास- कशाला, म्हन्नार- म्हणणार, यवडेदी- इतके दिवस, करली- केली, कटीन- कठीण, कद्दी- कधी, हात- आहेत, उट्टोसच न्हाय- उटलेच नाहीत, हांडल्यान- आणलं, मानं- मग, पाजे- पाहिजे.

- **कमल ज्योतिबा गुरव (गृहिणी)**

खावा चला नी भाकरी. बटाट्याची भाजी आनी घवनं. रूमेवाडीस.. पूजा बांदल्यांताय. आतऽऽ मामी म्हणते मामा शीक हाय. ताई येनार. मामाला बगायला... ये गावलं ग? बग कवडं मस्ती हाय ते. सगळं पगळान लावल्यान ब इत्ते. काय एक्कातलं दोनात करून गेलं ब हे सगळं. सादरं करून ठेवलो मिया हे! काय दरबार करल्यानात बग जरा हिडी. आत्त कसं कसं घालून ठेवतलं हे. काय उल्लं का काय हे महाभारत रे बाबा! ऱ्हाइनाय म्हनून ठेवलं हाय हे आनीऽऽ कन्नं पड्याल उपयोगास ते सांगोस यन्नाय नी. हे काय

दरबार काय उल्ला हाय काय हो!.. लाऊन का देलीस तिया? आत्त मानं बगतो याचा इल्ला. आत्त ओवसा-पिवसा करून. बरं व्हताय गे ऱ्हाइनाय. इचारलो मिया. काल तिया बी यल्ली?.. तुज काय म्हाईत व्हईनाय काय लॉक बी. शानी दरबार का उल्ला म्हटलीस तो. एकाचं ठेवतीस काय दोनाचं सांबाळोन. खरंच गे बाय !

अय्यो उजेडास यवू आत्त! काळकात हाय. कदी यनार? रैवारी यनार... चा झाला. नाष्टा आता करायचंय. आनी काय चाललंय ?

शब्दार्थ

पूजा बांदल्यांताय- पूजा घातले, गावलं- सापडलं, कवडं- किती, पगळान- पसारा, सादरं- व्यवस्थित, हिडी- इकडे, सांगोस यन्नाय नी- सांगता येत नाही, लाऊन- पाठवून, यल्ली- आली होतीस.

बायकोला कंपनी, बिराड, मंडळी अशा नावाने संबोधले जाते. कोणीही बायको कुठे आहे असे न म्हणता या शब्दांचा उल्लेख करून विचारले जाते.

- **१७ वर्षीय मुलगा**

पयले दिवस एकटं गेलो.. जिकल्यावर ग... घरात हाय मोबायल. यंतानं मक्याचं पीठ हान. पॅकेट. मम्मी कव्वा गेली माजच म्हाईत न्हाय. लेवलच कंप्लीट व्हईनाय माजा हो. च्याइला. 299 लेवल. काल जाऊस न्हाय. मॅरोतोन होत्त. हितनं पळाली पोरं. भांडी वता ती. ही लाव... मिया वतितो तर घागरबर वतितो बा. टिपके टिपके न्हाय बा आमचेकडे. त्या पोरीया.

शब्दार्थ

कव्वा- कधी, होत्त- होतं, माजा – माझा, हो – हा, जाऊस न्हाय – गेलो नाही, हितनं – इथून, वता – ओता, न्हाय – नाही.

३.२५ खानापुरी बोली व प्रमाण मराठीचे नाते

भाषा ही एक सामाजिक संस्था असून ती परिवर्तनशील असते. समाजाप्रमाणे भाषेतही परिवर्तन होते. एखादी बोली ही त्या सीमा भागाशी मर्यादित असते किंवा एखाद्या समाजाची ती बोली असते असे ही म्हणता येते. परंतु दुसऱ्या प्रदेशाशी व्यवहार करताना मात्र प्रमाण भाषेतच व्यवहार करावा लागतो.

कारण एका विशिष्ट प्रदेशातील व्यवहारभाषा दुसऱ्या प्रदेशातील लोकांना समजणे कठीण होऊ शकते. जरी एखाद्या बोलीतील व्याकरण परिचित असले तरी त्याचा आशय पूर्णपणे कळणे कठीण जाते. त्यामुळे खानापूर प्रदेशातील लोक इतर प्रदेशाशी संवाद साधताना प्रमाण मराठीचा आधार घेतात.

खानापुरी बोली व प्रमाण मराठीचे नाते हे जवळचे आहे. खानापुरी बोलीतील अनेक शब्द हे प्रमाण मराठीत आढळतात. शाळा, महाविद्यालयात खानापुरी बोलीसोबत प्रमाण मराठीचा वापर होतो. खानापुरी बोलीची उच्चारण प्रक्रिया ही प्रमाण मराठी भाषेपेक्षा भिन्न आहे. खानापुरी बोली बोलणारी माणसे जेव्हा प्रमाण मराठीमध्ये बोलतात तेव्हा ते खानापुरी बोलीचा हेल काढूनच बोलतात. शब्द जरी प्रमाण मराठीचा असला तरी बोलण्याची तऱ्हा ही खानापुरी बोलीची असल्याचे आढळते. खानापूरच्या लोकगीतातूनही थोड्या फार प्रमाणात प्रमाण मराठीचा स्पर्श दिसून येतो. जसे 'म्हणजे' च्या ऐवजी 'म्हनजे', काटवटी, चंची आदी शब्द बोलीत येतात. तसेच खानापुरी बोलीत आढळणारी कोडी ही काही प्रमाणात प्रमाण मराठीकडे झुकणारी आहेत. सरकारी व्यवहार करताना, तसेच साहित्य लेखन करताना प्रमाण मराठीचा वापर येथे केला जातो.

खानापूरातील काही माणसे कामानिमित्त बेळगाव, महाराष्ट्र येथे स्थलांतरीत झाल्यामुळे तसेच त्या प्रदेशातील मुलींना लग्न करून खानापूरात आणल्याने खानापुरी बोलीवर प्रमाण भाषेचा प्रभाव दिसतो. त्यामुळे कोंकणी, इंग्रजी या भाषांसोबत प्रमाण मराठीचाही प्रभाव खानापुरी बोलीवर असलेला दिसून येतो.

नव्या पिढीला खानापुरी बोली ही गावंढळ वाटत असल्याने ती प्रमाण मराठीकडे सरकताना दिसते. परंतु ती भाषा पूर्णपणे प्रमाणीकरण नसून खानापुरी मिश्रित बोली आहे. तरीही काही अंशी तरुण पिढी खानापुरी बोली जपण्याच्या मार्गावर आहेत.

३.२६ समारोप

सदर प्रकरणातून खानापुरी बोलीतील भाषिक नमुन्यांची मांडणी केलेली आहे. तसेच खानापुरी बोलीचे स्वरूप विशद केले आहे. खानापूर तालुका हा कन्नड व कोंकण भागाशी संबंध असलेला तालुका आहे. त्यामुळे या प्रदेशावर कन्नड, कोंकणी भाषेचा तसेच संस्कृतीचा प्रभाव असलेला दिसतो. गोवा व खानापूर हे शेजार प्रदेश असल्याने कोंकणी सोबत पोर्तुगीज भाषेचाही प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला आहे. येथील लोकांच्या बोलण्यातून हिंदी, फारशी, उर्दू शब्दही येतात. खानापुरी बोली ही बेळगावी व

चंदगडी बोलीच्या जवळ जाणारी असली तरी तिचे स्वत:चे असे वेगळेपण आहे. तसेच प्रत्येक शब्दावर आघात करून ही बोली बोलली जात असून या बोलीतून संयुक्त क्रियापदांचा वापर होतो. तसेच या प्रकरणातून खानापुरी बोलीचे व्याकरण मराठी व्याकरणापेक्षा कसे वेगळे आहे हे मांडण्यात आले आहे.

खानापूर तालुक्याच्या बोलीमध्ये आढणारे वाक्प्रचार, म्हणी, लोकगीते, उखाणे यांचा विचार केल्यास त्यातून संस्कृतीचे दर्शन दिसते. तसेच येथील लोकांचे आचार, विचार, सण - समारंभ, लग्नविधी, बारसे या सर्वांचे प्रतिबिंब खानापूरातील मौखिक साहित्यातून दिसून येते. खानापूर तालुक्यावर इतर प्रदेशाचा प्रभाव असल्याचेही या मौखिक साहित्यातून दिसून येते. गीतांतून येणारे कोंकणी शब्द किंवा एखादे कोंकणी गीत, तसेच गीतातून, बोलण्यातून येणारे कन्नड शब्द वरील मांडलेल्या विचाराचा दाखला देतात. कन्नड, कोंकणी सोबत हिंदी, उर्दू, फारशी शब्दांचा ही प्रभाव संकलित केलेल्या भाषिक नमुन्यातून दिसून येतो. संवादरूपी खानापुरी बोलीतील भाषिक नमुने मांडण्यात आली आहेत. त्यामध्ये खानापुरी बोलीचे विविध स्वरूप लक्षात येते. खानापुरी बोलीतील व्याकरणिक वैशिष्ट्ये देखील या प्रकरणात मांडलेले आहे. शेवटच्या अनुच्छेदात खानापुरी व प्रमाण मराठीचे नाते स्पष्ट करण्यात आले आहे.

३.२७ निष्कर्ष

१. खानापुरी बोलीतील प्रत्येक शब्दावर आघात करून बोलले जाते.

२. खानापुरी बोलीवर इंग्रजी, कोंकणी, कन्नड, पोर्तुगीज या भाषांचा प्रभाव दिसतो.

३. गावानुसार बोलीतील शब्दांमध्ये बदल होतो.

४. खानापुरी बोलीतील काही शब्द हे द्विअर्थाने समोर येतात.

५. खानापुरी बोलीतील लोकगीतांतून खानापूर तालुक्याची संस्कृती तसेच समाजजीवन दिसते.

६. खानापुरी लोकगीतांतून खानापूरच्या समाजजीवनातील विवाह, नातेसंबंध, सण-उत्सव, शेतीकाम आदींचे चित्रण येते.

७. खानापूर तालुक्याच्या अंतर्गत येणाऱ्या गावांनुसार गीतांमध्ये थोड्याफार प्रमाणात बदल झालेला दिसतो.

८. खानापुरी बोलीतील क्रियापदे ही संयुक्त क्रियापदे आहेत.

९. लिंग, वचनाच्या बाबतीत खानापुरी बोलीचे वैशिष्ट्य दिसून येते.

१०.शाळा, सरकारी कार्यालये अशा ठिकाणी खानापुरी बोलीसोबत प्रमाण मराठीचाही वापर केला जातो.

११.खानापुरी बोलीतील शब्दसंग्रह हा प्रमाण मराठीपेक्षा वेगळा आहे.

संदर्भ

---

[1] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली*. श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ५३.

[2] कांबळे, गुंडू यलप्पा. *चंदगडी परिसरातील बोलीभाषेचा वर्णनात्मक अभ्यास*. (प्रबंध) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१९, पृ. ५६.

[3] मांडे, प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप*. गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, सौ. वृशाली अविनाश मांडे १२३, साधना हौसिंग सोसायटी, प्रोफेसर चौक, सावेडी अहमदनगर, २०१७, पृ. २३२.

[4] काजरेकर, गोविंद, भोसले, वसंत, कामत, सतीश. *मालवणीतल्या वाटा (मालवणी बोली)*. सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स क्र. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर, २०१७, पृ. १२.

प्रकरण ४

खानापुरी बोलीची वैशिष्ट्ये

प्रास्ताविक.. 101

४.१ भाषिक नमुने...101

४.२ द्विअर्थाने येणारे शब्द..104

४. ३ वर्णप्रक्रिया 105

४.३.१ ‘व’ च्या ऐवजी ‘इ’ व ‘य’ 105

४.३.२ ‘ठ’ ऐवजी ‘ट’ 106

४.३.३ ‘ढ’ चा ‘ड’ 106

४.५ सर्वनाम 106

४.६ विशेषणे..107

४.७ क्रियापदे..107

४.८ क्रियाविशेषण अव्यय...108

४.९ शब्दयोगी अव्यय..109

४.१० उभयान्वयी अव्यये 109

४.११ केवलप्रयोगी अव्यय..109

४.१२ वचन / अनेकवचन 110

४.१३ खानापुरी बोलीतील लोकगीते..110

४.१४ म्हणी 110

४.१५ वाक्प्रचार 111

४.१६ शिवी 112

४.१७ अभ्यस्त शब्द 112

४.१८ कोडी / इमान 113

४.१९ उखाणे / नाव 113

४.२० खानापुरी बोलीवर बोली व भाषांचा प्रभाव..114

४.२०.१ खानापुरी बोली व बेळगावी बोली.. 114

४.२०.२ खानापुरी बोली व कोंकणी भाषा... 115

४.२०.३ खानापुरी बोली व कन्नड भाषा.. 116

४.२०.४ खानापुरी बोली व हिंदी भाषा 117

४.२०.५ खानापुरी बोलीतील इंग्रजी शब्द 117

४.२५ समारोप...118

४.२६ निष्कर्ष..118

संदर्भ 119

प्रकरण ४

खानापुरी बोलीची वैशिष्ट्ये

प्रास्ताविक

कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यात येणाऱ्या खानापूर तालुक्याची बोली म्हणजेच ‘खानापुरी बोली’ होय. कोल्हापुरी, मालवणी, अहिराणी या बोलीप्रमाणेच ‘खानापुरी बोली’ ही वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे. विशिष्ट हेल काढून व शब्दांवर आघात करून ही बोली बोलली जाते. हे आत्तापर्यंतच्या विवेचनाद्वारे स्पष्ट झाले आहे. या बोलीवर कन्नड तसेच कोंकणीचा प्रभाव जास्त असल्याचे आढळून येते.

सदर प्रकरणात खानापुरी बोलीची वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यात येणार आहेत. मागील प्रकरणात खानापुरी बोलीतील भाषिक नमुने मांडण्यात आली होती. या प्रकरणात भाषिक नमुन्यांच्या आधारे खानापुरी बोलीची वैशिष्ट्ये मांडण्यात येणार आहेत. मराठी भाषेच्या व्याकरणाप्रमाणे खानापुरी बोलीचे व्याकरण या प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न आहे. तद्वत मौखिक साहित्याचेही विश्लेषण सदर प्रकरणात होईल. तसेच खानापुरी बोलीची इतर बोली व भाषांशी तुलना सदर प्रकरणात केली जाणार आहे. बोलीचे लिखित रुपापेक्षा मौखिक रूपालाच महत्त्व असते. त्यामुळे खानापुरी बोलीतही तिच्या मौखिक रूपालाच प्राधान्य देण्यात आले आहे.

४.१ भाषिक नमुने

मागील प्रकरणात संवादाच्या रूपाने खानापुरी बोलीतील भाषिक नमुने मांडण्यात आले होते. सदर प्रकरणात भाषिक नमुन्यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे. खानापुरी बोलीतील शब्दांचे अर्थ मांडताना प्रमाण भाषेचा आधार घेतलेला आहे.

- **कितेरीन कायतान डिसोझा (मासेवली)**

आमची कोकणी जाय.

सांगोकली कल सून.

आमी आईक माय म्हनता, कोण मम्मी म्हनता, पप्पाक पप्पा म्हनता, बाबा म्हनता, कोण आज्जा म्हनता, दिराक भाऊ, भाऊजी म्हनता. अशे

आमी खानापूरात पैलापासून हाय...

गोव्यात कोकनी वडून उलयता त्यानी. आमची भाषा फरक पडता (मराठी टोन)

वयनीक व्हन्नी म्हनता आमी. धाकटा भाऊ असला तर नावान बोलूतो.

झिग्यांचा धंदा आमची म्हातारी करताली पयला. मागीर आता हाव करता. आता माज्या फाटल्यान (फ चा उच्चार मराठीत) सून केली तर. नाय तर मग आनी बंदच. आमी बेळगावच्यान झिंगे हानतो. दरोज ना. म्हयन्यान एकदा हाडतो. मागीर ते म्हयन्यान हांडल्यार बरे दंवरुंग जाय ते. बांगडे बी अशे बरे दंवरुंग जाय. नाय तर किडे पडतात. पानी गेले का ना सडसडीत रवता ते. प्याकबंद दवरलेले किडे पडतात.

(प्याकबंद हा शब्द अनेक लोकं बोलताना वापरतात.)

गोव्यात माझा भाव हाय. वास्कोन. भयीन हयाका आसता बोरी पूलार.

मी चालतच जातो नी. सोडून यत्यात (त वर जोर) खेड्यातनी. चालतच येता. खानापूरात हावंच हिंडता. आदी त्यांच्याकडेच जाऊन यलो नी काल मी. झिंगे दुन यलो बांगडे दुन यलो त्यासनी. तुमची आज्जी बी घेत होत्ती ती माजेडे. पयलीच्यान आमी घाडी गल्ली, गुरव गल्ली जायी.

तशे करूंचे नू बाबा (लहान मुलाला उद्देशून)

वच त्याका सोडून यो पय.

शब्दार्थ

सांगोकली - सांगत होती, कल - काल, म्हनता -म्हणतात, माजेडे - माझ्याकडे, पैलापासून - अगोदर पासून,

वडून – ओढून, झिंगे- सुकी कोळंबी, जायी – जात होतो.

वरील भाषिक नमूना हा खानापूरातील ख्रिस्ती समाजातील आहे. त्यांच्या बोलण्यातून कोंकणी सोबत मराठी शब्द देखील येतात. बाबा, भाऊजी, पैलापासून, म्हातारी असे शब्द त्याच्या बोलण्यातून येतात. तसेच ‘कल’, ‘आज्जा’ या शब्दांवरून हिंदी व कानडी भाषेचा प्रभाव वरील संवादातून दिसून येतो. तद्वत त्यांच्या बोलण्यातून आलेला ‘व्हन्नी’ हा शब्द देखील कानडी भाषेसंबंधी पुरावा दर्शवितो. या समाजातील माणसे बाहेर लोकांशी संवाद साधताना खानापुरी बोलीचा वापर करतात. तर घरात बोलताना मराठी मिश्रित कोंकणी भाषा बोलतात.

ही भाषा बोलताना विशिष्ट हेल काढून ती बोलली जाते. जरी मराठी मिश्रित कोंकणी भाषा बोलत असले तरी त्यांच्या बोलण्यातून बरेचशे शब्द हे खानापुरी बोलीतील आहेत. तसेच पुल्लिंगी क्रियापदांचा वापर त्यांच्या संवादातून दिसून येतो. बोलताना काहीवेळा वाक्याचा क्रम हलताना दिसतो. सुरुवातीला क्रियापद येऊन नंतर कर्ता, कर्म येते. उदा- *"सांगोकली कल सून", "बरे दंवरुंग जाय ते", "त्यांच्याकडेच जाऊन यलो नी काल मी".*

- **यशोदा बाबुराव गुरव (गृहिणी)**

*गाडीत कसा काय साप यला **खरं**. **बाई!** तिच्या हातावरच बसलाय तो. काळाकुट्ट हाय गे बाई ! अंगास काटा यवूलाय बगुन.*

दुकनाय गे हे करतानं?

*जरा जरा दुकताय. ही येल. येल म्हनून काडत्यात ग ती. हे मदलं काय ते फूल काडल्यान ते काय बरोबर काडूनाय. असं ते रांगोळी घालनात तीsss आनी नाव बी लून घेटलो. काडूसू न्हाय त्या **बावान** बरोबर...*

*ती भाकरी खाऊलेश्याल. आत्त माज यन्नाय ग. खरंच! आत्त कद्दी कायकी म्हटलो. व्हय लग्नात म्हनते **डबरा.***

*मानं आटवन येते **आग लागो.***

कायकी म्हनत्यात नी तसलं शास्तिर

तन्न बारकी असतानं बग काटवटीवर तेवडं..

आंगटी टाकल्यान ! गावली का न्हाय. गावली नी. फुलं काडूस गेल्ला. फुल्ल काडून ठेवतानं आंगटी बी काडून ठेवल्यान ती त्यास कळोनाय. मानं खट्टे गावली? कपाटात व्हत्ती नी. त्यानं लुनाय आंगटी!

शब्दार्थ

खरं – पण, यवूलाय – येत आहे, येल – वेल, गावली- सापडली, लुन- लिहून, काडूस न्हाय- काढले नाही, मानं- मग, व्हत्ती नी- होती की, खट्टे- कुठे, बारकी- लहान, तेवडं – तेवढं, आटवन – आठवण, कायकी – काहीतरी, लुनाय – घातली नाही.

वरील संवादातून खानापुरी बोलीचे स्वरूप लक्षात येते. शब्दांवर आघात करून ही बोली बोलली जाते. वरील संवादात आलेला 'खरं' हा शब्द 'पण' या अर्थाने आलेला आहे. तसेच 'बाई!', 'खरंच!' या केवलप्रयोगाचा वापर करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर 'बावा' ही शिवी देखील उत्स्फूर्तरित्या या संवादातून आलेली आहे. तसेच 'डबरा', 'आग लागो' ही देखील शिवी आहे. तसेच पुल्लिंगी क्रियापदाचा व संयुक्त क्रियापदाचा वापरही झालेला पहावयास मिळतो. खानापूर तालुक्याच्या लोकांच्या बोलण्यातून *'कायकी म्हनत्यात नी तसलं शास्तिर' हे वाक्य वारंवार ऐकवायस मिळते.* तसेच 'शास्तिर' या शब्दावरून उच्चार सुलभता दिसून येते. 'शास्त्र'च्या ऐवजी 'शास्तिर' हा शब्द वापरण्यात आलेला आहे.

वरील भाषिक नमुन्यामध्ये आलेला 'लुन' आणि लुनाय' हे दोन्ही शब्द एकसारखेच वाटत असले तरी दोन्ही शब्दांचे अर्थ हे भिन्न आहेत. 'लुन' हा शब्द लेखनाच्या अर्थाने आलेला आहे. तर 'लुनाय' हा शब्द एखादी वस्तु परिधान केली नाही या अर्थाने येतो. तसेच समोरच्याला प्रश्न विचारताना एका विशिष्ट सुरावटीतून विचारला जातो.

उदाहरणार्थ – *थंड झालंsss*

वरील उदाहरणामध्ये प्रश्न विचारताना प्रश्न चिन्ह वापरलेले नाही. कारण 'झालं' या शब्दातील 'लं' या ध्वनीचा उच्चार सुरवटीत केला जातो. 'ल' मधील 'अ' जाणवेल इतका स्पष्ट आणि दीर्घ उच्चार केला जातो. त्यामुळे सहजच त्या वाक्यातून प्रश्नार्थकता निर्माण होते.

४.२ द्विअर्थाने येणारे शब्द

या बोलीतील अनेक शब्द हे द्विअर्थाने समोर येतात. एकाच शब्दाचे दोन अर्थ असल्याने प्रसंगानुसार त्या शब्दांचा अर्थ बदलतो. 'खरं' हा शब्द खानापुरी बोलीत दोन अर्थाने वापरतात. 'पण' आणि 'सत्यता' दर्शविण्यासाठी 'खरं' हा एकच शब्द वापरला जातो. तसेच 'पण' या अर्थाने येताना 'खरं' हा शब्द विशिष्ट सुरावटीतून येतो. 'खरं' मधील 'रं' हा ध्वनी ओढला जातो. *उदाहरणार्थ – काय करतीस बग, खरंsss ते करूसच पाजे.*

उदाहरणार्थ – *१. खरंsss माज ब हे म्हाईत न्हाय. – पण*
२. खरंच तो यताय आज. – सत्यता

तसेच **'हात'** हा शब्द शरीराचा अवयव व 'आहेत' या अर्थाने या बोलीत वापरला जातो.

उदाहरणार्थ- *१. हात दुक्कोलाय गे माजा! (माझा हात दुखतोय.)*
२. हात ब घरात. (घरात आहेत बघ.)

'इसवान' हा शब्द या बोलीत मांसाहार व गरम पाण्यात घालण्यात येणाऱ्या थंड पाण्यासाठी वापरला जातो.

उदाहरणार्थ- *१. इसवानाचं जरा आयदान दे. (मांसाहार)*
२. ह्यात जरा इसवान घाल. (थंड पाणी)

असे अनेक वैशिष्ट्यपूर्ण द्विअर्थी शब्द खानापुरी बोलीत आढळतात.

४. ३ वर्णप्रक्रिया

खानापुरी बोलीतील वर्णप्रक्रिया ही मराठी भाषेतील वर्णप्रक्रियेपेक्षा वेगळी आहे. खानापुरी बोलीची स्वतःची अशी स्वतंत्र व्याकरण व्यवस्था आहे. त्यामुळे ही बोली इतर मराठी बोलींपेक्षा वेगळी ठरते.

४.३.१ 'व' च्या ऐवजी 'इ' व 'य'

खानापुरी बोलीमध्ये 'व' या अक्षरापासून सुरू होणाऱ्या शब्दांचा उच्चार 'इ' किंवा 'य' ने करतात. जसे-

व च्या ऐवजी इ	व च्या ऐवजी य
विमल - इमल	वेणी - येनी
विट - इट	वेळ – येळ
विश्वास - इश्र्वास	वेसण- येशीन
विळी – इळगी	वेगळ – येगळ
विंचू - इंचू	वेडा -येडा

तक्ता क्रमांक ४.१ 'व' ऐवजी 'इ' व 'य' येणारे शब्द

वरील उदाहरणावरून असे नमूद करता येते की विशेषता 'वि' व 'वे' या अक्षरापासून सुरू होणाऱ्या शब्दांचे रूप बदलून या बोलीत वापरले जाते. 'व' पासून सुरू होणारे शब्द मात्र जसेच्या तसे उच्चारले जातात. जसे- वड, वर्षा, वही, वकील, वनात आदी.

४.३.२ 'ठ' ऐवजी 'ट'

खानापुरी बोलीमध्ये 'ठ'चा उच्चार स्पष्टपणे केला जात नाही. त्यासाठी 'ठ' च्या ऐवजी 'ट' असा उच्चार या बोलीत केला जातो.

काठी – काटी	कुठे – खटे
उठायला – उटोस	मुठभर - मुटभर

तक्ता क्रमांक ४.२ 'ठ' ऐवजी 'ट' येणारे शब्द

४.३.३ 'ढ' चा 'ड'

खानापुरी बोलीत येणारा 'ढ' उच्चार 'ड' असा केला जातो.

दाढ - दाड	मढं - मडं
वाढ - वाड	काढ – काड

तक्ता क्रमांक ४.३ 'ढ' ऐवजी 'ड' येणारे शब्द

वरील नमुन्यांवरून असे स्पष्ट होते की खानापुरी बोलीत येणाऱ्या महाप्राण शब्दांचा उच्चार हा अल्पप्राणातून केला जातो.

४.५ सर्वनाम

खानापुरी बोलीमध्ये मिया, तिया, तुमी, आमी, तुमास्नी, आमास्नी, त्यास्नी, ह्यास्नी, ह्यास, त्यास, हो, हे, ही अशी सर्वनामे वापरली जातात. मी, तू या सर्वनामाकरिता 'मिया', 'तिया' ही सर्वनामे वापरली जातात. तुम्ही, आम्ही यासाठी तुमी, आमी असे कोंकणी भाषेकडे वळणाऱ्या सर्वनामांचा उपयोग खानापुरी बोलीत केला जातो. तसेच 'तुमास्नी' (तुम्हाला), 'आमास्नी' (आम्हाला), 'त्यास्नी' (त्यांना), 'ह्यास्नी' (यांना), 'ह्यास' (याला), 'त्यास' (त्याला) 'हो' (हा) अशी सर्वनामे या बोलीत वापरली जातात. मात्र मराठी भाषेतील 'ही', 'हे' ही सर्वनामे खानापुरी बोलीतही समान रूपाने येतात. प्रश्नार्थक सर्वनामांचा विचार करता असे दिसून येते की 'काय' हे एकमात्र सर्वनाम खानापुरी बोलीत जशास तसे वापरले जाते. तर 'कोन'/ 'खलं' (कोण), 'कशास' (कशाला), 'खल्यान' (कोणी), 'कुनास' / 'खल्यास' (कुणाला), 'खई' (कुठे) ही सर्वनामे रूप बदलून खानापुरी बोलीत येतात.

उदाहरणार्थ- *१. आत्त आनी **खलं** यलं? (आता आणि कोण आलं?)*

२. ***आमास्नी*** *काय म्हाईत न्हाय ते. (ते आम्हाला काही माहीत नाही.)*
३. ***हो*** *बग यला. (हा बघ आला.)*

४.६ विशेषणे

खानापुरी बोलीतून येणारी विशेषणे ही लोकसमाजाच्या जीवनशैलीशी निगडीत असलेली पहावयास मिळतात.[1] बहुतांशी रंगवाचक, रुपवाचक विशेषणे वापरली जातात. *काळाकुट्ट, हळदुळा / हळदुजरद, पांढराखड, हिरवाचार, तांबडालाल, वल्ला (ओला), वल्लाकिच्च (ओलाचिंब), सोमाळं (कोमट) दाटधम्मक (दाट), खरबोडा (डेंडरफ), आरगाडा (मध्यम), डावरा (डावा), आरमुट (उद्धट), घारा (घारे डोळे असलेला), गिड्डा (कमी उंचीचा), लांबेला (लांब), सक्कळच्यान / उजवाडल्यास्नं (सकाळपासून), घानगंदीर (खूप घाण),*

उदाहरणार्थ -
१. आगेगे! लई ***आंबटकोड*** *हाय आंबा.*
२. पानी ***सोमाळं*** *हाय. (कोमट)*
३. ***उजवाडल्यास्नं*** *वाट बगुलोय तुमची. (सकाळपासून)*

कुबट (कोंदट), तिकभगजाळ (तिखट), कडूकिच्च (अतिशय कडू), आंबटकोड (फार आंबट) आदी वैशिष्ट्यपूर्ण विशेषणे या बोलीत येतात.

४.७ क्रियापदे

खानापुरी बोलीत येणारी क्रियापदे ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मराठी भाषेतील क्रियापदांपेक्षा खानापुरी बोलीतील क्रियापदे ही पूर्णपणे वेगळी आहेत. या बोलीत संयुक्त क्रियापदे आढळतात. तसेच स्त्रियांच्या तोंडून पुल्लिंगी क्रियापदे येतात. हे या बोलीचे एक वैशिष्ट्य म्हणता येते.

१. मिया जाऊलोय गे.	३. ते मिया बगतो.
२. मिया करतो.	४. मिया देतो.

तक्ता क्रमांक ४.४ खानापुरी बोलीतील क्रियापदे

वरील भाषिक नमुने हे स्त्रियांच्या तोंडून येणारे पुल्लिंगी क्रियापदाचे आहेत.

संयुक्त क्रियापदामध्ये मराठी भाषेत दोन क्रियापदांचा वापर करून वाक्य पूर्ण केले जाते, तर खानापुरी बोलीमध्ये एकाच क्रियापदातून वाक्य पूर्ण होते. *उदाहरणार्थ- 'मिया टेबलावर डबा ठेवलोय.'*

१. जाऊलोय -जात आहे	४. करुलोय- करत आहे
२. यऊलोय- येत आहे	५. यवा नी- या की
३. बगुलाय- बघत आहे	

तक्ता क्रमांक ४.५ खानापुरी बोलीतील संयुक्त क्रियापदे

(मी टेबलवर डबा ठेवला आहे.) 'ठेवलोय' या एकाच क्रियापदातून मराठीतील 'ठेवला आहे' हा अर्थ व्यक्त होतो.

तर काही वेळा एकच क्रियापद दोन प्रकारे उच्चारले जाते. 'ते **खात्यात** घे' किंवा 'ते **खात्याताय** घे'. व्यक्तीनुरूप हा बदल खानापुरी बोलीत आढळतो. तसेच 'हात' (आहेत), 'हाईत' (आहेत), 'व्हत्यात'(होतात), 'व्हताय'(होतंय), 'हानत्यात' (आणतात), 'व्हनार' (होणार) अशा प्रकारची क्रियापदे ही खानापुरी बोलीतून येतात. तसेच अनेक वेळा पुरुष आणि स्त्रीसाठी एकसारखेच क्रियापद वापरले जाते. प्रमाण मराठीमध्ये पुरुषासाठी 'तू आलास?' व स्त्रिसाठी 'तू आलीस?' अशाप्रकारे 'आलास?' व 'आलीस?' असे क्रियापद वापरले जाते. परंतु खानापुरी बोलीमध्ये **'यलीस'** हे एकच क्रियापद दोन्ही लिंगासाठी वापरले जाते. 'यलीस' हा शब्द उच्चारताना 'ली' या ध्वनीवर जोर देऊन तो सुरावटीत उच्चारला जातो.

अनेक वेळा क्रियापदानंतर 'घे', 'नी' या शब्दांची जोड या बोलीत पहावयास मिळते. उदाहरणार्थ – 'जाऊन यलो नी', 'ऱ्हाताय घे.'

४.८ क्रियाविशेषण अव्यय

खानापुरी बोलीत क्रियाविशेषण अव्यय हे मराठी भाषेपेक्षा वेगळे आहे. या बोलीमध्ये 'कन्न', 'जन्न', 'खटे', 'कन्नबी', 'हित्ते', 'जिकडी' अशाप्रकारे येतात. क्रियाविशेषणात येणाऱ्या शब्दांवर कोंकणी भाषेचा प्रभाव दिसून येतो.

खानापुरी बोलीतून येणारे वाक्य हे मराठीतील व्याकरण व्यवस्थेच्या विरुद्ध जाणारे आहे. कर्ता, कर्म, क्रियापद या नियमाने या बोलीतील वाक्यरचना येत नाही. या बोलीत काहीवेळा क्रियापद सुरुवातीला येते तर काहीवेळा कर्म सुरुवातीला येते. *उदाहरणार्थ – 'यन्नाय घे ते' (ती येणार नाही.), 'कामास जाऊलोय मिया' (मी कामला जात आहे.)* अशाप्रकारची वाक्यरचना खानापुरी बोलीत पहावयास मिळते.

४.९ शब्दयोगी अव्यय

खानापुरी बोलीत भिन्न व स्वतंत्र असे शब्दयोगी अव्यय आहेत. *उदाहरणार्थ – कन्नस्न (कधी पासून), खुर्चीबुडी (खुर्चीखाली), तो पतोर (तो पर्यंत), घराडे (घराकडे), सक्काळच्यान (सकाळपासून), बाबाक्न (बाबासोबत)* आदी शब्दयोगी अव्यये खानापुरी बोलीतून येतात.

४.१० उभयान्वयी अव्यये

मराठी भाषेप्रमाणेच खानापुरी बोलीतील दोन किंवा अधिक शब्दांना जोडण्यासाठी भिन्न स्वरूपाची उभयान्वयी अव्यये आहेत. *आनी (आणि), किंवा (न्हायतर), खरं (पण) आदी* उभयान्वयी अव्यये खानापुरी बोलीतून येतात.

उदाहरणार्थ – १. मी कामाला गाडी **किंवा** बसने जातो. (प्रमाण मराठी)
२. मिया कामास गाडी **न्हायतर** बशीन जातो. (खानापुरी बोली)

४.११ केवलप्रयोगी अव्यय

मराठी भाषेतील व्याकरणाप्रमाणे खानापुरी बोलीचे ही व्याकरण आहे. अबब!, अगं बाई! अशी केवलप्रयोगी अव्यये मराठी भाषेत पहावयास मिळतात. अशाच प्रकारची केवलप्रयोगी अव्यये खानापूरी बोलीतही आढळतात.

आत्त काय सांगो !	आगे बाय !
हात्त तिच्यामारी !	बायल्यान्हून !
अय्यो!	हाबग !
आव्वा!	आरे तिच्या न्हून !
अय्यो गा !	अय्यो देवा

तक्ता क्रमांक ४.६ केवलप्रयोगी अव्यय

वरील नमूद केलेल्या केवलप्रयोगी अव्ययांवर कानडी व कोंकणी भाषेचा प्रभाव दिसून येतो. त्यापैकी “आत्त काय सांगो!”, “अव्वा!” व “आरे तिच्या न्हून!”, “आगेगे!” ही वाक्ये स्त्रियांच्या तोंडून वारंवार येत असतात. तर पुरुषांच्या तोंडून “हात्त तिच्यामारी!”, “बायल्यान्हून!” ही वाक्ये वारंवार येतात.

४.१२ वचन / अनेकवचन

खानापुरी बोलीतील वचन विचार हा वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठीतील वचन विचार हा खानापुरी बोलीतील वचन विचारपेक्षा वेगळा आहे. *उदाहरणार्थ- मराठीमध्ये 'केस' याचे अनेकवचन हे 'केस'च असते. तर खानापुरी बोलीमध्ये केस न म्हणता **'क्यास'** असे उच्चारले जाते व **'केसं'** हे त्याचे अनेकवचनी रूप होय.*

१. ग्लास - गलासं/ गल्सं	४. कोंबडी- कोंबडीया
२. बशी - बशीया	५. सांडगा - सांडगे
३. पेला - पेले	६. बस - बशीया
४. तांबिया - तांबिये	

तक्ता क्रमांक ४.७ खानापुरी बोलीतील क्रियापदे

गावांनुसार काही अनेकवचनांच्या रुपाचे उच्चारण बदलते. जसे 'ग्लास' याचे अनेकवचन होताना काही गावांमध्ये **'गलासं'** तर काही ठिकाणी **'गल्सं'** असे उच्चारले जाते.

४.१३ खानापुरी बोलीतील लोकगीते

खानापूर तालुक्यात विविध सण, समारंभामध्ये गीते गायली जातात. ही गीते मागील प्रकरणात मांडलेली आहेत. या गीतांमध्ये खानापूर तालुक्यातील संस्कृती, परंपरा, दैनंदिन जीवनातील गोष्टी येतात. तसेच काही गीते श्रम परिहारासाठी गायली जातात. लहान मुले खेळताना गीतांचा वापर करतात. या गीतांतून खानापुरी बोलीचे स्वरूप लक्षात येते. काही समारंभात कन्नड तर काही समारंभात कोंकणी गीत गायले जाते. या गीतांमधून जास्त प्रमाणात खानापुरी व मराठी भाषेचे मिश्रण दिसून येते. तसेच या गीतांमधून कन्नड व कोंकणी भाषेतील शब्दही आलेले दिसून येतात. या गीतांमध्ये जरी प्रमाण भाषेतील शब्द आले असले तरी त्यांचा उच्चार हा खानापुरी बोलीप्रमाणेच होतो.

४.१४ म्हणी

इतर बोलींप्रमाणे खानापुरी बोलीतही वैशिष्ट्यपूर्ण म्हणी आढळतात. दैनंदिन व्यवहारात येथील लोक म्हणींचा उल्लेख करतात. या बोलीत अनेक प्रकारच्या म्हणी सापडतात. या म्हणींतून खानापूर तालुक्यातील लोकसमूहाची मानसिकता, संस्कृतीचा परिचय होतो. तसेच नाती, कृषिसंस्कृती, निसर्ग,

समाज असे विविध घटक या म्हणीतून येतात. या प्रकरणात मोजक्याच म्हणींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामध्ये -

१. काम न्हाय काडीच फुरसत नाय घडीची.
२. आवाचं तर एक आनी गावाचं तर एक.
३. कशात न्हाय काय आनी फाटक्यात पाय.
४. हातात न्हाय दमडी आनी गावभर धुंबडी.
५. बायीस लालय कोंड्याचं आनी लेकिस लालय मिंडाचं.
६. गेल्ला वन्नीची आग विजूस.
७. आळशियास दोन कामं कष्टीयास एक बी न्हाय.
८. म्हार बसला सकळी दोनी खळी चुकली.

वरील नमूद केलेल्या म्हणी दैनंदिन व्यवहारात वापरल्या जातात. या म्हणींचा उल्लेख करताना सुरुवातीला "कायकी म्हणत्यात नी ते" असे म्हणून पुढे 'म्हण' म्हटली जाते व त्यानंतर "तसली खबर हाय याची" असे म्हणून वाक्य पूर्ण केले जाते.

उदाहरणार्थ- 'कायकी म्हणत्यात नी ते ***हातात न्हाय दमडी आनी गावभर धुंबडी*** *तसली खबर हाय याची.'*

४.१५ वाक्प्रचार

जगभरातील साऱ्याच भाषा आणि बोलीतून वाक्प्रचारांचे प्राबल्य असलेले दिसून येते. या अर्थाने वाक्प्रचार हे भाषेचे महत्त्वपूर्ण अंग होय.[2] खानापुरी बोलीतून येणारे वाक्प्रचार हे राग, तिरस्कार, चिंता, उपहास आदी भावना व्यक्त करतात. खालील निवडक वाक्प्रचारांचा आणि त्यांना अर्थ पहावयास मिळतो.

१. वसकन अंगावर येणे - चिडणे
२. आंगलट येणे - केलेले काम स्वतःवरच परतणे
३. साडेसाती लागणे - संकट येणे

४. हागली मुतली गोष्ट - बारीक सारीक गोष्ट

५. गांडीस डोका लाऊन पळे - काम सोडून पळून जाणे

असे अनेक वाक्प्रचार बोलीतील वैशिष्ट्य अधोरेखित करतात. या बोलीतील वाक्प्रचारांमध्ये लैंगिकतेचा वापर होताना दिसतो.

४.१६ शिवी

खानापूर तालुक्यातील लोकांच्या दैनंदिन व्यवहारातून शिव्यांचा वापर अधिक प्रमाणात होत असतो. स्त्री, पुरुष तसेच लहान मुलांच्या देखील बोलण्यातून शिव्यांचा वापर होतो. या बोलीत येणाऱ्या काही शिव्या ह्या जाती-धर्मानुसार आलेल्या आहेत. *जसे- बाटगा, मुसल्या, जोकमार, डोंबारी, भंगी, हजामा* आदी.

वरील नमूद केलेली नावे ही विशिष्ट जाती व धर्माची आहेत. परंतु खानापुरी बोलीमध्ये या नावांचा उल्लेख शिवीकरिता केला जातो.

'बावा' ही शिवी हमखास स्त्रियांच्या तोंडून ऐकवयास मिळते. तसेच 'याच्या चालीस लागो आग', 'डोबरा भरो', 'रांड', कंबर मोडली का काय', 'बोडकी' आदी शिव्या स्त्रियांच्या तोंडून येतात. पुरुषांच्या तोंडून रांगडी शिव्या येतात. 'फुकनी, छिनाल', 'रांड, 'उडापी', 'खज्जाळी', 'बायले झवाऱ्या' आदी अश्लीलतेकडे वळणाऱ्या शिव्या पुरुषांच्या तोंडून येतात.

४.१७ अभ्यस्त शब्द

खानापुरी बोलीमध्ये दैनंदिन व्यवहारामध्ये अभ्यस्त शब्दांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. टारटार, धाधा, गाडगीबिडगी, भाजीबिजी, कन्नबिन्न, टनाटन, झाडूबिडू, काकनबिकनं, खातलं - बितलं, आक्कलबिक्कल, झिंगे-बिंगे, हिकडी - बिकडी, पावने - बिवने, गाव्याल - बिव्याल आदी अभ्यस्त शब्दांचा वापर केला जातो. तसेच या बोलीत 'सुद्धा' च्या ऐवजी 'बी' हा शब्द येतो.

उदाहरणार्थ –

१. चा बी घून य.
२. निवेद बी पाजे?
३. लाईट बी न्हाय बग.
४. ते बी यताय म्हनी.

५. *भुट्टी बी हान म्हटलो त्यास.*

वरील उदाहरणे पाहता गोमंतकीय कोंकणीचा प्रभाव प्रकर्षाने दिसून येतो.

४.१८ कोडी / इमान

खानापुरी बोलीत कोड्यांना ‘इमान’ म्हटले जाते. तसेच इमान या शब्दाचा ‘विमान’ असा आणखीन एक अर्थ या बोलीत होतो. मराठी भाषेप्रमाणे खानापुरी बोलीत देखील ‘कोडी’ आहेत. ही कोडी बहुतांशी स्त्रियांच्या तोंडून ऐकवायस मिळतात. शेतात काम करत असताना स्त्रिया एकमेकींना कोडी घालून आपले मनोरंजन करत असतात.

१. गिड्डीस मारल्या घरभर पोरं – लसूण
२. चिमनी मालू काम चालू - घुशी उंदीर
३. तुरतुर जाई टक्कीस कव्वाट घाली - करांदा
४. काळी गाय काटे खाय पानियास बगून उबे ऱ्हाय - चप्पल
५. साता समुद्रा पलीकडे सीतेने सारवली जमीन सुकता काई सुकत नाई - जीभ

वरील कोड्यांमधून प्रमाण बोलीचा तसेच कानडी भाषेचा ही प्रभाव दिसून येतो. तसेच माणसाच्या जीवनातील संस्कृती, परंपरा, निसर्गा विषयीचे ज्ञान या कोड्यांच्या माध्यमातून समोर येते. या कोड्यांच्या सहाय्याने खानापुरी बोलीचे स्वरूप तपासता येते. तसेच या बोलीतील असलेल्या संचित ज्ञानाचीही ओळख होते.

४.१९ उखाणे / नाव

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये लग्नसमारंभात नाव घेण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. खानापुरी बोलीत कधीच ‘उखाणे घे’ असे न म्हणता ‘नाव घे गे’ असे म्हटले जाते. खानापुरी बोलीतील उखाण्यातून सण-उत्सव, कृषिसंस्कृती, निसर्ग आदींचे दर्शन घडते.

१. कनकन कुदळी मनमन माती, तई तगाची; मिशी वागाची. लेक कुनाची; आईबापाची. सून कुनाची; सासू मायाची. रानी कुनाची; भर्तारची. भर्तार! भर्तार! म्हटलं कुनी; आश्शी हाट्टी कुनासाठी. भेन आली भावासाठी. भेनीनं हांडलीन जरीकाटी, जरीकाटीचा भरला बाजार, बाजारातंनं हांडले तीन हजार, तीन हजाराची पानं, नंदेच्या घरास जानं, नंदेचं बाळ तानं, तितनं जानं पुन्यास, पुन्यासनं

हानली आपुची डबी, आपूच्या डबीचा पिका पिका रंग; ___रावांचे नाव घेतो सर्व लोक झाली दंग.

२. तळ्याच्या पळीवर हातरली डाळी
त्याचेर बसली न्हवरा न्हवरी
नवऱ्याच्या भेनी रांदपिनी
बडान भरताय बाई बडान कशाचं
पोळी पिट्टाच लाटनं भैरीच
भात साळीच वरान डाळीचं
आयल्या माळा पयल्या माळा
पाटलाच्या लेकी
आर पाला डर पाला पानियाची पट्टी नाड्याची हट्टी हे नाव शोबे --- रावासाठी.

३. हिरवा शालू नेसून पाहिला आरशात_____च नाव घेतो _______च्या बारशात.

४. चार दिले बैलाला पाच दिले झुलाला यवडं सईन कुनाला ___च्या गुनाला.

खानापुरी उखाण्यांवर प्रमाण बोली, कोंकणी व कन्नड भाषेचा प्रभाव दिसून येतो. तसेच काळानुसार उखाण्यांचे बदलते स्वरूपही दिसून येते. त्याचप्रमाणे एकूण खानापुरी बोलीचे स्वरूपही या उखाण्यांद्वारे समोर येते.

४.२० खानापुरी बोलीवर बोली व भाषांचा प्रभाव

समाजामध्ये अनेक संस्कृती, एकत्र आल्याने एकमेकांची भाषा स्वीकारणे ही प्रक्रिया सतत चालत असते. वेगवेगळ्या निमित्ताने दोन भाषिक एकत्र आले की भाषेची आदानप्रदान प्रक्रिया सुरू होते. या प्रक्रियेतून एकमेकांचे शब्द स्वीकारून स्व भाषेत बोलण्याचा प्रयत्न केला जातो.[3] खानापुरी बोलीवर कन्नड, कोंकणी, हिंदी, पोर्तुगीज आदी भाषांचा पडलेला दिसून येतो. सदर प्रकरणात खानापुरी बोली व इतर भाषांशी तुलना करण्यात येणार आहे.

४.२०.१ खानापुरी बोली व बेळगावी बोली

मागे नमूद केल्याप्रमाणे खानापुरी बोली व बेळगावी बोली ही जवळपास सारखीच आहे. परंतु थोड्याफार फरकाने व्याकरणिक दृष्ट्या खानापुरी बोली ही वेगळी ठरते. सांस्कृतिक व सामाजिक दृष्टीने खानापूर व बेळगाव हे समप्रमाणात आहे. दोन्ही बोली हेल काढून बोलल्या जातात.

खानापुरी बोली	बेळगावी बोली	मराठी भाषा
कन्न	कव्वा	केव्हा
यलो	आलाव	आलो
गेलो	गेलाव	गेलो
भूत्तुर	भूत्तुर	आत
करुलीस	करूल्यास	करत आहे
भाय	भाव	विहीर
निंबार	लिंबार	ऊन
व्हगाडलं	व्हगाडलं	हरवलं

तक्ता क्रमांक ४.८ खानापुरी बोली व बेळगावी बोली

४.२०.२ खानापुरी बोली व कोंकणी भाषा

गोवा हा खानापूर तालुक्याचा शेजार प्रदेश असल्याने तसेच रोटी-बेटी व्यवहारामुळे इतर भाषेप्रमाणेच कोंकणी भाषेचाही प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला दिसून येतो. खानापुरी बोलीमध्ये अनेक शब्द हे कोंकणी भाषेतील आहेत. तर काही खानापुरी बोलीतील शब्द हे कोंकणी भाषेशी मिळते जुळते आहेत.

*उदाहरणार्थ – खानापुरी बोलीमध्ये पायाला **'डोका'** असा शब्द आहे तेच कोंकणी भाषेमध्ये **'दोको'** असा शब्द आहे. तर **पेला, बशी, जराळ, फटिंग** हे शब्द जसेच्या तसे खानापुरी बोलीमध्ये वापरले जातात. रोटी-बेटी व्यवहारमुळे **'सुंगटं', 'तिसऱ्या', 'निरफणस'** आदी नावे पदार्थांसोबत खानापुरी बोली व संस्कृतीने स्वीकारलेली आहेत.*

तसेच खानापुरी बोलीमध्ये स्त्री व वयाने मोठ्या असलेल्या मुलींसाठी 'गे' हा शब्द वापरला जातो. त्याचप्रमाणे कोंकणी भाषेतही स्त्रियांसाठी 'गे' हा शब्द वापरतात.

उदाहरणार्थ - १. हिकडी य गे नी. (खानापुरी बोली)
२. हांगा यो गे. (कोंकणी भाषा)

दैनंदिन भाषेसोबत खानापूरातील लोकगीतांमध्ये कोंकणी गीतांचा समावेश दिसून येतो.

फुगडी

जायेक जाय शिकयता
पाक्षात भाकरी निकयता

वरील फुगडीमध्ये दोन जावांमधले नातेसंबंध दर्शविलेले आहे.

कोंकणी भाषा	खानपुरी बोली	मराठी भाषा
मंगळार	मंगळार	मंगळवार
तेन्ना	तन्नं	तेव्हा
तकली	टकलं	डोकं
सुशागात	सुशागात	आरामात
हून	हून	गरम
देकरेक	देकरेक	देखरेख
हाडले	हांडलीन	आणले
निसर	निसर	घसरण
चीबड	चिबुड / फुट्ट	चिबुड

तक्ता क्रमांक ४.९ खानापुरी बोली व कोंकणी भाषा

कोंकणी सोबत पोर्तुगीज शब्दही खानापुरी बोलीत आढळतात. खानापूरचा गोमंतकाशी रोटी-बेटीचा व्यवहार असल्याने कोंकणी भाषेसोबत पोर्तुगीज भाषेचा ही प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला आहे. *उदाहरणार्थ – 'साबन' (साबण), 'इस्त्री', 'चावी', 'तंबाकू' (तंबाखू), 'परात', 'बटाटा', 'फालतू', 'बुच' (बाटलीचे झाकण) 'पाटलोंग' (पाटलोण)* आदी शब्द या बोलीत आलेले आहे.

४.२०.३ खानापुरी बोली व कन्नड भाषा

खानापूर तालुका हा कर्नाटक राज्यात असल्याने स्वाभाविकपणे कन्नड भाषेचा प्रभाव खानापुरी बोलीवर आहे. कानडी हेल काढून ही बोली बोलली जाते. तसेच कन्नड भाषेतील बहुतांशी शब्द खानापुरी बोलीमध्ये आढळतात. 'अण्णा', 'आप्पा', 'अक्का', 'अव्वा!' हे कन्नड भाषेतील शब्द जसेच्या तसे खानापुरी बोलीमध्ये आढळतात. या भाषेतील काही शब्द हे इतके रुळले आहेत की ते खानापुरी बोलीतलेच शब्द आहेत असे वाटते.

झंपर	आऊ
आमटी	आंबिल
आंगी	आयल्याड
भुत्तुर	कत्री
किवंडा	ताई

तक्ता क्रमांक ४.१० खानापुरी बोलीत येणारे कन्नड शब्द

४.२०.४ खानापुरी बोली व हिंदी भाषा

हिंदी ही आपली राष्ट्र भाषा आहे. त्यामुळे भारतातील प्रत्येक व्यक्तीला ती सहज बोलता येते. तसेच आधुनिक काळात सोशल मीडिया, टीव्हीच्या वापराने मराठी भाषेमध्ये हिंदी शब्द आलेले आहेत. त्याचप्रमाणे खानापुरी बोलीतही हिंदी भाषेसोबत उर्दू, फारसी भाषेचा ही प्रभाव कमीअधिक फरकाने दिसून येतो. खानापूर तालुक्यात इस्लाम धर्मामुळे देखील येथील बोलीमध्ये हिंदी, उर्दू, फारसी भाषेतील शब्द आढळतात.

हिंदी शब्द – बेमान, मुलुक, बेकार, जिंदगी, फुरसत, बंजेर (बंजर)

फारसी शब्द – दरबार, जप्त, जुमला, तारीख

उर्दू - बे, कल

येथील वयस्कर लोकांच्या तोंडून **‘काल’**च्या ऐवजी **‘कल’** हा शब्द जास्त प्रमाणात ऐकवायस मिळतो. आत्ताची पिढी मात्र काल हाच शब्द वापरते. तसेच मुलांच्या तोंडून **‘बे’** हा शब्द वारंवार येताना आढळतो. *जसे- “ य ‘बे’ जाव्वा ”.*

वरील वाक्यातील ‘*जाव्वा*’ हा शब्द जसा लिहिला आहे तसा उच्चारला जात नाही. ‘जा’ या ध्वनीला ‘ऊ’ हा ध्वनी जोडून येतो व तो ध्वनी स्पष्टपणे उच्चारला जातो. परंतु तो ध्वनी लेखनात येत नाही. तसेच ‘व्वा’ या पदावर जोर देऊन सुरवटीत उच्चारला जातो.

४.२०.५ खानापुरी बोलीतील इंग्रजी शब्द

खानापुरी बोलीवर इतर भाषांप्रमाणेच इंग्रजी भाषेचाही परिणाम झालेला आहे. खानापूर तालुक्यावर इंग्रजांचे राज्य असल्याने या बोलीवर इंग्रजी भाषेचा प्रभाव पडलेला दिसून येतो. तसेच इंग्रजी शिक्षणामुळे, टीव्ही, इतर आधुनिक माध्यमातूनही इंग्रजी भाषेचा प्रभाव खानापुरी बोलीवर झालेला पहावयास मिळतो. इंग्रजीतील काही शब्द जसे ‘लास्ट’, ‘बॅलेन्स’, ‘रिमोट’, ‘लायटर’ आदी शब्द जसेच्या तसे बोलीत वापरले जातात. तर फिरीज (Frieze), ब्याग (Bag), इस्टो (Stove), इंटरपी (Interview), फराय (Fry) आदी शब्द रूप बदलून या बोलीत वापरले जातात. दैनंदिन बोलण्यातून अनेक इंग्रजी शब्द खानापुरी बोलीतून सहजपणे वापरले जातात.

४.२५ समारोप

सदर प्रकरणातून खानापुरी बोलीची वैशिष्ट्ये मांडण्यात आलेली आहेत. यामध्ये ख्रिस्ती धर्मीय व हिंदू धर्मीय लोकांचे भाषिक नमुन्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच त्यांची बोलण्याची पद्धत, भाषेत आलेले हेल, सुरावट इत्यादी गोष्टींचे विवेचन केलेले आहे.

सर्वनाम, विशेषण, क्रियापद आदी व्याकरणानुसार खानापुरी बोलीचे व्याकरण स्पष्ट करण्यात आले आहे. बोलीत येणाऱ्या शिव्या, म्हणी, वाक्प्रचार, अभ्यस्त शब्द, कोडी, उखाणी, गीते यातून खानापुरी बोलीची संस्कृती तसेच भाषिक वैशिष्ट्येही दिसून येतात. त्याचप्रमाणे खानापुरी बोलीचे बेळगावी, कोंकणी व कन्नड भाषेशी असलेले साम्यभेद दर्शविण्यात आलेले आहेत. साम्यभेद दर्शविताना काही ठिकाणी प्रमाण मराठीचा आधार घेण्यात आला आहे. बेळगावी बोली ही खानापुरी बोलीप्रमाणेच बोलली जात असली तरी थोड्याफार फरकाने दोन्ही बोलींमध्ये फरक दिसतो. कोंकणी व कन्नड भाषेतील अनेक शब्द खानापुरी बोलीमध्ये आलेले आढळतात. काही शब्द हे जसेच्या तसे खानापुरी बोलीने स्वीकारलेले आहेत तर काही शब्द रूप बदलून बोलीत वापरले जातात. इतर भाषांतील शब्दांप्रमाणे इंग्रजी भाषेतील शब्द ही खानापुरी बोलीत येतात.

४.२६ निष्कर्ष

१. खानापूर तालुक्यातील ख्रिस्ती धर्मीय लोकांची वर्ग बोली ही कोंकणी मिश्रित स्वरूपाची आहे.
२. ख्रिस्ती धर्मीय कोंकणी भाषा बोलत असले तरी त्यांच्या भाषेमध्ये बऱ्याच प्रमाणात खानापुरी बोलीतील शब्द आढळतात.
३. खानापूर तालुक्यातील ख्रिस्ती धर्मीयांच्या बोलीतून कानडी हेल व सुरावट अधोरेखित होते.
४. खानापूर तालुक्यातील मोजक्याच लोकांच्या बोलण्यातून वारंवार शिव्यांचा वापर होतो. तसेच या बोलीतून येणाऱ्या शिव्या ह्या विविध जाती-धर्मावरून आलेल्या आहेत.
५. खानापुरी बोलीची स्वतंत्र व्याकरण व्यवस्था व उच्चारण प्रक्रिया आहे.
६. खानापुरी बोलीमध्ये ‘व’ पासून सुरू होणाऱ्या वर्णाच्या ऐवजी ‘इ’ व ‘य’ हे वर्ण येतात.
७. खानापुरी बोलीमध्ये ‘वि’ या वर्णाच्या ऐवजी ‘इ’ तर ‘वे’ या वर्णाच्या ऐवजी ‘य’ असा वर्णलोप होतो.

८. खानापुरी बोलीतील वाक्यरचना ही प्रमाण मराठीपेक्षा वेगळी आहे.

९. खानापुरी बोलीत येणाऱ्या महाप्राण स्वनांचा उच्चार हा अल्पप्राण स्वनांनी केला जातो.

१०.खानापुरी बोलीमध्ये 'मिया', 'तिया', 'तुम्हास्नी' अशी सर्वनामे वापरली जातात.

११.खानापुरी बोलीमध्ये येणारी क्रियापदे ही अनेकवेळा दोन्ही लिंगासाठी सारखीच उच्चारली जातात.

१२.खानापुरी बोलीतील क्रियापदे ही दोन प्रकारे उच्चारली जातात.

१३.खानापुरी बोलीतील केवलप्रयोगी अव्यये ही कानडी वळणाची आहेत.

१४.मराठीतील वचन विचारापेक्षा खानापुरी बोलीतील वचन विचार हा पूर्णतः वेगळा ठरतो.

१५. खानापुरी बोलीमध्ये प्रश्न विचारताना विशिष्ट सुरावटीतून तो विचारला जातो.

१६.खानापुरी बोलीत दैनंदिन व्यवहारात अभ्यस्त शब्दांचा वापर होतो.

१७.खानापुरी बोलीतील अभ्यस्त शब्दांवर कोंकणी भाषेचा प्रभाव दिसून येतो.

१८.खानापुरी बोली व बेळगावी बोली ही थोड्याफार फरकाने समान वाटत असली तरी दोन्ही बोलींमध्ये भाषिक भेद आढळतो.

१९.खानापुरी बोलीमध्ये कोंकणी भाषेतील काही शब्द हे जसेच्या तसे वापरले जातात.

२०.कन्नड भाषेतील बहुतांशी शब्द हे खानापुरी बोलीमध्ये दैनंदिन व्यवहारात वापरतात.

२१.कन्नड व कोंकणी भाषेतील शब्द खानापुरी बोलीमध्ये रूढ झाल्याने ते खानापुरी बोलीतीलच शब्द असे वाटतात.

२२.खानापुरी बोलीत येणारे इंग्रजी शब्द हे दैनंदिन व्यवहारात सहजपणे वापरले जातात. तर काही शब्दांचे रूप बदलून वापरले जातात.

संदर्भ

---

[1] काजरेकर, गोविंद, भोसले, वसंत, कामत, सतीश. *मालवणीतल्या वाटा (मालवणी बोली)*. सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स क्र. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर, २०१७, पृ. १४.

[2] काजरेकर, गोविंद, भोसले, वसंत, कामत, सतीश. *मालवणीतल्या वाटा (मालवणी बोली)*. सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स क्र. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर, २०१७, पृ. ३९.

[3] कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली*. श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११, पृ. ६३.

प्रकरण ५

निरीक्षणे आणि निष्कर्ष

प्रास्ताविक

भाषाविज्ञानात कोणतीच भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून सर्व भाषा समान दर्जाच्या मानल्या जातात. समाजभाषाविज्ञानात एखाद्या बोलीचा अभ्यास करताना व्यक्तीप्रमाणे समाज देखील केंद्रस्थानी असतो. बोलींचा अभ्यास करताना तिच्या उच्चारण प्रक्रियेवर भर दिला जातो. कारण बोलणे हे मुख्य रूप असून लिहिणे हे नंतर आलेले रूप होय. तसेच तेथील संस्कृतीचा ही विचार बोलीच्या अभ्यासादरम्यात केला जातो. तसेच प्रत्येक बोलीचे आपले असे स्वतंत्र व्याकरण असते. अशाच प्रकारे 'खानापुरी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' सदर प्रबंधिकेतून करण्यात आलेला आहे. या विषयाचा अभ्यास करताना पहिल्या प्रकरणात भाषाविज्ञान व सामाजिक भाषाविज्ञानाची सैद्धांतिक मांडणी करण्यात आली आहे. त्यानंतर 'खानापूर प्रदेशातील लोकभाषा आणि संस्कृती' या दुसऱ्या प्रकरणाच्या अंतर्गत खानापूर तालुक्याची भौगोलिकता, इतिहास, खानापूर तालुक्यातील प्रदेश तसेच समाज वैशिष्ट्ये मांडण्यात आलेली आहेत. याबरोबर कोंकणी बोली, उमरगा तालुक्यातील बोली, चंदगडी बोली व खानापुरी बोली या लोकभाषांचे विश्लेषण करून त्यांची वैशिष्ट्ये मांडली आहेत. तर याच प्रकरणाच्या शेवटच्या अनुच्छेदात खानापुरी बोली आणि संस्कृतीचा सहसंबंध दर्शविला आहे.

तिसरे प्रकरण हे 'खानापुरी बोलीतील भाषिक नमुन्यां'चे आहे. यामध्ये विविध धर्मातील दैनंदिन व्यवहारातील भाषिक नमुने मांडून त्यांचे विश्लेषण केलेले आहे. तद्वत लोकगीतांचे संकलन, खानापुरी बोलीत आढळणारे कन्नड, कोंकणी, हिंदी, उर्दू, फारसी, इंग्रजी व पोर्तुगीज शब्दांचे नमुने दिलेले आहेत. व्याकरणिक दृष्टीनेही खानापुरी बोलीतील भाषिक नमुन्यांची मांडणी सदर ठिकाणी करण्यात आलेली आहे. तर चौथ्या प्रकरणाद्वारे 'खानापुरी बोलीची वैशिष्ट्ये' वर्णनात्मक पद्धतीने मांडलेली आहेत.

पाचवे प्रकरण हे खानापुरी बोलीच्या अभ्यासादरम्यात नोंदवलेली 'निरीक्षणे व निष्कर्ष' यावर आधारित आहे. सदर संशोधनाच्या प्रारंभी संशोधनाची उद्दीष्टे आणि गृहितके मांडण्यात आली होती. संशोधनाअंती असे लक्षात येते की मांडलेली सर्व उद्दीष्टे साध्य झालेली असून तसेच मांडलेली सर्व गृहितके साधार ठरलेली आहेत. प्रस्तुत विषयाचा अभ्यास केल्यानंतर भविष्यात 'खानापुरी

बोली'वर अजून कोणकोणत्या गोष्टींवर सखोलरित्या अभ्यास होऊ शकतो; तसेच एक बोली म्हणून नावारूपाला येताना कोणकोणत्या गोष्टींची दखल घेणे आवश्यक आहे यानुसार काही निरीक्षणे मांडण्यात आलेली आहेत. तर खानापुरी बोलीचा अभ्यास करताना हाती लागलेले निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडलेले आहेत.

५.१ निरीक्षणे

१. खानापूर तालुक्यातील लोकगीतांमधून येणाऱ्या खानापुरी बोलीचा सूक्ष्म अभ्यास होणे गरजेचे आहे. या गीतांतून जीवनातील अनेक गोष्टी मांडलेल्या आहेत. संसारातील सुख-दु:ख, विविध समारंभातील कार्य आदी वैशिष्ट्ये या लोकगीतांतून दिसून येतात. त्याचबरोबर देवदैवतांच्या कथाही खानापुरी बोलीतील लोकगीतांमधून आलेल्या आहेत.

२. खानापुरी बोलीवर कन्नड व कोंकणी भाषेचा प्रभाव असल्याने कोंकणी व कन्नड अशा मिश्र भाषेतील शब्द या बोलीत आढळतात. त्यामुळे अशा मिश्र शब्दांचा विचार होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ – वडलाप्पा. या शब्दातील वड हा शब्द कोंकणी भाषेतील असून आप्पा हा शब्द कन्नड भाषेतील आहे. या दोन्ही भाषेतील शब्दांच्या मिश्रणातून वडलाप्पा हा शब्द खानापुरी बोलीत आलेला आहे. असे अनेक शब्द खानापुरी बोलीत असतील; त्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

३. खानापुरी बोलीत अनेक शब्द हे द्विअर्थाने येतात. हे या भाषेचे वैशिष्ट्यच आहे. जसे- 'वांगडं' हा शब्द सोबत व भाजी याकरिता वापरला जातो. अशाप्रकारच्या शब्दांचा अर्थ हा प्रसंगानुसार बदलतो. अशा प्रकारे खानापुरी बोलीत येणाऱ्या अनेक द्विअर्थी शब्दांचे संशोधन होणे महत्त्वाचे ठरते.

४. खानापुरी बोली जशी बोलली जाते तसे तिचे लेखन करता येत नाही. बोलीत येणारे हेल, शब्दांवर होणारे आघात हे लेखनातून दर्शविता येत नाही.

५. विविध काळानुसार खानापुरी बोलीतील क्रियापदांचे स्वरूप हे मराठी भाषेतील काळांपेक्षा वेगळे आहे. भूतकाळ, भविष्यकाळ, वर्तमानकाळ व त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या काळातील प्रकारानुसार खानापुरी बोलीतील क्रियापदांचा अभ्यास झाला पाहिजे.

६. विविध जातीनुसार भाषेत बदल होत जातो. भाषा व जातीचा परस्पर संबंध असल्याने भाषेत जातीनुसार अनेक शब्दांची भर पडत जाते. खानापूर तालुक्यात अनेक जातीजमाती आहेत. त्यामुळे खानापुरी बोलीचा जातीनुसारही भाषिक अभ्यास झाला पाहिजे.

७. खानापुरी बोलीचा लिंग, वचन व व्यवसायाच्या दृष्टिकोनातून अभ्यास झाला पाहिजे. कारण लिंग, वचन व विविध व्यवसायानुसार खानापुरी बोलीचे वैशिष्ट्य दिसून येते.

८. खानापुरी बोलीचा अजून व्याकरणीक दृष्ट्या सखोल अभ्यास होणे हे बोली म्हणून नावारूपाला येताना महत्त्वाचे ठरावे.

९. खानापूर तालुका हा प्रदीर्घ प्रदेश असल्याने विविध संस्कृतीचा मिलाफ झाल्याचे आढळते. या विविध संस्कृतींचा परिणाम भाषेवर कसा झालेला आहे हे शोधणे आवश्यक आहे. याकरिता प्रथमतः खानापूर तालुक्यातील विविध संस्कृतीचा अभ्यास अगत्याचा ठरतो.

१०.खानापुरी बोलीचा अभ्यास करताना ‘स्वन विपर्याय’ आढळलेले आहेत. जसे- चिकटणे- चिटकणे. असे अनेक नमुने पुढील संशोधनातून पडताळता येतील.

११.खानापुरी बोलीमध्ये ‘अ’चा स्वरालोप झालेले अनेक शब्द आढळतात. जसे- आहे - हाय, आण – हान. तसेच खानापुरी बोलीमध्ये मध्यस्वनागम झालेले ही शब्द आढळतात. जसे – परसाद, रगात, धरम. एकंदर खानापुरी बोलीमध्ये ध्वनीपरिवर्तनाचे अजून सखोल संशोधन झाले पाहिजे.

१२.खानापुरी बोलीचा उच्चार प्रक्रियेनुसार अभ्यास झाला पाहिजे. काही ठिकाणी एखादा वर्ण ‘तालव्य’ उच्चारला जातो तर काही ठिकाणी तोच शब्द ‘दंत’ तालव्याने उच्चारला जातो. असे उच्चारानुसार सदर बोलीचे संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

५.२ निष्कर्ष

१. भाषा ही मानवाच्या संप्रेक्षण व्यवहाराचे प्रमूख माध्यम असली तरीही भाषा ही कोणा एकाची निर्मिती नसून ती सामाजिक ध्वनी-संकेत व्यवस्था ठरते.

२. भाषाविज्ञानामध्ये भाषेचा वर्तमानकालीन व इतिहास स्वरूपाचा अभ्यास होतो.

३. भाषाशास्त्र ही इतर शास्त्राप्रमाणे अनुभवाने सिद्ध होणारे शास्त्र होय.

४. स्वनांचा विचार हा भाषानिरपेक्ष असून स्वनिम व स्वनांतरांचा विचार हा भाषासापेक्ष केला जातो. लिपीवरून भाषेच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येत नसल्याने भाषा कशा प्रकारे बोलली जाते यावर भर दिला जातो.

५. भाषेत ध्वनींचा योग्य रित्या वापर करून घेण्याची कला समाजाला अवगत असल्याने भाषेचा शास्त्रीय अभ्यास करता येतो.

६. समाजभाषाविज्ञानामध्ये विशिष्ट समाजाला केंद्रस्थानी ठेऊन विविध व्यक्तिंच्या भाषेचा अभ्यास होत असतो.

७. भाषेच्या संदर्भात ‘श्रेष्ठ’, ‘कनिष्ठ’ या संकल्पना अंधानुकरणातून अथवा अज्ञानातून निर्माण झालेल्या आहेत.

८. जगभरात विविध भाषा बोलल्या जातात. काही भाषांच्या लिपी नसल्या तरी त्यांचा वापर व्यवहार भाषेत केला जातो.

९. भाषेचा अभ्यास हा एका विशिष्ट समाजात, समाजगटात अथवा प्रदेश मर्यादेत राहून केला जातो.

१०.कदंब राजवटीपासून खानापूर व गोमंतकाचा सांस्कृतिक सहसंबंध असलेला आढळतो.

११.सांस्कृतिक वैविध्यतेमुळे खानापूरात विविध भाषिक समूह आढळतात. त्या भाषांचा प्रभाव खानापुरी बोलीवर पर्यायाने आढळतो.

१२.खानापूर तालुक्यामध्ये राज्यपातळीवर कन्नड भाषा व व्यवहार पातळीवर खानापुरी बोलीचा वापर होतो.

१३.खानापूरातील सण-उत्सवांची नावे ही पौर्णिमा व अमावस्येनुसार ठेवलेली आहेत.

१४.खानापुरी बोलीला दैनंदिन व्यवहार बोलीचा दर्जा प्राप्त आहे.

१५.खानापूर हा प्रदीर्घ तालुका व शहर असून ग्रामीण संस्कृती, पारंपरिक जीवन जगणारा आहे.

१६.बोली व संस्कृतीचा परस्पर संबंध असल्याने एखाद्या बोलीचा अभ्यास करायचा असल्यास तेथील संस्कृतीचे ज्ञान असणे महत्त्वाचे आहे.

१७.‘बोली’ व ‘संस्कृती’ या संकल्पना विकासाच्या पैलूंवर परस्पर संबंध सांगणाऱ्या आहेत.

१८. खानापूर तालुक्यातील विविध परंपरा, चालीरीती, शकुन-अपशकूनाच्या समजुती, नातेसंबंध, विवाह विषयक इत्यादी गोष्टींचा अभ्यास करता येतो.

१९.खानापुरी बोली ही सांस्कृतीकतेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

२०.खानापुरी बोलीवर कन्नड व कोंकणी भाषेचा प्रभाव जास्त प्रमाणात दिसून येत असून पोर्तुगीज, इंग्रजी, हिंदी, उर्दू व फारसी भाषेचा ही प्रभाव दिसून येतो.

२१.अनेकवेळा खानापुरी बोली ही उच्चार सुलभीकरणाकडे वळताना दिसते.

२२.एकाच समाजातील दोन व्यक्तिंमध्ये भाषिक भेद आढळतो.

२३.खानापुरी बोलीतील काही शब्द हे द्विअर्थाने समोर येतात.

२४.खानापुरी लोकगीतांतून खानापूरच्या समाजजीवनातील विवाह, नातेसंबंध, सण-उत्सव, शेतीकाम आदींचे चित्रण येते. तसेच गावांनुसार या गीतांमध्ये थोड्याफार प्रमाणात बदल झालेला दिसतो.

२५.खानापुरी बोली ही व्यवहार भाषा असून लेखनासाठी प्रमाण मराठीचा वापर केला जातो.

२६.खानापुरी बोलीतील शब्दसंग्रह हा मराठी भाषेपेक्षा वेगळा ठरतो.

२७.खानापुरी बोली ही मराठीचीच बोली आहे. या बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास हा साहित्य, समाज व संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

२८.खानापुरी बोलीची स्वतंत्र व्याकरण व्यवस्था व उच्चारण प्रक्रिया आहे.

२९. खानापुरी बोलीतील काही शब्दांचा ‘वर्णलोप’ झालेला आढळतो.

३०.खानापुरी बोलीत येणाऱ्या महाप्राण स्वनांचा उच्चार हा अल्पप्राण स्वनांनी केला जातो.

३१.ख्रिस्ती धर्मीय कोंकणी भाषा बोलत असले तरी त्यांच्या भाषेमध्ये बऱ्याच प्रमाणात खानापुरी बोलीतील शब्द आढळतात.

३२.खानापूर तालुक्यातील मोजक्याच लोकांच्या बोलण्यातून वारंवार शिव्यांचा वापर होतो. तसेच या बोलीतून येणाऱ्या शिव्या ह्या विविध जाती-धर्मावरून आलेल्या आहेत.

३३. खानापुरी बोली ही हेल काढून, शब्दांवर आघात करत तसेच सुरावटीतून बोलली जात असल्याने प्रश्न विचारताना देखील विशिष्ट सुरावटीतून विचारला जातो.

३४.खानापुरी बोली ही चंदगडी, बेळगावी, उमरगा या बोलींशी साम्यत्व दाखवत असली तरी ही बोली आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे.

परिशिष्ट

परिशिष्ट १: कर्नाटकाचा राजकीय नकाशा 126

परिशिष्ट २: बेळगाव जिल्हयाचा तालुका नकाशा 127

परिशिष्ट ३: खानापूर तालुक्याचा नकाशा 128

परिशिष्ट ४: खानापूर शहर 129

परिशिष्ट ५: छायाचित्रे 130

५.१ खानापूर तालुक्यातील वाचनालय 130

५.२ खानापूर तालुक्यात बारा वर्षांनी होणारी लक्ष्मी देवीची जत्रा 130

५.३ खानापूर तालुक्यातील मऱ्यामा देवीची जत्रा 131

५.४ खानापूर तालुक्यातील कदंब कालीन नृसिंह मंदिर हलशी 131

५.५ खानापूर तालुक्यात पांडवांनी बांधलेले शिव मंदिर शिंदोळी बी. के. 132

५.६ खानापूर तालुक्यात भरणारा गुरांचा बाजार 132

५.७ खानापूर तालुक्यातील ऊसाची लागवड 132

५.८ चिकूची लागवड 133

५.९ ओवसा 133

५.१० सटवाईचे पूजन (पाचवी) 133

५.११ जोकमार 134

५.१२ जोकमाराला घेऊन फिरणारी जमात 134

५.१३ कामाना 134

परिशिष्ट ६: खानापुरी बोलीतील शब्दसंग्रह 135

परिशिष्ट १

कर्नाटकाचा राजकीय नकाशा



परिशिष्ट २

बेळगाव जिल्हयाचा तालुका नकाशा



परिशिष्ट ३

खानापूर तालुक्याचा नकाशा



परिशिष्ट ४
खानापूर शहर

सौजन्य : All About Khanapur Taluka Facebook Page

परिशिष्ट ५
छायाचित्रे

५.१ खानापूर तालुक्यातील वाचनालय

५.२ खानापूर तालुक्यात बारा वर्षांनी होणारी लक्ष्मी देवीची जत्रा

५.३ खानापूर तालुक्यातील मऱ्यामा देवीची जत्रा

५.४ खानापूर तालुक्यातील कदंब कालीन नृसिंह मंदिर हलशी

५.५ खानापूर तालुक्यात पांडवांनी बांधलेले शिव मंदिर शिंदोळी बी. के.

५.६ खानापूर तालुक्यात भरणारा गुरांचा बाजार

५.७ खानापूर तालुक्यातील ऊसाची लागवड

५.८ चिकूची लागवड

५.९ ओवसा



५.१० सटवाईचे पूजन (पाचवी)

५.११ जोकमार

५.१२ जोकमाराला घेऊन फिरणारी जमात

५.१३ कामाना

परिशिष्ट ६
खानापुरी बोलीतील शब्दसंग्रह

१. आळ – मजुरी	२. मिरशेंगा – मिरच्या
३. इदगार – समोर	४. प्वॉर- मूल
५. हुजराती – समोर	६. कळकोटं- कळ काढणारे
७. उल्लंस- थोडं	८. झगरगंटं- झगडाळू
९. कुरबर- धनगर	१०.सभाव - स्वभाव
११.करबेव- कडीपत्ता	१२.पारथना- प्रार्थना
१३.कवंद- गोधडी	१४.व्हडांगताय- टाकणे
१५.कानन – कशाने	१६.पोजडं -घाण
१७.चिरमोरे- चिरमुरे	१८.सानाती/ साळाती- छोटी झाडू
१९.खायम- कायम	२०.बळदून -एकत्र करणे
२१.खाली- मोकळा	२२.लुच्च -खोटं
२३.लोंच- लोणच	२४.बारदान -सामान
२५.किरवं -खेकडा	२६.चुटके -कडवी
२७.मोळे -खिळे	२८.हुडुक- शोध
२९.शेनीया- शेण्या	३०.तिडी -तिकडी
३१.नंगड- आजार	३२.हाडपं- बारीक
३३.म्हनी- म्हणे	३४.ढाप- झाक
३५.म्हनी- पाट	३६. परवाच्यदी, परवा दिवशी (भूतकाळात)- परवा
३७.त्यास- त्याला	३८.पितलं- प्यायचं
३९.कवडी- केवढी	४०.लोशिन- लसूण

४१. घुत -वारूळ	४२.परसाद- प्रसाद
४३.मोठं- दांडगं	४४.पड्याडे, पयड्याडे- परसदार
४५.पेंशेल- पेन्सिल	४६.घरपरवेस-गृहप्रवेश
४७.डालं- डब्याचे झाकण	४८.म्ह्याळ -मळ
४९.धबली- मोठी	५०.गारेगार – आयस्क्रीम
५१.उमाळळयागत -मळमळयासारखं	५२.रात- रात्र
५३.तीनसांज- तिन्ही सांज	५४.सक्काळ – सकाळ
५५.रट्टा – हाथ	५६.भाहेर – बाहेर
५७.वसरी- ओसरी	५८.इसवान – मांसाहार / अंघोळीच्या गरम पाण्यात घालवायचे थंड पाणी
५९.कवडं - केवढं	६०.आडोळी/ इळगी – विळती
६१.येनी – वेणी	६२.बुच- गुड्डी
६३.साळाती – केरसुणी	६४.तरक – लक्ष
६५.चिलवर – एकदम बारीक	६६.कांबरान – पांघरूण
६७.बेस – फळाची फोड	६८.पेंडका- लाकडाचा भारा
६९.यबाव- अनुभव	७०.पाताळ- सहावरी साडी
७१.सावलं- नवावरी साडी	७२.पिंडका- बेवडा
७३.काडू – गांडूळ	७४.अनसुटी- रिकामी पोटी
७५.करक – मशार	७६.मोसबा – नखरा
७७.करूनात- केले नाही	७८.इस्तार – पत्रावळी
७९.पोजडी – घाण	८०.वांगडं / बरोबर- सोबत
८१.मानस – मुशी	८२.वांगडं – भाजी
८३.तद्दीस- तेव्हा	८४.डबरा/ डोबरा- खड्डा
८५.आसोळ्या- आसाळे	८६.झाम – पेंग

८७.चिंचेची जिगळी	८८.बळियान – मुद्दाम
८९.पटाकन-पटकन	९०.परड्यात- परसदार
९१.पगळ -पसर	९२.उल्लसं/ वाईचं – थोडं
९३.परचार -प्रचार	९४.कव्वाट – अंडे
९५.खोडपानी -अपशकुन	९६.रग्गड – पुष्कळ
९७.तुकडे, तुंडे- तुकडे	९८.लई- खूप
९९.कागाळी – भांडण (कागाळ कोंकणीमध्ये तक्रार या अर्थाने वापरला जातो.)	१००. मंडावळ- मुंडावळ

संदर्भ सूची

अ. ग्रंथ सूची (मराठी)

१. कदम, चंद्रकांत. *मराठी भाषा आणि भाषा विज्ञान*. रंगराव पाटील प्रशांत पब्लिकेशन्स ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव २०२२.

२. काजरेकर, गोविंद, भोसले, वसंत, कामत, सतीश. *मालवणीतल्या वाटा (मालवणी बोली)*. सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स क्र. ९०, वॉर्ड ७, श्रीरामपूर, २०१७.

३. काळे, कल्याण., सोमण, अंजली. *आधुनिक भाषाविज्ञान*. प्रतिमा प्रकाशन, १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स, नवा विष्णु चौकाजवळ, पुणे १९९९.

४. कुलकर्णी, आरती. *भाषाविज्ञान : संकल्पना व स्वरूप* विजय प्रकाशन.

५. कांबळे, गुंडू यलप्पा. *चंदगडी परिसरातील बोलीभाषेचा वर्णनात्मक अभ्यास*. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१९.

६. कांबळे, शशिकला. *सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली*. श्री एल. व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६५ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, २०११.

७. भोसले, द. ता. *लोकजीवन आणि लोकसंस्कृती*. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, मुंबई ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई.

८. मालशे, स. गं., पुंडे, द. दि., सोमण, अंजली. *भाषाविज्ञान परिचय*. अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २००५.

९. मोरे, नंदकूमार. *"चंदगडी बोली"*. 'बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा'. श्री रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, जळगाव, २०१२.

१०.मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी.* अरुणा जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, ३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था पांडुरंग कॉलनी, एंडरवन, पुणे २०१२.

११.मांडे, प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप.* गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, सौ. वृशाली अविनाश मांडे १२३, साधना हौसिंग सोसायटी, प्रोफेसर चौक, सावेडी अहमदनगर, २०१७.

१२.वरखेडे, रमेश नारायण. *समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना.* सुमती लांडे, शब्दालय प्रकाशन, वॉर्ड क्र. ७, श्रीरामपूर २००१.

१३.सातोस्कर, बा. द. *गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती खंड १ ते ३.* महेश आंगले, शारदीय प्रकाशन ३, गंगोत्री, डॉ. आत्माराम बोरकर मार्ग, पणजी गोवा.

१४.संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *लोकसाहित्य व लोककला*. एम. ए. भाग १ : मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१५.संपादक मुसळे, सीमा. *वर्णनात्मक भाषाविज्ञान, प्रमाणभाषा व बोली*. एम. ए. भाग एक (मराठी), संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

१६.संपादक मोरे, नंदकूमार. *समाजभाषाविज्ञान.* एम. ए. भाग २ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१७.संपादक पाटील, शिवाजी, गवळी, अनिल पांडुरंग. *आधुनिक भाषाविज्ञान.* एम. ए. भाग १ : मराठी, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अ. ग्रंथ सूची कन्नड

१. (‘ಕರ್ನಾಟಕ ಗ್ರಾಮ ಚರಿತ್ರೆ ಕೋಶ, ಬೆಳಗಾವಿ) Naik D. B. *Karnataka Grama Charitre Kosha Belgavi District: part 2.* Prof. D. Murahari Naik, Director, Center for Extension & Consultancy, Karanataka Janapada Vishwavidyalaya Gotagodi.

ब. प्रबंध

१. कांबळे, गुंडू यलप्पा. *चंदगडी परिसरातील बोलीभाषेचा वर्णनात्मक अभ्यास.* (प्रबंध) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१९.

२. इंगळे, बालाजी मदन. *मराठवाडा सीमेलगतच्या लोकांची मराठी बोली : एक चिकित्सक अभ्यास. (प्रबंध)* स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २०२०.

क. शोध निबंध

१. देवगोजी, विजयालक्ष्मी विजय. *सीमेवरचा गाव बेळगाव संस्कृती व बोलीभाषा.* bahuvidh.com/ marathipratham/23501, २०२२.

ड. व्यक्ती नाम सूची

१. **गुरव नारायण** (माजी शिक्षक सरकारी माध्यमिक शाळा) - खानापूर, कर्नाटक.
२. **गुरव प्रभावती नारायण** (गृहिणी) - खानापूर, कर्नाटक.
३. **घाडी नामदेव रामा** (कंत्राटदार) - शेल्डे, गोवा.
४. **घाडी चंदू नामदेव** (गृहिणी) - शेल्डे, गोवा.
५. **फादर लिमा कुस्तास** (फादर) - खानापूर, कर्नाटक.
६. **खान रोहिणी** (गृहिणी) - खानापूर, कर्नाटक.
७. **डिसोझा पोलासिन** (गृहिणी) - खानापूर, कर्नाटक.
८. **डिसोझा कितेरीन** (मासेवली) - खानापूर, कर्नाटक.
९. **डिसोझा कायतान** - खानापूर, कर्नाटक.
१०. **फर्नांडिस प्रसिला** (शिक्षिका) - खानापूर, कर्नाटक.
११. **गुरव लक्ष्मी लक्ष्मण** (गृहिणी) - खानापूर, कर्नाटक.
१२. **गुरव यशोदा ज्योतिबा** (गृहिणी) - खानापूर, कर्नाटक.
१३. **पावसकर सुनंदा** (गृहिणी) - खानापूर, कर्नाटक.
१४. **मिराशी कोमल ज्योतिबा** (गृहिणी) - शिंदोळी, खानापूर, कर्नाटक.
१५. **मिराशी ज्ञानेश्वर देवाप्पा** (गवंडी) - शिंदोळी, खानापूर, कर्नाटक.

१६.**घाडी खेमण्णा नामदेव** (शिक्षक, साकोर्डा एज्युकेशन सोसायटी माध्यमिक शाळा, नवे साकोर्डा) - शेल्डे, गोवा.

१७.**घाडी मधू खेमण्णा** (गृहिणी) - शेल्डे, गोवा.

१८.**मिराशी यल्लू** (गृहिणी) - शिंदोळी, खानापूर, कर्नाटक.

१९.**मोटर रेणुका गंगाराम** (गृहिणी) - रामगुरवाडी, खानापूर, कर्नाटक.

२०.**घाडी यल्लू अर्जुन** (गृहिणी) - रामगुरवाडी, खानापूर, कर्नाटक.

२१.**मोटर जानकी लक्ष्मण** (गृहिणी) - रामगुरवाडी, खानापूर, कर्नाटक.

२२.**लक्ष्मण मोटर** (शेतकरी) - रामगुरवाडी, खानापूर, कर्नाटक.

प. संकेत स्थळे

१. https://newkhanapur.com/about-khanapur

२. http://en.wikipedia.org/wiki/Khanapur

३. https://www.tmv.edu.in/AitihasikVaVarnanatmakBhashaVidnyan.pdf